# नवरात्र प्रवचने



# नवरात्र – प्रवचने
# परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी
# पुणे–१९८८

वर्ष १९८८ च्या नवरात्रीमध्ये परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी यांनी पुणे (प्रतिष्ठान)मध्ये दिल्या गेलेल्या प्रवचनांचे हे संकलन आहे. हे संकलन एक अद्वितीय प्रयास आहे. विशेष म्हणजे नऊ दिवस रोज देवीची पूजा केली गेली असे केवळ याच वर्षी घडले. तारीख होती ११ ते १९ ऑक्टोबर १९८८. मूळ पुस्तकात श्लोकांचे अर्थ हिंदी भाषेत दिले होते. या पुस्तकात ते मराठीत भाषांतरीत केले आहे.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रथमा (प्रतिपदा) नवरात्र | ११-१०-८८ |
| द्वितीया- नवरात्र | १२-१०-८८ |
| तृतिया व चतुर्थी - नवरात्र | १३/१४-१०-८८ |
| पंचमी- नवरात्र | १५-१०-८८ |
| षष्ठी- नवरात्र | १६-१०-८८ |
| सप्तमी- नवरात्र | १७-१०-८८ |
| अष्टमी- नवरात्र | १८-१०-८८ |
| नवमी- नवरात्र | १९-१०-८८ |

# मनोगत

**जय श्री माताजी**

*सर्व मंगल मांगल्ये । शिवे सर्वार्थ साधिके ।।*
*शरण्ये त्र्यंबके गौरी । नारायणी मनोस्तुते ।। १ ।।*
*शरणागत दिनार्त परित्राप परायणे ।*
*सर्व देवी नारायणी मनोस्तुते ।। २ ।।*

प्राचीन काळापासून मानव शक्तीची पूजा करीत आला आहे. मानवी जीवनात शक्ती उपासनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जगदंबेची ५१ पीठे भूतलावर आहेत. त्या शक्तीपीठांपैकी साडेतीन पीठे महाराष्ट्रात स्थित आहेत. कोल्हापूरची आंबाबाई (महालक्ष्मी), तुळजापूरची तुळजाभवानी (महासरस्वती), माहूरची रेणुका (महाकाली) आणि वणीची सप्तशृंगी (अर्धे पीठ) अशी एकूण साडेतीन पीठे. प्रत्येक गावाची ग्रामदेवता असते. वर्षभरात देवीच्या अनेक पूजा बांधल्या जातात. व्रतवैकल्ये केली जातात.

खरेतर स्त्रीसुद्धा शक्तीचे रूप आहे. प्रत्येक वेळी तिचे निराळेच रूप समोर येते. वत्सला ते रौद्ररूपा स्त्री शक्ती. महाराष्ट्रात हा शक्ती उत्सव अश्विन शुद्ध प्रतिपदा ते विजया दशमीपर्यंत चालतो. घटस्थापना, फुलोरा, अष्टमीचा हवन, दसऱ्याला रावणाचे दहन मोठ्या भक्तीने, श्रद्धेने आणि पारंपरिक पद्धतीने पार पडते. मात्र यामागे असणारी आध्यात्मिक आणि शास्त्रीय कारणे माहीत असायला हवीत.

यावर्षी खुद्द आदिशक्ती श्री माताजी प्रतिष्ठान पुणे येथे आल्या होत्या. त्यांनी नवरात्राचे सलग दहा दिवस प्रवचने दिली. त्या प्रवचनात परमपूज्य श्री माताजींनी नवरात्रीच्या प्रत्येक दिवसाचे महत्त्व आणि सहजयोगींनी काय करायचे हे समजावून सांगितले. खरेतर ही अमृतवाणीच आदिशक्तीच्या मुखातून आलेली. मात्र ही प्रवचने हिंदीत आहेत. महाराष्ट्रात खेडोपाडी पसरलेल्या सहजयोगींना समजणे थोडे अवघड जाते. दरवर्षी नवरात्रात सहजयोग केंद्रांवर या प्रवचनांचे वाचन होते. जर ही हिंदीतील श्री माताजींची प्रसादतुल्य प्रवचने मराठीत भाषांतरित केली तर त्याचे वाचन आकलन सुलभ होईल. सहज होईल. या विचाराने हे भाषांतर केले आहे.

श्री माताजींचा आशीर्वाद पाठीमागे असल्यावर कार्यसुलभता जोडीने येते हा अनुभव याही पुस्तकाच्या वेळेस सतत येत राहिला.

विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा. लि., सातपूर, नाशिक यांनी ई–बुकपर्यंत तांत्रिक बाबी चोखपणे सांभाळल्या. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. श्री माताजींच्या आशीर्वादामुळे यावेळेसही ‘द लाईफ इटर्नल ट्रस्ट, पुणे यांच्या सहकार्याने पुस्तकाच्या छपाईचे कार्य पूर्णत्वास नेले. आम्हाला त्यांच्या ऋणातच राहणे आवडेल. सहजयोगी बंधुश्री कुलकर्णी सर यांची मदत याहीवेळेस अनमोल ठरली त्यांनाही धन्यवाद. सर्व काही श्री माताजी घडवून आणतात आपण सर्व निमित्तमात्र असतो याची पूर्ण जाणीव आम्हा दोघींना आहे. श्री माताजींचे आशीर्वाद सातत्याने आपल्याला प्राप्त होवोत.

**जय श्री माताजी**

## अर्पणपत्रिका

जगातील सर्व मराठी बोलणाऱ्या, वाचणाऱ्या सहजयोगी बंधु-भगिनींना आणि
सतत आशीर्वाद देऊन
लेखनाला स्फूर्ति देणाऱ्या
परमपूज्य श्री माताजींच्या
चरणावर सादर अर्पण

**– प्रा. उषाताई बी. पाटील**
**– डॉ. नलिनी बी. पिचड**
नाशिक

# प्रथमा (प्रतिपदा) नवरात्र ऑक्टोबर ११, १९८८

नवरात्रीचा पहिला दिवस हा श्री गणेशाचा दिवस आहे, म्हणून हा दिवस मौन दिवसाच्या रुपात साजरा केला. श्री गणेशजींची पूजा केली गेली.

# द्वितीया – नवरात्र १२–१०–१९८८

देवी सूक्ताचा पाठ केला

देवीसूक्त

**नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।**
**नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम्।। १।।**

देवीला नमस्कार असो. महादेवी शिवाला सतत नमस्कार असो. प्रकृती आणि भद्राला नमस्कार. आम्ही सर्वजण नियमपूर्वक श्री जगदंबेस प्रणाम करतो. ।। १ ।।

**रौद्रायै नमो नित्यायै गौर्ये धात्र्यै नमो नमः।**
**ज्योत्स्नायै चेन्दुरुपिण्यै सुखायै सततं नमः।। २ ।।**

रौद्रा(रूद्र)ला नमस्कार. नित्या, गौरी आणि धरित्रीला (धरणी) वारंवार, अनेकानेक नमस्कार. चंद्ररूपिणी तथा सुखस्वरूपादेवीला सतत नमस्कार. ।। २ ।।

**कल्याण्यै प्रणतां वृद्ध्यै सिद्ध्यै कुर्मो नमो नमः।**
**नैर्ऋत्यै भूभृतां लक्ष्म्यै शर्वाण्यै ते नमो नमः।। ३ ।।**

शरणागतांचे कल्याण करणाऱ्या वृद्धी आणि सिद्धिरूपी देवीला आम्ही वारंवार नमन करतो. नैर्ऋती (राक्षसांची लक्ष्मी), राजांची लक्ष्मी आणि (शर्वाणी) शिवपत्नीस्वरूपा जगदंबेस वारंवार नमस्कार करतो. ।। ३ ।।

**दुर्गायै दुर्गपारायै सारायै सर्वकारिण्यै।**
**ख्यात्यै तथैव कृष्णायै धूम्रायै सततं नमः।। ४ ।।**

दुर्गा, दुर्गपारा (दुर्गम संकटातून पार पाडणारी), सारा (सर्वांचा सार असणारी) सर्वकारिणी, ख्याती, कृष्णा आणि धूम्रादेवी तुला सतत नमस्कार. ।। ४ ।।

**अतिसौम्यातिरौद्रायै नमस्तस्यै नमो नमः।**
**नमो जगत्प्रतिष्ठायै दैव्यै कृत्यै नमो नमः।। ५ ।।**

अत्यंत सौम्य आणि अत्यंत रौद्ररुपा देवीस आम्ही नमस्कार करतो. तिला आमचे अनेकानेक नमस्कार. जगाची जी आधारभूत देवी आहे. कृतिदेवी तिलाही आम्ही वारंवार प्रणाम करतो. ।। ५ ।।

**या देवी सर्वभूतेषु विष्णुमायेति शब्दिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।। ६ ।।**

जी देवी प्राण्यांमध्ये विष्णुमायेच्या नावाने ओळखली जाते
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला पुनः पुन्हा नमस्कार ।। ६ ।।

**या देवी सर्व भूतेषु चेतनेत्यभिधीयते।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।। ७ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये चैतन्य पसरविते
तिला नमस्कार, नमस्कार, वारंवार नमस्कार ।। ७ ।।

**या देवी सर्व भूतेषु बुद्धि रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। ८ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये बुद्धिरूपाने प्रस्थापित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। ८ ।।

**या देवी सर्व भूतेषु निद्रा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। ९ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये निद्रारूपाने विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, वारंवार नमस्कार।। ९ ।।

**या देवी सर्व भूतेषु क्षुधा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १० ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये क्षुधा (भूक) रूपाने विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला पुन: पुन्हा नमस्कार।। १० ।।

**या देवी सर्व भूतेषु छाया रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। ११ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये छायारूपात प्रस्थापित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। ११ ।।

**या देवी सर्व भूतेषु शक्ति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १२ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये शक्तिरूपाने विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १२ ।।

**या देवी सर्व भूतेषु तृष्णा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १३ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये तृष्णा (तहान) रूपात स्थित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १३ ।।

**या देवी सर्व भूतेषु क्षान्ति (क्षमा) रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १४ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये क्षांती (क्षमा) रूपाने विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १४ ।।

**या देवी सर्व भूतेषु जाति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १५ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये जातीच्या स्वरूपात विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १५ ।।

**या देवी सर्व भूतेषु लज्जा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १६ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये लज्जेच्या रूपात विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १६ ।।

**या देवी सर्व भूतेषु शान्ति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १७ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये शांती रूपात प्रस्थापित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १७ ।।

**या देवी सर्व भूतेषु श्रद्धा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १८ ।।**

जी देवी सर्व प्राण्यांमध्ये श्रद्धेच्या रूपात विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। १८ ।।

**या देवी सर्व भूतेषु कान्ति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। १९ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये कांतिरूपाने स्थित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला पुनः पुन्हा नमस्कार ।। १९ ।।

**या देवी सर्व भूतेषु लक्ष्मी रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। २० ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये लक्ष्मी रूपाने वास करते,
तिला प्रणाम, तिला प्रणाम , तिला पुन: पुन्हा प्रणाम।। २० ।।

**या देवी सर्व भूतेषु वृत्ति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। २१ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये वृत्ती रूपाने वास करते,
तिला प्रणाम, तिला प्रणाम, तिला पुनः पुन्हा प्रणाम ।। २१ ।।

**या देवी सर्व भूतेषु स्मृति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।।२२।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये स्मृतिरूपात प्रस्थापित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। २२ ।।

**या देवी सर्व भूतेषु दया रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। २३ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये दयेच्या रूपाने वास करते,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। २३ ।।

**या देवी सर्व भूतेषु तृष्टि रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। २४ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये तृष्टिरूपात (समाधानाच्या रूपात) विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। २४ ।।

**या देवी सर्व भूतेषु मातृ रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। २५ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रात मातृरूपात विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। २५ ।।

**या देवी सर्व भूतेषु भ्रान्ति रूपेण संस्थिता। नमस्तस्यै..... ।। २६ ।।**

जी देवी सर्व प्राणिमात्रांमध्ये भ्रांतिरूपाने (भ्रमात) विद्यमान आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। २६ ।।

**इन्द्रियाणामधिष्ठात्री भूतानां चाखिलेषु या।**
**भूतेषु सततं तस्यै व्याप्तिदेव्यै नमो नमः ।। २७ ।।**

जी जिवांच्या इंद्रियवर्गाची अधिष्ठात्री देवी आणि
सर्व प्राण्यांमध्ये सदा व्याप्त राहणारी आहे, त्या
व्याप्ती देवीला वारंवार नमस्कार ।। २७ ।।

**चितिरूपेण या कृत्स्नमेतद् व्याप्य संस्थिता जगत्।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।। २८ ।।**

जी देवी चैतन्य रूपात या संपूर्ण जगात स्थित आहे,
तिला नमस्कार, तिला नमस्कार, तिला वारंवार नमस्कार ।। २८ ।।

०००००

# अथ देव्याः कवचम्

**देवीकवच –** स्नेहमयी, करुणामयी, परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवींना प्रार्थना करून

**श्री चंडीकवच –** श्री गणेशाला नमस्कार, श्री सरस्वतीला नमस्कार, श्री गुरूंना नमस्कार, कुलदेवतांना नमस्कार, कृपा करून सर्व विघ्ने, सर्व बाधांचे निवारण करा.

श्री नारायणाला नमस्कार, श्री नर, नरोत्तमा(श्री विष्णू)ला नमस्कार, सर्वज्ञ श्री वेदव्यासांना नमस्कार.

# तृतीया आणि चतुर्थी, नवरात्र १३/१४-१०-१९८८
# अथ देव्याः कवचम्

**देवीकवच**

**ॐ अस्य श्री चण्डी कवचस्य ब्रह्माऋषिः अनुष्टुप् छन्दः, चामुण्डा देवता, अंगन्यासोक्तमातरो बीजम, दिग्बन्धदेवतास्तत्त्वम, श्री जगदम्बाप्रीत्यर्थे सप्तशती-पाठांगत्वेन जपे विनियोगः ।**

श्री चंडीकवचाचे अधिशासी (अधिशासक) देव ब्रह्मा आहेत. अनुष्टुप छंद चामुंडा याची देवी आहे, अंगनासोक्तमातरो याचे बीज आहे आणि दिग्बंध देवता याचे तत्त्व आहे. श्री जगदंबेला प्रसन्न करण्यासाठी सप्तशतीचा एक भाग म्हणून याचा जप केला जातो.

**ॐ नमश्चण्डिकायै ।।**

श्री चंडिकादेवीस नमस्कार असो.

**मार्कंडेय उवाच**

**मार्कंडेय म्हणाले**

**ॐ यद्गुह्यं परमं लोके सर्वरक्षाकरं नृणाम् ।**
**यन्न कस्यचिदाख्यातं तन्मे ब्रूहि पितामह ।। १ ।।**

पितामह (ब्रह्मदेव), जे या जगात अत्यंत गोपनीय (गुप्त) आणि मनुष्याचे सर्व प्रकारे रक्षण करणारे आहेत. जे आजपर्यंत दुसऱ्या कोणापुढेही प्रकट केले नाही असे साधन मला सांगा.

**ब्रह्मोवाच**

**अस्ति गुह्यतमं विप्र सर्व भूतोपकारकम् ।**
**देव्यास्तु कवचं पुण्यं तच्छृणुष्व महामुने ।। २ ।।**

ब्रह्मदेव म्हणाले - ब्रह्मम्! असे साधन तर देवीचे एक कवच आहे. जे गोपनीयतेहूनही अत्यंत गोपनीय (गुप्ततम) पवित्र आणि सर्व प्राण्यांबरोबर उपकार करणारे आहे. महामुने ते श्रवण करा ।। २ ।।

**प्रथमं शैलपुत्री च द्वितीयं ब्रह्मचारिणी ।**
**तृतीयं चन्द्रघण्टेति कूष्माण्डेति चतुर्थकम् ।। ३ ।।**
**पचमं स्कन्दमातेति पष्ठं कात्यायनीति च ।**
**सप्तमं कालरात्रीति महागौरीति चाष्टमम् ।। ४ ।।**
**नवमं सिद्धिदात्री च नवदुर्गाः प्रकीर्तिताः ।**
**उत्कान्येतानि नामानि ब्रह्मणैव महात्मना ।। ५ ।।**

(देवीची नऊ रूपे आहेत. त्यांना नवदुर्गा म्हणतात. त्यांची वेगवेगळी स्वतंत्र नावे आहेत, असे ब्रह्मदेवाने सांगितले.)

प्रथम नाव शैलपुत्री आहे. दुसऱ्या रूपाचे नाव 'ब्रह्मचारिणी' आहे. तिसरे रूप 'चंद्रघंटा' नावाने प्रसिद्ध आहे. चौथ्या मूर्तीला 'कूष्मांड' म्हणतात. पाचव्या दुर्गेचे नाव 'स्कंदमाता' आहे. देवीच्या सहाव्या रूपास 'कात्यायनी' म्हणतात. सातवे 'कालरात्री' आणि आठवे रूप 'महागौरी'च्या नावाने प्रसिद्ध आहे. नवव्या दुर्गेचे नाव 'सिद्धिदात्री' आहे.

ही सर्व नावे सर्वज्ञ महात्मा वेद भगवान यांच्याकडून सांगितली गेली. ।। ३ - ५ ।।

**अग्निना दह्यमानस्तु शत्रुमध्ये गतो रणे।**
**विषमे दुर्गमे चैव भयार्ता: शरणं गता: ।। ६ ।।**
**न तेषां जायते किंचिदशुभं रणसंकटे ।**
**नापदं तस्य पश्यामि शोकदु:खभयं न हि ।। ७ ।।**

जो माणूस अग्नीत जळतो आहे, रणभूमीमध्ये शत्रूने त्याला घेरले आहे, अनेक कठीण संकटात अडकला आहे, अशा प्रकारे भयातुर होऊन जो भगवती दुर्गेला शरण आला आहे, त्याचे कधी काही अमंगल होत नाही. युद्धाच्या वेळेस संकटात सापडल्यावरही त्याच्यावर आपत्ती येत नाही. त्याला शोक, भय आणि दु:ख प्राप्त होत नाही. ।। ६ - ७ ।।

**यैस्तु भक्त्या स्मृता नूनं तेषां वृध्दी: प्रजायते ।**

**ये त्वां स्मरन्ति देवेशि रक्षसे तान्न संशय: ।। ८ ।।**

ज्यांनी भक्तिपूर्वक देवीचे स्मरण केले आहे, त्यांचा निश्चितच अभ्युदय होतो. देवेश्वरी! जे तुझे चिंतन करतात त्यांचे तू निःसंदेह रक्षण करतेस. ।। ८ ।।

**प्रेतसंस्था तु चामुण्डा वाराही महिषासना ।**

**ऐन्द्री गजसमारूढ़ा वैष्णवी गरुडासना ।। ९ ।।**

चामुंडादेवी प्रेतावर आरूढ होते. 'वाराही' रेड्यावर स्वार होतो ऐंद्रीचे वाहन ऐरावत हत्ती आहे. वैष्णवीदेवी गरुडावर आसनस्थ होते.

**माहेश्वरी वृषारूढ़ा कौमारी शिखिवाहना ।**

**लक्ष्मीः पद्मासना देवी पद्महस्ता हरिप्रिया ।। १० ।।**

माहेश्वरी वृषभावर (बैलावर) आरूढ होते. कौमारीचे वाहन मयूर आहे. भगवान विष्णूची प्रियतमा लक्ष्मीदेवी कमळाच्या आसनावर विराजमान आहे. हातात कमळ धरले आहे. ।। १० ।।

**श्वेतरूपधरा देवी ईश्वरी वृषवाहना ।**

**ब्राह्मी हंससमारूढ़ा सर्वाभरणभूषिता ।। ११ ।।**

वृषभावर (बैलावर) आरूढ ईश्वरीदेवीने श्वेत (पांढरे) रूप धारण केले आहे. ब्राह्मीदेवी हंसावर बसली आहे आणि सर्व प्रकारच्या आभूषणांनी विभूषित (अलंकृत) झाली आहे. ।। ११ ।।

**इत्येता मातरः सर्वाः सर्वयोगसमन्विताः ।**

**नानाभरणशोभाढ्या नानारत्नोपशोभिताः ।। १२ ।।**

या प्रकारे या सर्व माता सर्व प्रकारच्या योगशक्तींनी संपन्न आहेत. यांच्याशिवाय इतर अनेक देवी आहेत, ज्या अनेक प्रकारच्या आभूषणांनी शोभायमान झाल्या आहेत, तसेच नाना प्रकारच्या रत्नांनी सुशोभित आहेत.

**दृश्यन्ते रथमारूढ़ा देव्यः क्रोधसमाकुलाः ।**

**शंखं चक्रं गदां शक्तिं हलं च मुसलायुधम ।। १३ ।।**

**खेटकं तोमरं चैव परशुं पाशमेव च ।**

**कुन्तायुधं त्रिशूलं च शार्ड्.गयुधमुत्तमम् ।। १४ ।।**

**दैत्यानां देहनाशाय भक्तानामभयाय च ।**

**धारयन्त्यायुधानीत्थं देवानां च हिताय वै ।। १५ ।।**

या सर्व देवता (देवी) क्रोधाने भरलेल्या आहेत आणि भक्तांच्या रक्षणासाठी रथात बसलेल्या दिसत आहेत. शंख, चक्र, गदा, शक्ती, औत आणि मुसळ, खेटक आणि तोमर, परशु आणि पाशकुंत, त्रिशूळ तसेच उत्तम शार्गंधनुष्य इ. शस्त्रास्त्रे आपल्या हातात धारण करते. दैत्यांच्या शरीराचा नाश करणे, भक्तांना अभय देणे आणि देवतांचे कल्याण करणे, हाच त्यांचा शस्त्र धारण करण्याचा उद्देश आहे. ।। १३ – १५ ।।

**नमस्तेऽस्तु महारौद्रे महाघोरपराक्रमे ।**

**महाबले महोत्साहे महाभयविनाशिनि ।। १६ ।।**

(कवच आरंभ करण्यापूर्वी या प्रकारची प्रार्थना केली पाहिजे.)

महान रौद्ररूप, अत्यंत घोर पराक्रम, महाबळ (महान शक्ती), महान उत्साही देवी! आपण महाभयाचा नाश करणारी आहात. आपल्याला नमस्कार असो. ।। १६ ।।

**त्राहि मां देवि दुष्प्रेक्ष्ये शत्रूणां भयवर्द्धिनी ।**

**प्राच्यां रक्षतु मामैन्द्री आग्नेय्यामग्निदेवता ।। १७ ।।**

**दक्षिणेऽवतु वाराही नैर्ऋत्यां खड्गधारिणी ।**

**प्रतीच्यां वारुणी रक्षेद् वायव्यां मृगवाहिनी ।। १८ ।।**

तुमच्याकडे बघणेदेखील कठीण आहे. शत्रूंचे भय वाढविणारी जगदंबिकादेवी माझे रक्षण कर. पूर्व दिशेला ऐंद्री (इंद्रशक्ती) माझे रक्षण कर. अग्निकोनात (आग्नेयेस) अग्निशक्ती, दक्षिण दिशेस वाराही, नैर्ऋत्येस खड्गधारिणी माझे रक्षण कर. पश्चिम दिशेस वारुणी आणि वायव्येस मृगावर स्वार असलेली देवी माझे रक्षण कर. ।। १७ – १८ ।।

**उदीच्यां पातु कौमारी ऐशान्यां शूलधारिणी ।**

**ऊर्ध्व ब्रह्माणि मे रक्षेदधस्ताद् वैष्णवी तथा ।। १९ ।।**

उत्तर दिशेत कौमारी (कुमारी) आणि ईशान्येस शूलधारिणीदेवी रक्षण कर. ब्रह्माणी! तू वरच्या बाजूने माझे रक्षण कर आणि वैष्णवीदेवी खालच्या बाजूने माझे रक्षण कर. ।। १९ ।।

**एवं दश दिशो रक्षेच्चामुण्डा शववाहना ।**

**जया मे चाग्रतः पातु विजया पातु पृष्ठतः ।। २० ।।**

त्याचप्रकारे शवाला वाहन बनविणारी चामुंडादेवी दशदिशांमध्ये माझे रक्षण कर. जया, पुढच्या बाजूने आणि विजयामागच्या बाजूने माझे रक्षण करा. ।। २० ।।

**अजिता वामपार्श्वे तु दक्षिणे चापराजिता ।**

**शिखामुद्योतिनी रक्षेदुमा मुर्ध्नि व्यवस्थिता ।। २१ ।।**

वाम (डावा) भागात अजिता आणि दक्षिण भागात अपराजिता रक्षण कर. उद्योतिनी, शिखा (शेंडी)चे रक्षण कर. उमा माझ्या मस्तकावर विराजमान होऊन रक्षण कर. ।। २१ ।।

**मालाधरी ललाटे च भुवौ रक्षेद् यशस्विनी ।**

**त्रिनेत्रा च भुवोरेर्मध्ये यमघण्टा च नासिके ।। २२ ।।**

माथ्यावर माळा धारण करणाऱ्या हे देवी रक्षण कर. यशस्विनीदेवी माझ्या भुवयांचे रक्षण कर. भुवयांच्या मधे त्रिनेत्रतादेवी आणि नाकपुड्यांचे यमघंटादेवी तू रक्षण कर. ।। २२ ।।

**शंखिनी चक्षुषोर्मध्ये श्रोत्रयोर्द्वारवासिनी ।**

**कपोलौ कालिका रक्षेत्कर्णमूले तु शांकरी ।। २३ ।।**

दोन्ही नेत्रांच्या मध्यभागाचे शंखिनीदेवी आणि कानाचे द्वारवासिनीदेवी रक्षण कर. कालिकादेवी गालाचे आणि भगवती शांकरीदेवी कानाच्या मूळ भागाचे रक्षण कर. ।। २३ ।।

**नासिकायां सुगन्धा च उत्तरोष्ठे च चर्चिका ।**

**अधरे चामृतकला जिव्हायां च सरस्वती ।। २४ ।।**

नासिकेत (नाक) सुगंधा व वरच्या ओठात चर्चिकादेवी रक्षण कर. खालच्या ओठात अमृतकला आणि जिभेत सरस्वतीदेवी रक्षण कर. ।। २४ ।।

**दन्तान् रक्षतु कौमारी कण्ठदेशे तु चण्डिका ।**

**घण्टिकां चित्रघण्टा च महामाया च तालुके ।। २५ ।।**

कौमारीदेवी दाताचे आणि चंडिकादेवी कंठप्रदेशाचे रक्षण करो. चित्रघंटादेवी गळ्याच्या घाटी (घसा), महामायादेवी टाळूत राहून रक्षण करो. ।। २५ ।।

**कामाक्षी चिबुकं रक्षेद् वाचं मे सर्वमंगला ।**

**ग्रीवायां भद्रकाली च पृष्ठवंशे धनुर्धरी ।। २६ ।।**

कामाक्षी हनुवटीचे आणि सर्वमंगला माझ्या वाणीचे रक्षण करो. भद्रकाली, ग्रीवा आणि धनुर्धरी पृष्ठवशा(पाठीचा कणा)त राहून रक्षण करो. ।। २६ ।।

**नीलग्रीवा बहिःकण्ठे नलिकां नलकूबरी ।**

**स्कन्धयोः खंगिनी रक्षेद् बाहू मे वज्रधारिणी ।। २७ ।।**

कंठाच्या बाहेरील भागात नीलग्रीवा आणि कंठाच्या नळीत (श्वासनलिका) नलकूबरी रक्षण करो. दोन्ही खांद्यावर खंगिनी आणि माझ्या दोन्ही भुजांचे वज्रधारिणीदेवी रक्षण करो. ।। २७ ।।

**हस्तयोर्दण्डिनी रक्षेदम्बिका चांगुलीषु च ।**

**नखाच्छूलेश्वरी रक्षेत्कुक्षौ रक्षेत्कुलेश्वरी ।। २८ ।।**

दोन्ही हातांत दंडिनी आणि बोटांमध्ये अंबिका रक्षण करो. शूलेश्वरी नखांचे रक्षण करो. कुलेश्वरी कुक्षी (पोट)त राहून रक्षण करो. ।। २८ ।।

**स्तनौ रक्षेन्महादेवी मनःशोकविनाशिनी ।**
**हृदये ललिता देवी उदरे शूलधारिणी ।। २९ ।।**

महादेवी दोन्ही स्तनांचे आणि शोकविनाशिनीदेवी मनाचे रक्षण करो. ललितादेवी हृदयात राहून व शूलधारिणी उदरात राहून रक्षण करो. ।। २९ ।।

**नाभौ च कामिनी रक्षेद् गुह्यं गुह्येश्वरी तथा ।**
**पूतना कामिका मेढ्रं गुदे महिषवाहिनी ।। ३० ।।**

बेंबीचे (नाभी) कामिनीदेवी, गुह्य भागाचं गुह्येश्वरी रक्षण करो. पूतना आणि कामिका लिंगाचं आणि महिषवाहिनी गुदद्वाराचे रक्षण करो. ।। ३० ।।

**कट्यां भगवती रक्षेज्जानुनी विंध्यवासिनी ।**
**जंघे महाबला रक्षेत्सर्वकामप्रदायिनी ।। ३१ ।।**

भगवती कटीचे भागात आणि विंध्यवासिनी गुडघ्याचे रक्षण करो. संपूर्ण इच्छा देणारी महाबलादेवी दोन्ही पोटऱ्यांचे रक्षण करो. ।। ३१ ।।

**गुल्फयोर्नारसिंही च पादपृष्ठे तु तैजसी ।**
**पादांगुलीषु श्री रक्षेत्पादाधस्तलवासिनी ।। ३२ ।।**

नारसिंहीदेवी दोन्ही घोट्यांचे, तैजसीदेवी दोन्ही चरणांच्या पृष्ठभागांचे रक्षण करो. श्रीदेवी पायांच्या बोटांमध्ये आणि तलवासिनी तळव्यात राहून रक्षण करो. ।। ३२ ।।

**नखान् दंष्ट्राकराली च केशांश्चैवोर्ध्वकेशिनी ।**
**रोमकूपेषू कौमारी त्वचं वागीश्वरी तथा ।। ३३ ।।**

आपल्या दाढांमुळे भयंकर दिसणारी देवी दंष्ट्राकराली नखांची, ऊर्ध्वकेशिनीदेवी केसांचे रक्षण करो. रोमावलीच्या छिंद्रांची कौमारीदेवी आणि त्वचेची बागेश्वरीदेवी रक्षण करो. ।। ३३ ।।

**रक्तमज्जावसामांसान्यस्थिमेदांसि पार्वती ।**
**अन्त्राणि कालरात्रिश्च पित्तं च मुकुटेश्वरी ।। ३४ ।।**

पार्वतीदेवी रक्त, मज्जा (स्नायू), मांस, वसा (चरबी), हाडे, आविमेदा(चरबी)चे रक्षण करो. आतड्यांचे रक्षण देवी कालरात्री करो आणि पित्ताचे रक्षण देवी मुकुटेश्वरी करो. ।। ३४ ।।

**पद्मावती पद्मकोशे कफे चूडामणिस्तथा ।**
**ज्वालामुखी नखज्वालामभेद्या सर्वसन्धिषु ।। ३५ ।।**

सर्व चक्रांमध्ये पद्मावतीदेवी आणि कफा(फुफ्फुस)त चुडामणि प्रस्थापित होऊन रक्षण करो. नखाच्या तेजाचे ज्वालामुखीदेवी रक्षण करो. जिला कोणतेही अस्त्र भेदू शकत नाही, ती अभेद्यादेवी शरीरातील सर्व सांध्यांमध्ये राहून आमचे रक्षण करो. ।। ३५ ।।

**शुक्रं ब्रह्माणि मे रक्षेच्छायां छत्रेश्वरी तथा ।**
**अहंकारं मनो बुद्धिं रक्षेन्मे धर्मधारिणी ।। ३६ ।।**

ब्रह्माणी, तुम्ही माझ्या वीर्याचे रक्षण करा. छत्रेश्वरी छायेचे रक्षण करो आणि धर्मधारिणीदेवी माझ्या अहंकार, मन व बुद्धीचे रक्षण करो. ।। ३६ ।।

**प्राणापानौ तथा व्यानमुदानं च समानकम् ।**
**वज्रहस्ता च मे रक्षेत्प्राणं कल्याणशोभना ।। ३७ ।।**

हातात वज्र धारण करणारी वज्रहस्तादेवी माझे प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान वायूचे रक्षण करो. कल्याणामुळे शोभणारी (शोभिन) भगवती कल्याण शोभनादेवी माझ्या प्राणाचे रक्षण करो. ।। ३७ ।।

**रसे रूपे च गन्धे च शब्दे स्पर्शे च योगिनी ।**
**सत्त्वं रजस्तमश्चैव रक्षेन्नारायणी सदा ।। ३८ ।।**

रस, रूप, गंध, शब्द आणि स्पर्श या बाबींचा अनुभव घेतेवेळी देवी योगिनी रक्षण करो, तसेच सत्त्वगुण, तमोगुण व रजोगुण यांचे रक्षण देवी नारायणी करो. ।। ३८ ।।

**आयू रक्षतु वाराही धर्म रक्षतु वैष्णवी ।**
**यशः कीर्तिं च लक्ष्मीं च धनं विद्यां च चक्रिणी ।। ३९ ।।**

वाराहीदेवी आयु(वय)चे रक्षण करो. वैष्णवीदेवी धर्माचे रक्षण करो, तसेच चक्रिणीदेवी (चक्र धारण करणारी) यश, कीर्ती, लक्ष्मी, धन, विद्या यांचे रक्षण करो. ।। ३९ ।।

**गोत्रमिन्द्राणि मे रक्षेत्पशून्मे रक्ष चण्डिके ।**
**पुत्रान् रक्षेन्महालक्ष्मीर्भार्या रक्षतु भैरवी ।। ४० ।।**

इंद्राणी आपण माझ्या गोत्राचे रक्षण करा. चंडिके माझ्या पशूंचे रक्षण करा. महालक्ष्मी पुत्रांचे रक्षण करो. भरवी पत्नीचे रक्षण करो ।। ४० ।।

**पन्थानं सुपथा रक्षेन्मार्ग क्षेमकरी तथा ।**
**राजद्वारे महालक्ष्मीर्विजया सर्वतः स्थिता ।। ४१ ।।**

माझ्या पंथाचे सुपथादेवी व मार्गाचे क्षेमकरीदेवी रक्षण करो. राजाच्या दरबारात महालक्ष्मी रक्षण करो आणि सगळीकडे व्याप्त असणारी विजयादेवी माझे पूर्ण भयापासून रक्षण करो. ।। ४१ ।।

**रक्षाहीनं तु यत्स्थानं वर्जितं कवचेन तु ।**
**तत्सर्व रक्ष मे देवी जयन्ति पापनाशिनी ।। ४२ ।।**

देवी, जे स्थान कवचात सांगितले गेले नाही, ते रक्षारहित आहे. ते सर्व तुमच्यामुळे सुरक्षित होवो. कारण आपण विजयशालिनी आणि पापनाशिनी आहात ।। ४२ ।।

**पदमेकं न गच्छेत्तु यदीच्छेच्छुभमात्मनः ।**
**कवचेनावृतो नित्यं यत्र यत्रेव गच्छति ।। ४३ ।।**
**तत्र तत्रार्थलाभश्च विजयः सार्वकामिकः**
**यं यं चिन्तयते कामं तं तं प्राप्नोति निश्चितम् ।**
**परमैश्वर्यमतुलं प्राप्स्यते भूतले पुमान् ।। ४४ ।।**

जर आपले शरीर उत्तम राहावे असे वाटत असेल, तर तो माणूस बिनाकवच एकही पाऊल टाकणार नाही. कवचाचा पाठ करूनच प्रवास (यात्रा) करा. कवचाद्वारा सर्व बाजूने सुरक्षित माणूस जिथे जिथे जातो तिथे तिथे त्याला धनलाभ होतो. त्याचप्रमाणे संपूर्ण इच्छांची कामनांच्या सिद्धी करणाऱ्या विजयाची प्राप्ती होते. तो ज्या ज्या अभीष्ट गोष्टींची इच्छा (चिंतन) करतो ती ती त्याला निश्चित प्राप्त करून घेतो. तो पुरुष पृथ्वीवर अतुलनीय महान ऐश्वर्याचा भागीदार होतो ।। ४३, ४४ ।।

**निर्भयो जायते मर्त्यः संग्रामेष्वपराजितः ।**
**त्रैलोक्ये तु भवेत्पूज्यः कवचेनावृतः पुमान् ।। ४५ ।।**

कवचामुळे सुरक्षित झालेला माणूस निर्भय होतो. युद्धात त्याचा पराजय होत नाही. त्याचप्रमाणे तो तिन्हीलोकांमध्ये पूजनीय होतो. ।। ४५ ।।

**इदं तु देव्याः कवचं देवानामपि दुर्लभम् ।**
**यः पठेत्प्रयतो नित्यं त्रिसन्ध्यं श्रद्धयान्वितः ।। ४६ ।।**
**दैवी कला भवेत्तस्य त्रैलोक्येष्वपराजितः ।**
**जीवेद् वर्षशतं साग्रमपमृत्यु विवर्जितः ।। ४७ ।।**

देवीचे हे कवच देवतांसाठीही दुर्लभ आहे. जो दररोज नियमपूर्वक तिन्ही संध्यांच्या वेळी श्रद्धेसह कवचाचा पाठ करतो, त्याला दैवीकला प्राप्त होते, तसेच तो तिन्हीलोकांमध्ये कोठेही पराजित होत नाही. इतकेच नव्हे, तर तो अपमृत्यू (अकाली मृत्यू)पासून वाचतो. शंभराहून जास्त वर्षे जगतो.।। ४६ – ४७ ।।

**नश्यन्ति व्याधयः सर्वे लूताविस्फोटकादयः ।**
**स्थावरं जंगमं चैव कृत्रिमं चापि यद्विषम् ।। ४८ ।।**

मकरी, देवी आणि कोड इ. त्याचे सर्व रोग नष्ट होतात. कन्हेर, भांग, अफू, धोत्रा, इ. मधील विष, साप आणि विंचू दंश झाल्याने चढणारे जहाल विष, तसेच अहिफेन (समुद्रफेस) आणि तेलाच्या संयोगाने तयार होणारे कृत्रिम विष, ही सर्व प्रकारची विषे दूर होतात. त्यांचा काही परिणाम होत नाही ।। ४८ ।।

**अभिचाराणि सर्वाणि मन्त्रयन्त्राणि भूतले ।**
**भूचराः खेचराश्चैव जलजाश्चोपदेशिकाः ।। ४९ ।।**
**सहजा कुलजा माला डाकिनी शाकिनी तथा ।**
**अन्तरिक्षचरा घोरा डाकिन्यश्च महाबलाः ।। ५० ।।**
**ग्रहभूतपिशाचाश्च यक्षगन्धर्वराक्षसाः ।।**
**ब्रह्मराक्षसवेतालाः कूष्माण्डा भैरवाद्यः ।। ५१ ।।**
**नश्यन्ति दर्शनात्तस्य कवचे हृदि संस्थिते ।**
**मानोन्नतिर्भवेद् राज्ञस्तेजोवृद्धिकरं परम् ।। ५२ ।।**

या पृथ्वीवर जारण – मारण आदि जितके (अभिचारिक) प्रयोग होतात, तसेच या प्रकारचे जितके मंत्र-तंत्र असतील हे सर्व या कवचाला हृदयात धारण केलेल्या मनुष्याला बघितल्याक्षणी नष्ट होतात. हेच नव्हे, तर पृथ्वीवर विचरण करणाऱ्या ग्रामदेवता आकाशचारी (आकाशातून फिरणारे) देवाधिदेव (देवविशेष), पाण्याच्या संबंधातून प्रकट होणारे गण, उपदेशाने सिद्ध होणाऱ्या निम्नकोटीच्या देवता. आपल्या जन्माबरोबर प्रकट होणाऱ्या देवता, कुलदेवता, माला (कंठमाला), डाकिणी, शाकिनी, अंतरिक्षात विहार करणारी अत्यंत बलवान भयानक डाकिणी, ग्रह, भूत, पिशाच्च, यक्ष, गंधर्व, राक्षस, ब्रह्मराक्षस, वेताळ, कूष्मांड आणि भैरव इ. अनिष्टकारक देवताही, हृदयात कवच धारण केल्यामुळे त्या माणसाला बघून पळून जातात. कवचधारी माणसाला राजाकडून सन्मान, वृद्धी प्राप्त होते. हे कवच मनुष्याच्या तेजाची वृद्धी करणारे आणि उत्तम आहे. ।। ४९ – ५२ ।।

**यशसा वर्द्धते सोऽपि कीर्तिमण्डितभूतले ।**
**जपेत्सप्तशतीं चण्डीं कृत्वा तु कवचं पुरा ।। ५३ ।।**
**यावद्भूमण्डलं धत्ते सशैलवनकाननम् ।**
**तावत्तिष्ठति मेदिन्यां सन्ततिः पुत्रपौत्रिकी ।। ५४ ।।**

कवचाचा पाठ करणाऱ्या माणसाला आपल्या कीर्तीने विभूषित भूतलावर सुयशाबरोबर वृद्धी प्राप्त होते. जो प्रथम कवचाचा पाठ करून त्यानंतर सप्तशती चंडीचा पाठ करतो त्याचे जोपर्यंत वन, पर्वत आणि कानन (अरण्य) यांसह पृथ्वी टिकून राहते, तोपर्यंत इथे पुत्रपौत्र आदी संतान, परंपरा टिकून राहतात. ।। ५३ – ५४ ।।

**देहान्ते परमं स्थानं यत्सुरैरपि दुर्लभम् ।**
**प्राप्नोति पुरुषो नित्यं महामायाप्रसादतः ।। ५५ ।।**

नंतर देहाचा अंत झाल्यावर तो मनुष्य भगवती महामायेच्या प्रसादाने त्या नित्य परम पदास प्राप्त होतो. जे देवतांसाठीही दुर्लभ आहे.

**लभते परमं रूपं शिवेन सह मोदते । ॐ ।। ५६ ।।**

तो सुंदर दिव्य रूप धारण करतो आणि कल्याणमय शिवाबरोबर आनंदाचा भागीदार होतो. ।। ५६ ।।

**इति देव्याः कवचं संपूर्णम्**

अशा प्रकारे देवीकवच सफल (संपूर्ण) झाले.

‘‘आईजवळ आपल्या मुलांचे रक्षण करणे आणि देखभाल करण्यासाठी अनेक शक्ती आहेत. नेहमी या शक्ती विद्यमान (हजर) होतात आणि प्रत्येक वेळी चोवीस तास कार्यरत राहतात. म्हणून जो माणूस श्रीमाताजीप्रति समर्पण करतो, तेव्हा या शक्तींची अभिव्यक्ती होते आणि या शक्ती त्याच्या समस्यांचे समाधान करण्यास मदत करतात. पण समर्पण ही पहिली पायरी आहे. तुम्ही जर परमात्म्याच्या साम्राज्यात नसाल तर आई (श्रीमाताजी)ची कोणतीही जबाबदारी नाही, तेव्हा असेही होऊ शकते, की कोणी आसुरी (नकारात्मक) शक्ती आपल्यावर नियंत्रण करील आणि तुम्हाला नष्ट करील.’’

-----------------------------

# चतुर्थी – नवरात्र १४–१०–१९८८

तृतीयेला वाचलेल्या देवीकवचाचा उरलेला भाग वाचला गेला.

**श्रीमाताजींनी सांगितले –**

... तर आता आपण या कवचाला संक्षिप्त (छोटे) केले आहे. तुम्ही फक्त 'बंधन' घ्या. ते देवीकवचासमान आहे. आत्मसाक्षात्कारी लोकांना 'बंधन' घेणे कवचासमान आहे. जे काही तुम्ही इथे म्हणालात ते सर्व केले गेले आहे. काल आणि आज इथे जे काही सांगितले ती सर्व रक्षाकार्ये (रक्षण करणारी) एका झटक्यात केली आहेत.

**आता आम्हाला हे बघायचे आहे की, आमच्यापैकी किती जण घरातून बाहेर जाताना, झोपण्यापूर्वी किंवा काहीही महत्त्वपूर्ण कार्य करण्याआधी 'बंधन' घेतात? कितीजण 'बंधन' घेतात? कदाचित कधीतरी तुम्ही हे विसरता, पण बंधन घेणे फार महत्त्वाचे आहे. प्रवासाला निघण्याआधी, रस्त्यावरून जाताना तुम्ही बंधन घेत असाल तर अतिउत्तम. असे म्हणू नका, की ठीक आहे. श्रीमाताजी आमचे रक्षण करीत आहेत असे नाही. सर्व कार्ये करण्याआधी तुम्हाला 'बंधन' घेणे आवश्यक आहे.**

तुम्हाला जर दुर्घटना झाली तर तुम्ही हे लक्षात ठेवा, की तुमच्या हातून काही अपराध घडला आहे किंवा आणखी काही आहे. खरेतर तुमचा अपघात (दुर्घटना) व्हायला नको. दुर्घटनेचा अर्थ आहे अजूनही तुमच्यात काही कमी आहे.

**देवीकवचाबद्दल सांगताना माताजी पुन्हा म्हणतात –**

''मार्कंडेय स्वामींनी फार पूर्वी जे वचन दिले होते ते आता तुम्हाला प्राप्त झाले आहे. त्यांनी चौदा हजार वर्षांपूर्वी वचन दिले होते, की जेव्हा महामाया येईल तेव्हा हे कार्य पूर्ण होईल. जेव्हा ती (श्रीमाताजी) हे कार्य पूर्ण करील तेव्हा हे घडेल. आम्ही हे समजले पाहिजे, की आम्हाला दिलेली सर्व वचने आता पूर्ण होत आहेत. आता आम्हाला काही वचने द्यावी लागतील आणि काही प्रश्न विचारावे लागतील. आम्ही जीवनात आमचे लक्ष्य प्राप्त केले आहे किंवा कसे, हे प्रश्न आम्ही विचारले पाहिजे आणि छोट्या, तुच्छ बाबींकडे दुर्लक्ष केले पाहिजे. त्यात अडकता कामा नये. आपल्यासाठी खूप मोठे स्वप्न बघितले पाहिजे.

**भिन्न दृष्टिकोन आणि निर्लिप्त अवस्था –**

कल्पना करा, की सर्व समस्यांचे कारण आपली आंतरिक खळबळ, अस्थिरता आहे. तुम्ही चाकाच्या टोकावर बसून त्याच्या धुरीवर आहात (आसावर)? जसे स्वतःला बंधन देणे. जेव्हा बंधनाविषयी लिहिले गेले तेव्हा त्याची व्याख्या केली नव्हती. कारण लोक सहजयोगी झाले नव्हते.

सहजयोगात एक वेगळीच समस्या पुढे येते, की ज्या लोकांनी देवीची पूजा केलेली नव्हती, कवच घेतले नव्हते, आणखी काहीही केले नव्हते. जे धार्मिक नव्हते, ज्यांनी दुसरी कुठलीही पूजा केली नव्हती. नमाज पढली नव्हती किंवा प्रार्थना केली नव्हती. ज्यांनी काहीही केले नव्हते, असे लोकही सहजयोगात आले आहेत. परमात्म्याला न मानणारे (नास्तिक) लोकही सहजयोगात आलेत. थोडक्यात, येथे सर्व प्रकारचे लोक आले आहेत. ज्यांनी शुद्ध हृदयाने हे केले, केवळ शाब्दिक आकडेमोड केली नाही, त्यांना आत्मसाक्षात्कार प्राप्त होतो आणि त्यांना जास्त पकडही येत नाही. पण ज्या लोकांनी प्रथम असे केले नाही, त्यांनी हे समजायला पाहिजे, की ते पूर्णतः निर्लिप्त होणे आवश्यक आहे. नाहीतर काय होते की हे लोक धुरीपर्यंत जाऊन बाहेर येतात. जर कोणी देवीचा भक्त असेल तर ही गोष्ट चूक आहे. तुम्ही लगेचच पकडले जाता. पण सहजयोगात आम्ही एक काम केले आहे, आमच्याकडे अशा प्रकारचे असे गुण असणारे लोक खूप कमी आहेत. आज आपण म्हणू शकतो, की असे लोक खूपच कमी आहेत. क्वचित आहेत. जास्तीत जास्त लोक धुरीच्या परिघात गेले आहेत. सहजयोगात आम्ही काय करतो? एक शिखर तयार करतो. ज्यामुळे तुम्ही वर्तमानात येता. त्यानंतर तुमचा भूतकाळ बनवितो. सर्वांत आधी शिखर आहे. त्यामुळेच तुम्हाला तुमचा पाया, तुमची बंधने आणि सर्व सवयी शुद्ध करीत गेले पाहिजे. समजा मार्कंडेयमुनींसारखी कोणी व्यक्ती आहे तर काही समस्या नाही. म्हणून तुम्हाला स्वतःला शुद्ध करीत जायचे आहे. याशिवाय काही उपाय नाही. लोक आपले एक – एक चक्र शुद्ध करतील, नंतर अशा अवस्थेपर्यंत येतील की त्यांना आत्मसाक्षात्कार देता येईल. याशिवाय दुसरा उपाय नव्हता. सर्वोत्तम गोष्ट ही होती, की प्रथम लोकांना आत्मसाक्षात्कार द्यायचा. त्यामुळे ते स्वतःची देखभाल करू शकतील. स्वतःला ओळखतील. माझ्या या चक्रावर पकड आहे, माझ्या त्या चक्रावर पकड आहे. असे होत राहिले तर तुम्ही स्वतःला शुद्ध करण्याचा प्रयत्न कराल. हे तुमच्या आणि माझ्यासाठीही खूप सोपे होईल. तेव्हा तुम्ही निर्लिप्त होऊ लागता. पण कधी कधी आपण अन्य लोकांमुळे पकडीत येतो, हे महत्त्वाचे आहे.

जोपर्यंत माझा संबंध आहे, मी माझ्या शरीराला अत्यंत स्वतंत्र केले आहे. मी माझे रक्षण बिलकुल करीत नाही. कोणीही बाधीत सहजयोगी माझ्याकडे आला तर त्याची बाधा मी ओढून घेते आणि पकड ठीक करते. नक्कीच मला थोडाफार त्रास होतो. काही हरकत नाही. कारण मी माझ्या त्रासाला साक्षीरूपाने (तटस्थपणे) बघते. ही काही फार मोठी समस्या नव्हे. आम्हाला हेच बघायचे आहे, हेच समजायचे आहे आणि अशा जागी पोचायचे आहे जिथे तुम्ही वायुदाबमापिका (Barometric)प्रमाणे होऊ शकाल. जेव्हा तुम्हाला बाधेची महिती

होईल, तेव्हा तुम्ही समजा, की तुम्ही वायुदाबमापक झाला आहात. तुम्हाला समजते की या माणसाला ही बाधा झाली आहे. (एक प्रकारे बाधा अशीच पकडमध्ये येत नाही आणि त्याचा त्रास सहन करता?)

पण तुम्ही पकडमध्ये येता आणि समजून – उमजून तो त्रास सहन करता आणि त्या पकडीला साफ करता; परंतु सहजयोगात आत्मसाक्षात्कार प्राप्त केल्यानंतरही व्यक्ती भूतकाळात अडकू शकते. (कारण भूतकाळ जरी हानिकारक वाटला नाही, हा पूजेप्रमाणे सुखदही नाही)

**माझी पूजा करताना लोक हे विसरतात, की मी तिथे साक्षात उपस्थित आहे. ते बस माझी पूजा मात्र करतात. भजन गात माझी स्तुती गातात. मी तुमच्यात, तुमच्यासमोर बसलेली आहे, याची तुम्हाला जाणीव नसते. खरे सांगा असे होते की नाही? माझी स्तुतिपर भजने तुम्ही यासाठी गाता की ते केवळ संगीत आहे. तुम्हाला ही जाणीव हवी, की मी तुमच्यासमोर बसलेली आहे आणि तुम्ही माझे स्तुतिपर गीत गाता आहात.** एकरूपतेची ओळख होणे अजून बाकी आहे. तुम्ही देवीची स्तुती गात आहात. देवी कोण आहे, हा पूल पार करणे अजून शेष आहे. मला बघून माझ्या माध्यमातून तुम्ही माझी ओळख करून घ्याल, तर चांगले होईल. मस्तकावर भयंकर पकड आहे. धर्म एक मोठे बंधन आहे. जसे जैन लोक सहजयोगासाठी फार कठीण आहेत. ते जरी सहजयोगात आले, तरी अतिशय अवघड (दुष्कर) कर्मठ असतात. कारण त्यांचे संस्कार अत्यंत (गहन) खोलवर असतात. सहज बदलत नाहीत. जसे आर्य समाजाची बंधनेही खोल गेलेली असतात.

बौद्धधर्मीयांचे संस्कारही गहन असतात. ते निराकारात विश्वास करतात. पण परमेश्वर मानत नाही. व्यक्तीने यादृष्टीने बघायला हवे. ''आम्ही ना बुद्धाला जाणत ना मोहंमदाला, आम्ही त्यांना बघितले नाही. आम्ही महावीरांना ओळखत नाही, आम्ही कोणालाही ओळखत नाही.'' तुम्हाला आत्मसाक्षात्कार कोणी दिला? ''श्रीमाताजींनी.'' म्हणून आम्हाला ही गोष्ट लक्षात ठेवायला हवी, की कोणालाही समजून घ्यावे लागेल की कोणाला जर समजून घ्यायचे असेल तर श्रीमाताजींच्या माध्यमातून समजावे लागेल सहजयोगाच्या नव्हे. (आता दुसऱ्या प्रकारे (विधीसे)) तुम्ही चाललात तर ते कार्यान्वित होणार नाही. ते पुन्हा भूतकाळात परत जाते?) मेंदू (मस्तिष्क) एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे, दुसरीकडून पुन्हा पहिलीकडे आंदोलित होते. त्याला स्थिर करा आणि समजा की वर्तमान काय आहे? तुमच्यासमोर कोण आहे? तुम्हाला आत्मसाक्षात्कार कोणी दिला?

''एक दुसरी समस्या ही आहे की मी महामाया आहे.'' केवळ महामायाच तुम्हाला आत्मसाक्षात्कार देईल. ही गोष्ट शास्त्रात लिहिली आहे. महामाया तुम्हाला आत्मसाक्षात्कार देत असते; परंतु मी इतकी मानवीय आहे की मी जे केले त्यातून मागे सरू शकते. तुम्ही मला समजू शकत नाही. जेव्हा जेव्हा तुम्ही वास्तविकतेच्या जवळ जाऊ इच्छिता तेव्हा तुम्ही महामायेच्या जाळ्यात गुंतता, अडकता. मी इतकी अमानवीय आहे, की तुमच्यासाठी तीच एक समस्या आहे. पण तेच समस्येचे उत्तरही आहे. विचार करा मीपण जर इतर देवतेसारखी असते, ज्यांच्याबद्दल तुम्ही ऐकले आहे, सतत हातात तलवार धारण केलेली, तर कोणीही माझ्या जवळही आले नसते. सिंह किंवा चित्त्यावर बसून आले असते तर कोण माझ्याजवळ आले असते? कोणी मला प्रश्न विचारले असते? कोणी व्याख्या केली असती? मला तुम्हाला समजावून सांगितले पाहिजे. मला खूप कार्ये करावयाची आहेत. तुम्हाला काही सांगायचे असते, तुमच्या समस्यांकडे इशारा करायचा असतो. हे कार्य आणखी दुसरे कोणी करू शकत नाही. ही गोष्ट (श्रीमाताजी हसतात) हसण्यावारी नेऊ नका. तिला मनोरंजनाचे रूप देऊ नका. उदाहरणादाखल एखादे महान गुरू संगीततज्ज्ञ आहेत त्यांचा एखाद्या शिष्य बेसूर गात असेल तर गुरू त्याच्या गालावर थप्पड मारतील. पण महामाया असे करू शकत नाही. अन्यथा कोणतीही गोष्ट सहन केली गेली नसती. या सर्व बाबी देवीदेवतांच्या सहन करण्यापलीकडे आहेत. ते सर्व देवीदेवता माझ्यात विद्यमान आहेत. मला माहिती आहे, की ते माझ्यात आहेत. मी त्यांना नियंत्रित करते. कारण मी महामाया आहे. मी म्हणते, की हा आता दोन प्रकारे कार्यान्वित होईल, पण मी मानवी स्वरूपामुळे तुमच्या अत्यंत जवळ असते. या अतिजवळ असण्यामुळे या गोष्टी तुमच्यासाठी आणखी खराब (वाईट) आहेत. उदाहरणार्थ – माझी स्वतःची मुले माझा स्वीकार करणार नाहीत. माझे नात, नातू मला लगेचच ओळखणार नाहीत. माझे पती माझा लगेच स्वीकार करणार नाहीत. माझे नातेवाईकही माझा लगेच स्वीकार करणार नाहीत आणि जर त्यांनी लगेच स्वीकारले तर ते अत्यंत महान लोक असतील. त्यांनी माझा स्वीकार न करणे एक प्रकारे चांगलेच आहे. कारण माझे पूर्ण कुटुंब माझ्याबरोबर असते तर लोक म्हणाले असते, यांनी तर (सहजयोगाची) एक संस्था सुरू केली आहे. त्यामुळे जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत या सर्वांना (सहजयोगापासून) दूर ठेवणे चांगली गोष्ट आहे. हे करणे कठीण नाही. माझ्या मताप्रमाणे सर्व लोकांनी यात पूर्ण झोकून देण्याची वेळ आली आहे. मी स्वतःला सहजयोगात प्रस्थापित केले आहे आणि तुम्हा सर्वांना माहिती आहे की मी नातेसंबंध, नातेवाईक यांना विशेष महत्त्व देत नाही.

सर्व शास्त्रांमध्ये सहजयोगाचे वर्णन आले आहे; परंतु आम्हाला सर्व धर्मांना त्यांच्या वास्तविक आणि शुद्ध रूपात आणावे लागेल. हे असे कार्य आहे जे तुम्हा लोकांना करावयाचे आहे. सर्व धर्मांना त्यांच्या शुद्ध रूपात आणणे आणि मानवसृजीत (मानवनिर्मित) धर्मानुसार डोळे बंद करून चालत राहणे किंवा आंधळेपणाने अनुकरण करणे नव्हे. या धर्मांची निर्मिती अवतारांनी केली होती; माणसांनी नाही. माणसाने त्या धर्मांना बेगडी (बनावट) बनवले. सर्व धर्मांबरोबर सर्व प्रकारचा मूर्खपणा केला आहे.

आम्ही हे पक्के ध्यानात ठेवले पाहिजे की, धर्माच्या खऱ्या आणि शुद्ध स्वरूपात याचा (सहजयोग) सन्मान केला पाहिजे. कारण सर्व धर्म एकच आहेत. तुम्ही जर धर्मांचे खरे स्वरूप बघाल तर ते फुलाच्या पाकळ्यांप्रमाणे सर्व धर्म एक आहेत, हेच दिसते. दिसायला ते कदाचित एकसारखे दिसत नसतील, पण पाकळ्या मिळूनच फूल बनते.

---------------------------

# पंचमी – नवरात्र १५–१०–१९८८

**अथार्गलास्तोत्रम्**

**ॐ अस्य श्री अर्गलास्तोत्रमन्त्रस्य विष्णुर्ऋषिः, अनुष्टुप, छन्दः, श्रीमहालक्ष्मीर्देवता, श्री जगदम्बाप्रीतये सप्तशती पाठाङ्गत्वेन जपे विनियोगः ।**

**ॐ नमश्चण्डिकायै ।।**

**मार्कण्डेय उवाच**

**ॐ जयन्ती मंगला काली भद्रकाली कपालिनी ।**
**दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तुते ।। १ ।।**
**जय त्वं देवि चामुण्डे जय भूतार्तिहारिणी ।**
**जय सर्वगते देवि कालरात्रि नमोऽस्तुते ।। २ ।।**

ॐ चंडिकादेवीस माझा नमस्कार असो.

मार्कण्डेय सांगतात : जयंती, मंगला, काली, भद्रकाली, कपालिनी, दुर्गा, क्षमा, शिवा, धात्री, स्वाहा आणि स्वधा या नावांनी प्रसिद्ध जगदंबिके, तुम्हास आमचा नमस्कार. देवी चामुंडे, तुझा जयजयकार असो. सर्व प्राण्यांचे दुःख हरण करणारी देवी तुला नमस्कार असो. सर्वांत व्याप्त राहणारी देवी तुझा विजय असो. कालरात्री तुला नमस्कार असो. ।। २ ।।

**मधुकैटभविद्राविविधातृवरदे नमः ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ३ ।।**

मधू आणि कैटभ यांना मारणारी, तसेच ब्रह्माजीस वरदान देणारी देवी, तुम्हास नमस्कार असो. आपण मला रूप (आत्मस्वरूपाचे ज्ञान) दे, जय (मोहावर विजय) यश (मोह – विजय आणि ज्ञान – प्राप्तिरूप यश) दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। ३ ।।

**महिषासुर निर्णाशि भक्तानां सुखदे नमः ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ४ ।।**

महिषासुराचा नाश करणाऱ्या आणि भक्तांना सुख देणाऱ्या देवी, तुला नमस्कार. तू रूप दे, जय दे, यश दे, काम आणि क्रोध या शत्रूंचा नाश कर. ।। ४ ।।

**रक्तबीजवधे देवी चण्डमुण्डविनाशिनी ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ५ ।।**

रक्तबीजाचा वध आणि चंडमुंडाचा विनाश करणाऱ्या देवी, तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध इ. शत्रूंचा नाश कर. ।। ५ ।।

**शुम्भस्यैव निशुम्भस्य धूम्राक्षस्य च मर्दिनि ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ६ ।।**

शुभ–निशुंभ, तसेच धूम्रलोचनाचे मर्दन करणारी देवी, तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर ।। ६ ।।

**वन्दिताङ्.घ्रयुगे देवी सर्वसौभाग्यदायिनि ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ७ ।।**

सर्वांकडून चरणयुगलांना वंदन केले जाते, तसेच संपूर्ण सौभाग्य प्रदान करणाऱ्या देवी, तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। ७ ।।

**अचिन्त्यरुपचरिते सर्वशत्रुविनाशिनि ।**
**रुपं देहि जयं यशो देहि द्विषो जहि ।। ८ ।।**

देवी! तुझे रूप आणि चरित्र अचिंत्य आहे. तू सर्व शत्रूंचा नाश करणारी आहेस. तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। ८ ।।

**नतेभ्यः सर्वदा भकत्या चण्डिके दुरितापहे ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ९ ।।**

पाप दूर करणाऱ्या चंडिके, जे भक्तिपूर्वक तुझी स्तुती करतात, त्यांना रूप दे, जय दे, यश दे, आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। ९ ।।

**स्तुवद्भ्यो भक्ति पूर्वत्वांचण्डिके व्याधिनाशिनि ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १० ।।**

रोगांचा नाश करणाऱ्या चंडिके, जे भक्तिपूर्वक तुझी स्तुती करतात त्यांना रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध इ. शत्रूंचा नाश कर ।। १० ।।

**चण्डिके सततं ये त्वामर्चयन्तीह भक्तितः ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। ११ ।।**

चंडिके, या जगात जे भक्तिपूर्वक तुझी पूजा करतात त्यांना रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। ११ ।।

**देहि सौभाग्यमारोग्यं देहि मे परमं सुखम् ।**
**रुपं देहि दयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १२ ।।**

मला सौभाग्य दे, आरोग्य दे, परम सुख दे, रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। १२ ।।

**विधेहि द्विषतां नाशं विधेहि बलमुच्चकैः ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १३ ।।**

जे माझा द्वेष करतात, त्यांचा नाश होवो आणि माझ्या बलाची (ताकदीची) वृद्धी कर. रूप दे, जय दे, यश दे, काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। १३ ।।

**विधेहि देवि कल्याणं विधेहि परमां श्रियम् ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १४ ।।**

देवी, माझे कल्याण कर. मला उत्तम संपत्ती प्रदान कर. रूप दे, जय दे, यश दे, काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। १४ ।।

**सुरासुरशिरोरत्ननिघृष्टचरणेऽम्बिके ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १५ ।।**

अंबिके, देवता आणि आसूर दोन्हीही आपल्या माथ्यावरील मुकुटांची रत्ने तुझ्या चरणावर घासत असतात. (तुझ्या चरणांवर दंडवत घालतात) तू मला रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध इ. शत्रूंचा नाश कर. ।। १५ ।।

**विद्यावन्तं यशस्वन्तं लक्ष्मीवन्तं जनं कुरू ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १६ ।।**

आपल्या भक्तजनांना विद्वान, यशस्वी आणि लक्ष्मीवान बनव. तसेच क्षपप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोधादी शत्रूंचा नाश कर. ।। १६ ।।

**प्रचण्डदैत्यदर्पघ्ने चण्डिके प्रणताय मे ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १७ ।।**

प्रचंड दैत्यांच्या अहंकाराचे निर्दालन करणाऱ्या चंडिके, मला, शरणागताला रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा विनाश कर. ।। १७ ।।

**चतुर्भुजे चतुर्वक्त्रसंस्तुते परमेश्वरी ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १८ ।।**

चतुर्मुख ब्रह्मदेवाद्वारा प्रशंशित, चार भुजा धारण करणाऱ्या परमेश्वरी, रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध इ. शत्रूंचा विनाश कर. ।। १८ ।।

**कृष्णेन संस्तुते देवि शश्वद्भक्त्या सदाम्बिके ।**

**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। १९ ।।**

देवी अंबिके, भगवान विष्णू नित्य, निरंतर भक्तिपूर्वक तुझी स्तुती करतात. तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी देवतांचा नाश कर. ।। १९ ।।

**हिमाचल सुतानाथसंस्तुते परमेश्वरि ।**

**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। २० ।।**

हिमालयकन्या पार्वतीचे पती महादेवजी यांनी जिची प्रशंसा केली आहे, अशा परमेश्वरी, तू आम्हाला रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। २० ।।

**इन्द्राणीपति सद्भावपूजिते परमेश्वरि ।**

**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। २१ ।।**

शचीपती इंद्राद्वारा सद्भावाने पूजन केल्या जाणाऱ्या हे परमेश्वरी, तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम व क्रोध इ. शत्रूंचा नाश कर. ।। २१ ।।

**देवि प्रचण्डदोर्दण्डदैत्यदर्पविनाशिनि ।**

**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। २२ ।।**

प्रचंड भुजदंड असणाऱ्या दैत्यांचा गर्व नष्ट करणाऱ्या देवी, तू रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा विनाश कर. ।। २२ ।।

**देवि भक्तजनोद्दामदत्तानन्दोदयेऽम्बिके ।**

**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।। २३ ।।**

देवी अंबिके, तू आपल्या भक्तांना नेहमी असीम आनंद देतेस. मला रूप दे, जय दे, यश दे आणि काम, क्रोध आदी शत्रूंचा नाश कर. ।। २३ ।।

**पत्नीं मनोरमां देहि मनोवृत्तानुसारिणीम् ।**

**तारिणीं, दुर्गसंसारसागरस्य कुलोद्भवाम् ।। २४ ।।**

मनाच्या इच्छेप्रमाणे चालणारी पत्नी मला दे. जी दुर्गम संसारसागरातून मला तारून नेईल आणि उत्तम कुळात जिचा जन्म झाला आहे. (हे देवी अशी माझ्या मनाच्या इच्छेनुसार चालणारी पत्नी मला दे.) ।। २४ ।।

**इदं स्तोत्रं पठित्वा तु महास्तोत्रं पठेन्नरः ।**

**सतुसप्तशतीसंख्यावर्माप्नोति सम्पदाम् ॐ ।। २५ ।।**

जो माणूस या स्तोत्राचे पठण करून सप्तशती रूपे महास्तोत्राचे पठण (वाचन) करतो, तो सप्तशतीच्या जपसंख्येमुळे मिळणाऱ्या श्रेष्ठ फळास प्राप्त होतो. (मिळणारे श्रेष्ठ फळ प्राप्त होते.) त्याचबरोबर त्याला भरपूर संपत्तीही प्राप्त होते ।। २५ ।।

**इति देव्या अर्गलास्तोत्रं सम्पूर्णम् ।**

------------------------------

# पंचमी – नवरात्र १५–१०–१९८८

तुम्ही सर्व सहजयोगी आहात. तुमचे नशीब काय आहे? तुमचे नशीब (नियती) आध्यात्मिक सफलता, आध्यात्मिक उत्थान प्राप्त करणे, हे आहे.

देवीने चंड – मुंडांचा वध केला. म्हणून तिला चामुंडा म्हणतात. या कलियुगात ते राक्षस पुन्हा आले आहेत. सर्वच्या सर्व.

**देवीला प्रार्थना**

हे देवी कृपा करून आम्हाला आध्यात्मिक व्यक्तित्व दे. आध्यात्मिक उत्थान दे आणि आमच्या शत्रूंना नष्ट कर.

**श्रीमाताजींनी जोगव्याचा केलेला अनुवाद आणि व्याख्या –**

संत एकनाथ प्रतिष्ठान चे रहिवासी होते. त्याला पैठण असेही म्हणतात. त्यांनी हा जोगवा लिहिला होता. जोगवा म्हणजे 'योग'. त्या काळात त्यांनी जोगवा गायकाप्रमाणे गायला. त्यानंतर महाराष्ट्रात अनेक लोकांनी जोगवा गायला. कल्पना करा हे भजन इतक्या वर्षांपूर्वी लिहिले गेले आणि

आज तुम्ही त्याला सहजयोगानुरूप बनवले (तयार केले) आहे. त्या काळातील लोकांची इच्छा काय होती, याचे संक्षिप्त स्वरूपात आणि चांगल्या प्रकारे वर्णन केले आहे. महाराष्ट्रात देवीला 'बया' म्हणतात. तुम्हाला आश्चर्य वाटेल, की लहानपणी मलाही बया म्हणत. कुटुंबातील सर्व जण मला बया म्हणत.

भजनाच्या सुरुवातीला कवी म्हणतो, की 'मी आई (देवी)ला योग मागेन. महाराष्ट्रात खेड्यात योगाला 'जोगवा' म्हणतात, हे मी तुम्हाला सांगितले आहे. कवी या भजनाला 'बयेचा जोगवा' म्हणजे देवी बयेचा (प्रदत्त) जोगवा संबोधतो आणि कवी जोगवा मागतो. ''अनंदी निर्गुणी '' म्हणजे आद्य (Primordial) किंवा त्याच्याही आधीचा. जो गुणातीत असेल (आहे.) देवी पृथ्वीवर भवानीच्या रूपात अवतरली. ती महिषासुर राक्षसाचा वध करण्यासाठी आली, तसेच ती इथे 'त्रिविध तापांची करावी झोडणी' म्हणजे तीन प्रकारचे ताप, दुःखे दूर करण्यासाठी ती आली आहे. आता ती आम्हाला निर्वाण प्राप्त करून देण्यासाठी येणार आहे, हे देवीने तेव्हा सांगितले होते. कवी म्हणतो, की जेव्हा देवी

**जोगवा –**

जोगवा मागेन, आईचा
अनादि निर्गुणी प्रगटली, भवानी, उदे बाई, उदे बाई, उदे बाई, उदे
मोह महिषासुर मर्दना लागुनी, उदे बाई, उदे बाई, उदे बाई उदे
त्रिविध तापांची करावया झाडणी, उदे बाई, उदे बाई, उदे बाई, उदे
भक्ता लागुनी पावसी निर्वाणी, उदे बाई, उदे बाई उदे बाई उदे भक्ता लागुनी ।। १ ।।
द्वैत सारूनी, माळ मी घालीन हाती, बोधाचा झेंडा मी घेईन
भेदरहित गं वारिसी जाईन.
नवविध भक्तीचा करुनि नवरात्रा, करुनी निराकरण मागेन ज्ञानपुत्रा दंभ संसार सोडीन कुपुत्रा
पूर्णबोधाची भरीन मी परडी, आशा मनीषांच्या पाडीन मी दरडी
मनोविकारा करीन कुरवंडी, अमृतरसाची भरीन मी दुरडी
आता साजणी झाले मी निःसंग, विकल्प, नवऱ्याचा सोडियेला संग
काम, क्रोध हे सोडियले मात्र, केला मोकळा मार्ग हा सुरंग
ऐसा जोगवा मागुनी ठेविला, जाऊनि महाद्वारी नवस म्या फेडिला
एका जनार्दनी एकच देखिला, जन्ममरणाचा फेरा मी चुकविला

**– संत एकनाथ महाराज**

माझ्या 'निर्वाणा'साठी येईल तेव्हा मी काय करीन? माझ्यात अजून द्वैत आहे. म्हणजे मी स्वतःला परमात्म्याहून वेगळा मानतो. द्वैत म्हणजे या विश्वाला परमेश्वराहून वेगळे मानणे. जेव्हा आम्ही विचार करतो, की हे 'अद्वैत' आहे म्हणजे आम्ही परमात्म्याशी एकरूप झालो आहोत. तेव्हा मी या द्वैताला समाप्त करीन, संपवीन आणि तिच्या (देवीच्या) गळ्यात गुलाबाच्या फुलांची माळ घालीन. (हार घालीन) माझ्या हातात ज्ञानाने प्रज्वलित झालेला झेंडा घेईन आणि जातीपाती, धर्मांचा भेदभाव न करता मी देवीदर्शनाला जाईन. त्यानंतर मी काय करीन? यानंतर नऊ दिवस नऊ प्रकारे देवीची भक्ती करीन.

तेव्हा मी इतर सर्व मागण्या सोडून देईन आणि ज्ञानरूपी पुत्राची कामना (इच्छा) करीन. त्यानंतर मी काय करीन? (कवी हे गीत स्त्रीच्या रूपात गात आहे.) तो म्हणतो, हे विश्व, जग ढोंगांनी भरले आहे. अशा वाईट मुलाला, पुत्राला (ढोंग) मी सोडून देईन आणि त्या टोपलीत (फुलांनी भरलेल्या टोपलीत) मी सर्व प्रकाशमान ज्ञान भरून घेईन. साऱ्या इच्छा – आकांक्षा पूर्णपणे नष्ट करीन. ''मनोविकारा करीन कुरवंडी'' मी साऱ्या मनोविकारांना, बंधनांनी व्यापलेल्या मस्तकाला तोडून टाकीन. (जसे हिंदीत म्हणतात, अपने खराब आँख को निकाल दे)

शेवटी मी आई गर्भातून अमृतरसाची भरीन मी दुरडी । अमृत काढून ही दुरडी भरून टाकीन.

प्रेयसीच्या रूपात कवी आपल्या सखीला म्हणतो, हे सखी आता मी पूर्ण निःसंग झालो आहे. संशयरूपी पतीला मी सोडून देते. त्याग करते. त्यामुळे आता माझ्या मनात संदेह नाही. त्यानंतर ती म्हणते की काम, क्रोधरूपी प्रेताचे अंत्यसंस्कार करणाऱ्या या दोन 'मांग' लोकांचा मी त्याग करते आणि उरलेली सर्व नकारात्मकता मी सोडून देते. आता मी माझ्या सुरंगाला (बोगद्याला) (सुषुम्नाला) उघडले आहे.

मी हाच योग परमात्म्याकडे मागितला होता. तो प्राप्त करून त्याला माझ्याजवळ सांभाळून ठेवले आहे. त्या शक्तिमान परमेश्वराच्या बुलंद दरवाजावर जाऊन त्याला धन्यवाद दिले. आता मी जीवनमृत्यूच्या भयापासून (समस्येपासून) मुक्त झाले आहे.

याप्रकारे अतिशय स्पष्टपणे एक स्त्री गाते आहे. त्या काळात संत एकनाथांनी हा जोगवा लिहिला. हे सर्व लिहिले आणि तुम्ही ते फळ रूपात

त्याचप्रकारे प्राप्त करीत आहात.

आता आमच्या संबंधी आणि इतरांच्या संबंधी आपल्यालापण घ्यायचा आहे. आम्ही एक महान तथ्य लक्षात ठेवायला हवे. आता आपण योगी आहोत. एका सहजयोगीच्या रूपात आपल्या आचरणात, स्वभावाने इतरांशी वागताना, कोणत्याही संकटाचा, परिस्थितीचा सामना करताना, कोणत्याही समस्येचे उत्तर शोधताना, सर्वोत्कृष्ट (Par - excellence) असायला हवे. तुमच्यापैकी काही जणांचा मेंदू (मस्तिष्क) खूप चांगला आहे; परंतु हृदयाची कमतरता आहे. काहींचे हृदय विशाल आहे. पण मेंदूत कमतरता आहे. म्हणजे संतुलन आणणे आवश्यक आहे.

**महानतमपेक्षा महानतम ज्ञानाने हे समजले पाहिजे, की 'परमात्म्याच प्रेम आहे'. ते फक्त प्रेमच आहे आणि तुम्ही एका सहजयोगीलाही प्रेम देऊ शकत नसाल तर तुम्ही हे नक्की समजा, की तुमच्यात काहीतरी भयंकर कमतरता आहे. ती कमतरता नष्ट होणे आवश्यक आहे. प्रेम तुमच्यात असायलाच हवे. कारण तुम्ही सच्चे सहजयोगी आहात. या प्रेमाला आपण निर्व्याज प्रेम म्हणतो. निर्व्याज म्हणजे ज्याच्यावर कोणतेही व्याज असत नाही. फक्त मुद्दल असते.**

सारांश हा, की तुम्ही एकमेकांवर असे प्रेम करता की तुम्ही केवळ देतच असता. कशाचीही अपेक्षा करीत नाही. सतत देत राहा. कारण देण्यातला आनंद सर्वोच्च आहे. माझ्या अनुभवानुसार मी तुम्हाला ही गोष्ट सांगते, की मला अत्युच्च आनंद कधी मिळतो? जेव्हा कोणाला मी आत्मसाक्षात्कार देते तेव्हा आणि दुसरा आनंद, मी माझ्या वस्तू इतरांना देते तेव्हा मिळतो. तिसरा आनंद हा आहे, की मी या सर्व बाबी इतरांना देऊ शकते.

**आता तुम्ही केवळ प्राप्त करणारेच नाही आहात. तुमच्यात देण्याचीही क्षमता आहे. तुम्हाला हे माहीत असायला हवे की तुम्ही दुसऱ्यांना काय दिले? याच्याव्यतिरिक्त जर आतापण लोकांना तुम्ही आपला राग देत असाल, आपला स्वार्थ इ. वाईट गोष्टी दर्शवित असाल तर ही गोष्ट एका सहजयोग्याला शोभत नाही. अशा वेळी तुम्ही हे समजायला हवे, की अजूनही माझ्यात काहीतरी कमतरता राहिल्या आहेत. आताही जर तुम्ही छोट्या छोट्या गोष्टींकडे लक्ष देत असाल जसे कपडे, खाणे-पिणे, सुख-सुविधा आदींकडे जरुरीपेक्षा जास्त लक्ष देत असाल तर नक्की समजा, की तुमच्यात काही त्रुटी आहेत. तुमचे व्यक्तिमत्त्व अजून अपूर्ण आहे. ''एक वाक्य नेहमी ध्यानात ठेवा, स्वतःला प्रश्न करा, की मी माझे लक्ष्य प्राप्त केले आहे काय?''**

हा प्रश्न तुम्ही नेहमी स्वतःला विचारा, की मी माझे लक्ष्य प्राप्त केले आहे का? या प्रश्नाच्या उत्तराने स्थिती स्पष्ट होईल. कारण आता तुम्ही स्वतःचे गुरू आहात. तुम्ही जाणता आणि समजताही. सहजयोग तुम्ही मस्तकातून (विचाराने) समजता. पण सहजयोग जेव्हा तुमच्या रोमारोमांत प्रवेश करतो आणि पूर्णज्ञान तुमच्या अस्तित्वाचे अंगप्रत्यंग बनते तेव्हा स्थिती अगदी वेगळी होते. कोणत्याही गोष्टीला सामोरे जाताना आत्मसाक्षात्कारी व्यक्तीचा दृष्टिकोन बिलकुल वेगळा असतो जसे -

**माझ्यासमोर एखादी समस्या आली तर मी त्वरित ध्यानात जाते आणि समस्या सुटते. कारण ती माझी शक्ती आहे.** याचप्रकारे तुम्हाला काही समस्या असेल आणि तुम्ही ध्यानात गेला, तर **माझी शक्ती तुमच्या समस्येचे समाधान करील. याचा अर्थ आहे, की ध्यान अवस्थेत तुम्ही माझ्यापुढे समर्पित होता, तेव्हा समस्या सोडविणे हे माझे काम असते. पण जर तुम्ही मनातल्या मनात (मानसिक) योजना बनवता आणि समस्या सोडविण्याचा प्रयत्न कराल, तर तुम्ही जाळ्यात फसाल. सगळ्यात उत्तम हे आहे, की कधीही समस्या निर्माण झाली तरी ध्यानात जा. प्रार्थना करण्याची काही गरज नाही. ती समस्या घेऊन ध्यान करा आणि तुम्ही समस्येवर मात कराल. विजय तुमचा होईल.**

**आज तुम्ही मला विजयासंबंधी विचारत होतात. मी तुम्हाला सांगते, की ध्यान अवस्थारूपी किल्ल्यात तुम्ही अत्यंत सुरक्षित आहात. ध्यान अवस्थेत तुम्ही उत्तम प्रकारे उन्नत होऊ शकता. दुसऱ्या कोणत्याही अवस्थेत तुम्ही उन्नत होऊ शकत नाही. ही अवस्था वृक्षाला उन्हाप्रमाणे आहे. तुम्ही ध्यानात राहा. निर्विचारितेत राहायला हवे. तुम्ही कोणाला विरोध करू नका, कोणाशी असहमत असू नका किंवा काही सांगू नका. विशेषतः अन्य सहयोगींना तुम्ही काहीही सांगू नका. कोणाला जर वाईट वागताना बघितले, तर बस ध्यानात जा. आता वस्तूला परावर्तित होताना बघून हैराण व्हाल. तीच तुमची शक्ती आहे. या विश्वात किती लोकांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे? खूप कमी लोकांना. तो पुढे जात आहे, ठीक आहे. सर्व कार्यान्वित करीत आहे, पण त्यांच्यात काही गोष्टींचा अभाव आहे आणि ते म्हणजे ध्यानशक्ती.**

सर्वोत्तम गोष्ट ही आहे, की तुम्ही समर्पण करा. समर्पण करणे अपेक्षेप्रमाणे सुगम सोपे आहे. प्रत्येक वेळेस तुम्ही फक्त मला तुमच्या हृदयात ठेवा. (प्रस्थापित करा) हा उत्तम उपाय आहे. तेव्हा त्याशिवाय तुम्ही जगू शकणार नाही. तुम्ही स्वतःत हरवलेले असाल. हे एक प्रकारे निर्लिप्त प्रेम आहे. तुम्हाला वाटेल की तुम्ही अत्यंत शांत, आशीर्वादित आणि संतुष्ट आहात. तेव्हा तुम्हाला कोणत्याच गोष्टीची आवश्यकता राहणार नाही. अशी अवस्था व्यक्तीने प्राप्त करायला हवी. तुम्हा लोकांना ही अवस्था प्राप्त करणे अत्यंत सहज आहे. कारण मी साक्षात तुमच्याबरोबर आहे; परंतु मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे सहजयोगात पहिली समस्या ही आहे, की तुम्ही प्रथम मला ओळखा. पण माझी ओळख पटणे जरा अवघड आहे कारण मी 'महामाया' आहे आणि तुम्ही नेहमी मायेच्या जाळ्यात अडकता. त्या दिवशी मी तुम्हाला सांगितले होते, की माझ्या खऱ्या रूपापुढे तुम्ही टिकू

शकणार नाही. हातात तलवार आणि वाघावर स्वार होणाऱ्या व्यक्तिची कल्पना करा तुम्ही तिच्यासमोर टिकू शकणार नाही. म्हणून मला महामाया व्हावे लागले आणि हेच वास्तविक सत्य आहे. वास्तविकता आहे. माझ्या आताच्या रूपामुळे (मानवी) तुम्ही माझ्या समीप येऊ शकता. माझ्याशी बोलू शकता आणि हवे असेल तर माझ्याकडून काही शिकायचे असेल तर शिकूही शकता. अशा उत्तम प्रकारे तुम्ही मी विचारविनिमय करू शकता. सर्व बाबींची रहस्ये मी तुमच्यापुढे उलगडू शकते. उत्थानासंबंधी मी सर्वकाही सांगू शकेन. मात्र, हे लक्षात ठेवा, की तुम्ही महामायेच्या समोर बसला आहात. ते खूप मदत करणारे आहे. त्यामुळे 'महामायेच्या अवतारा'मुळे संभ्रमात पडू नका. आपल्या मर्यादांमध्ये, समजून उमजून प्रत्येक कामात हे लक्ष ठेवायला हवे, की आम्ही चुका करू नयेत, आम्ही समर्पित व्हायला हवे. तुम्ही स्वतःच सर्वकाही शिकाल. तुम्हाला शिकविण्यासाठी काही नाही.

ही अवस्था एखाद्या झाडासारखी आहे. जेव्हा ते तारुण्यात येते तेव्हा फुले देते. फूले पक्व झाले की फळे येतात. असेच तुम्हालाही तयार केले आहे. याप्रकारे तुम्ही प्रगती करता. **तेव्हा तुम्हाला प्रगती समजते. त्याचा आनंद तुम्ही घेता आणि प्रसन्नतेने जीवन व्यतित करता. माझे अंतिम लक्ष्य हे आहे, की मी तुम्हाला सुख देईन, आनंद देईन. यासाठीच हा सारा संघर्ष चालू आहे. मला आशा आहे, की मी माझे लक्ष्य आणि तुमचेही लक्ष्य पूर्ण करू शकेन.**

परमात्मा तुम्हाला आशीर्वादित करो!

------------------------------

# षष्ठी – नवरात्र, १६–१०–१९८८

आज आम्ही इथे शक्तीची पूजा करायला जमलो आहोत. आतापर्यंत अनेक साधू – संतांनी, ऋषीमुनींनी शक्तीबद्दल खूप लिहिले आणि सांगितले आहे. जे शक्तीचे वर्णन गद्यात करू शकले नाहीत त्यांनी पद्यात वर्णन केले, गीते लिहिली आणि त्याचे अनेक अर्थही निघाले. पण एक गोष्ट आम्हाला माहीत नाही, की प्रत्येक माणसामध्ये या सर्व शक्ती सुप्तावस्थेत विद्यमान असतात आणि माणूस या सर्व शक्ती आपल्यात जागृत करू शकतो. सुप्तावस्थेत असणाऱ्या या शक्तींचा अंत नाही. त्यांचे अनुमान करू शकेल का? कारण तसे बघितले तर पस्तीस कोटी देव तुमच्यात विद्यमान आहेत. त्याव्यतिरिक्त न जाणो कितीतरी शक्ती त्यांना चालवतात. पण आम्ही हे समजू शकतो, की आज जो आत्मसाक्षात्कार आम्हाला प्राप्त झाला आहे त्यात कोणत्या ना कोणत्या शक्तींचे कार्य निश्चित आहे. त्या कार्याशिवाय आत्मसाक्षात्कार प्राप्त होऊ शकत नाही. आत्मसाक्षात्कार प्राप्त करताना आम्हाला वाटते हे सहजच झाले.

'सहज' चे दोन अर्थ आहेत. सहजचा एक अर्थ आहे, विनासायास. अगदी सहज घडले, झाले. सरळ सोपे झाले. दुसरा अर्थ असा आहे, की जशी एखादी जिवंत क्रिया आपोआप होते, तसाच तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला. पण ही जी जिवंत क्रिया आहे तिच्याबद्दल तुम्ही विचार करू लागाल तर तुमची बुद्धी चालणार नाही. समजा, की तुम्ही एक झाड बघितले. त्या झाडाकडे तुम्ही दृष्टिक्षेप टाकला तर तुम्ही म्हणाल हे अमुक अमुक झाड आहे. पण या झाडाला या रूपात, असेच, इतके उंच कोणी केले? ती कोणती शक्ती आहे? कोणत्या शक्तीने या झाडाला इथे, अशा प्रकारे बनवले? जे हे झाड आपल्या सीमांमध्ये राहूनही आपले रूप, आकार प्राप्त करून वाढले. सगळ्यात आश्चर्यकारक वस्तू आहे ती म्हणजे मानव. मनुष्य जो बनवला गेला आहे. मनुष्याचे जे भविष्य आहे, ते त्याला प्राप्त होऊ शकते. मात्र, त्याची पहिली पायरी आहे आत्मसाक्षात्कार. जसा एखादा दिवा लावायचा असेल तर सर्वप्रथम त्यात वात घालावी लागते. ती उजळावी लागते. त्याचप्रकारे एकदा तुमच्या अंतरात ज्योत जागृत झाली, की तुम्ही ती पुन्हा प्रज्वलित करू शकता किंवा तिला वाढवू शकता. पण प्रथम कार्य आहे ज्योत प्रकाशमान होणे आणि त्यासाठी नितांत आवश्यक आहे आत्मसाक्षात्कार; परंतु तरीही आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर सर्व शक्ती जागृत होत नाहीत. म्हणून साधू, संत आणि ऋषीमुनींनी सांगितले आहे, की तुम्ही देवीची उपासना करा. पूजा करा; परंतु ज्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला नाही त्याला देवीची पूजा करण्याचा अधिकार नाही. खूप लोकांनी मला सांगितले, की त्यांनी सप्तशतीचे वाचन (पाठ) केले आणि हवन (होम) केले तर त्यांच्यावर मोठे संकट येते आणि त्यांना खूप त्रास होतो. कष्ट सहन करावे लागतात. त्यांना हे विचारायला हवे, की त्यांनी होम कोणाकडून करवून घेतला? तेव्हा ते म्हणतात, की आम्ही सात ब्राह्मणांना बोलावले होते. पण ते ब्राह्मण नव्हेत. ज्यांनी ब्रह्म जाणले नाही ते ब्राह्मण नव्हेत. अशा ब्राह्मणांकडून हवन करविल्यानेच देवी रुष्ट झाली. तुम्हाला त्रास झाला. आता तुम्हाला एक मोठा अधिकार प्राप्त आहे, की तुम्ही देवीची पूजा करू शकता आणि प्रत्यक्षातही पूजा करू शकता. हा अधिकार सर्वांना प्राप्त नाही. जर कोणी असा प्रयत्न केला तर त्याचा उलट परिणाम होतो. सगळ्यात मोठी आणि महत्त्वाची गोष्ट ही आहे, की शक्ती जी तुमच्यासाठी आरामदेही आहे, जितकी ती तुमच्या सृजनाची व्यवस्था, काळजी करते, जितकी ती तुमच्याप्रति उदार आहे, प्रेमळ आहे, तितकीच ती क्रूर आणि रागीट आहे. मधे काहीच नाही. एकतर अति उदार आहे किंवा एकतर अतिशय क्रूर आहे. मधे कोणताच मामला चालत नाही. कारण हे आहे, की जे लोक महादुष्ट व राक्षक आहेत, जे लोकांना भूलवतात आणि कलियुगात स्वतःला वेगवेगळ्या स्वरूपात दर्शवितात. कोणी साधू झाले आहे, तर कोणी पंडित. कोणी मंदिरात बसला आहे, तर कोणी मशिदीत बसलाय. कोणी मुल्ला आहे, तर कोणी पोप बनले आहे. कुठे कोणी राजकीय नेता आहे. असे वेगवेगळे कपडे

घालून जो स्वतःला लपवू पाहत आहे. तो राक्षसी प्रवृत्तीचा माणूस होय. त्याचा नाश होणे अत्यंत आवश्यक आहे. पण या ज्या नाश करणाऱ्या शक्ती आहेत तिकडे तुम्हाला जाण्याची आवश्यकता नाही. तुम्ही फक्त इच्छा व्यक्त करा आणि या शक्ती आपल्या आपण स्वतः ते कार्य करून टाकतील.

**सर्व जगात हे जे चैतन्य वाहत आहे ती त्या महामायेची शक्ती आहे. महामायेच्या या शक्तीमुळे सर्व कार्ये होतात. ही शक्ती सर्व विचार करते, सर्व समजते, सर्वकाही नीटनेटक्या रूपात करते. ज्याला म्हणतात आयोजित करते. सर्वांत मोठी आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही शक्ती तुमच्यावर प्रेम करते. तिचे प्रेम निर्व्याज आहे. हे प्रेम काही अपेक्षा करीत नाही फक्त देण्याची इच्छा आहे. तुम्हाला मोठे करण्याची, तुम्हाला वाढविण्याची कामना आहे. तुम्हाला पुढे नेण्याची इच्छा आहे. तुमचे भले व्हावे ही इच्छा आहे. मात्र, याबरोबरच तुमच्या मार्गातील अडथळे बनलेल्या काट्यांना दूर करणे, तुमच्या धर्मात अडचणी निर्माण करणाऱ्यांना दूर सारणे किंवा कोणत्याही प्रकारे तुम्हाला त्रास देणाऱ्या अशा लोकांचा नाश करणे आवश्यक आहे.** पण त्यासाठी तुम्ही तुमची शक्ती खर्च करू नका. तुम्ही फक्त त्या शक्तीला आवाहन करा. देवीला आवाहन करून प्रार्थना करा, की या अमानुष शक्तींना हे देवी तू नष्ट कर. ही पहिली गोष्ट झाली. तुम्हाला खरे तर सुट्टी मिळाली आहे की, कोणीही तुमच्यावर अत्याचार केले, कोणी तुमच्याबद्दल वाईटसाईट बोलले, कोणी त्रास दिला, तर तुमच्यात एक विशेष गोष्ट आहे, तुम्ही निर्विचारितेत जा. असे केल्यावर सर्व गोष्टींकडे तुम्ही साक्षीभावाने, तटस्थपणे पाहू शकता. एका नाटकाच्या रूपात बघा. त्रयस्थ व्हा. जसे मोठा वेडा माणूस आहे. माझ्या मागे लागला आहे, याला काय करायचे आहे? त्याचे वेडेपण पाहा, त्याला होणारा त्रास पाहा, त्याचा मनस्ताप बघा आणि त्याला हसा आणि म्हणा, की मोठा मूर्ख किंवा बेवकुफ माणूस आहे. त्याच्यासाठी कोणताही त्रास तुम्ही घेण्याचे कारण नाही. त्याच्यासाठी तुम्ही फक्त तुमच्या निर्विचारितेच्या किल्ल्यात जायचे आहे. निर्विचारितेत गेल्यावर तुमचा सांभाळ करणाऱ्या शक्ती आहेत. आनंद देणाऱ्या शक्ती आहेत. प्रेम देणाऱ्या शक्ती आहेत. त्या सर्वच्या सर्व एकत्र येऊन तुमच्या आत येतील; परंतु जोपर्यंत या गोष्टीत अडकून राहाल, तुम्ही जोपर्यंत असा विचार कराल, की मी याचा सर्वनाश कसा करू? याला मी कसा नष्ट करू? मारून टाकू. मी काय उपाय करू? अशा प्रकारे तुम्ही षडयंत्र रचत राहता. तुम्हाला खरे सांगते, की त्या षडयंत्राचा परिणाम तुमच्यावरच होईल. त्या अनिष्ट राक्षसी शक्तीवर नाही.

रामदास स्वामी म्हणतात, ''अल्प धारिष्ट म्हणजे तुमच्याजवळ जे थोडेसे धैर्य आहे ते परमात्मा बघत आहे; परंतु तुमच्या इतक्या विपुल शक्ती आहेत, की प्रथम त्यांना पूर्णपणे प्रफुल्लित करायला हवे. स्वतःचा खूप आदर करायला हवा. त्यांना समजले पाहिजे, जेव्हा या शक्ती नष्ट होतात, सहजयोगींमध्येही जागृत होतात आणि नष्ट होतात. त्याचे कारण काय आहे? एकदा जागृत झालेली शक्ती पुन्हा नष्ट का होते? जसे एका माणसात आज अशी शक्ती आहे, की तो एका मोठ्या कलेत पारंगत, निपुण झाला. सहजयोगात तुमच्यापैकी बरेच जण कलेत निपुण झाले आहेत. कलेसंबंधी त्यांना पूर्ण माहिती झाली आहे. त्यांच्यात एक प्रकारची चेतना आली, नवनिर्मितीत ते खूप पुढे निघून गेले. लोक त्याला बघून म्हणतात. वाऽ असा कलाकार कधी बघितला नाही. पण परत तो कलाकार त्या कलेत अडकतो, जे यश, जे नाव त्याला मिळाले त्यात अडकतो. जेव्हा तो अशा गोष्टीत अडकतो तेव्हा हळूहळू त्याच्या शक्ती नष्ट होतात. कारण त्याच्या शक्तीही त्यात अडकल्या जातात. मी मागेही एकदा सांगितले होते, की एखाद्या वृक्षाच्या आतून वाहणारा प्राणरस प्रत्येक गोष्टीत, प्रत्येक पान, फांदी, सर्व फुले यांच्यात फिरून परत येतो. तशाच ज्या काही शक्ती तुमच्यात प्रवाहित आहेत, ज्या शक्तींमुळे तुम्ही कार्य करीत आहात, त्या सर्व बाबी या शक्तीमुळेच होत असतात आणि त्यात तुम्हाला अडखळण्याचे, अडकण्याचे कारण नाही. तुम्ही केवळ निमित्त मात्र आहात. आपण केवळ निमित्तमात्र आहात असे जेव्हा तुम्हाला समजेल, तेव्हा या तुमच्या शक्ती कधी दुर्बल होणार नाहीत, कधी नष्ट होणार नाहीत. या प्रकारे खूपदा मी बघितले आहे, की सहजयोगींचे चित्त काही गोष्टींमध्ये अडकते. कोणत्याही गोष्टींनी मोठेपण मिळाले किंवा एखाद्या गोष्टीत प्रगती साधली. तुम्हाला माहीत असेल काही विद्यार्थी वर्गात साधारण होते. प्रथम श्रेणीत (First Class) येऊ लागले. सर्व चांगले झाले आणि जर ते विचार करू लागले, की मी खूप मोठा झालो, हुशार झालो. जसा हा मोठेपणाचा विचार मनात आला त्या वेळेस या प्रभावित शक्ती लुप्त होऊ लागतात. नष्ट व्हायला लागतात आणि गळून पडतात.

आता हा विचार करा, की आम्हाला काय करायचे आहे? उदाहरणार्थ एखाद्या माणसाचा बिझनेस अचानक वाढला. त्याला खूप पैसे मिळू लागले. त्याच्याकडे काही विशेष गोष्ट आली तर त्याने काय करावे? त्याने सतत सतर्क राहायला हवे आणि म्हणावे, की माते हे सर्व तूच करतेस. मी काही करीत नाही. ही आपलीच शक्ती कार्य करीत आहे. सर्व तूच करवून घेतेस. मी काही करीत नाही. सतर्क राहायला हवे. कारण यानंतरच्या काळात तुमच्या शक्ती संपून जातील तेव्हा तुम्हीच म्हणाला माते सर्वकाही बुडाले, सर्व संपले. हे कसे झाले? जी कोणी शक्ती कार्य करीत आहे तिला कार्यान्वित होऊ द्या. जसे एक झाड आहे. त्या झाडाची पाने कशी गळतात? तुम्ही कधी असा विचार केला आहे का? झाडात मधल्या काळात एक झाकण (बूच, कॉर्क) मधे येते. पाने आणि झाड यांच्यामध्ये झाकण येते. जीवनरस खंडित होतो. पाने झाडापासून विलग होतात. पिवळी पडतात. गळू लागतात.

आज तुमची शक्ती एका महान शक्तीशी जोडलेली आहे. त्या शक्तीकडून तुम्ही सर्व प्राप्त करता. पण जसे तुम्ही स्वतः कोणीतरी समजू लागाल. अहंकार निर्माण होईल, जी अनेक कामे आहेत त्यातील स्पर्धेत अडकलात तर महाशक्ती आणि तुम्ही यात दरी निर्माण होते आणि या दरीमुळे पूर्वी जे माणसाने मिळविले होते ते पुन्हा प्राप्त करू शकणार नाही. कारण तो तर एक निमित्तमात्र होता. जी शक्ती त्याच्या आतून वाहत होती, कार्यान्वित होती

ती दरीमुळे दूर गेली. तिचा संपर्क मधेच कापला गेला. आता जर माइकची शक्ती (वीज) कट झाली तर माझे प्रवचन कदाचित बंद होणार नाही, पण असे होऊ शकते. आम्हाला एक गोष्ट खूप चांगल्याप्रकारे लक्षात ठेवली पाहिजे, की आमच्यात ज्या शक्ती जागृत झाल्या आहेत, आमचे व्यक्तित्व विशेष स्वरूपात दर्शविणारी जी कोणती अंतरिक आणि खास प्रभा आहे त्या शक्तीला थांबवू नये. याउपर आम्ही असाही विचार करता कामा नये, की आम्ही खूप मोठे झालो आहोत किंवा आम्ही काहीतरी मोठे मिळविले आहे. कधी कधी असेही होते, की जेव्हा ही शक्ती तुमच्यात जागृत होते तेव्हा एकप्रकारची उदासीनता येते. जसे त्यांनी किती मजल मारली; मी अजून इथेच आहे. त्यांनी हे मिळवले; मी काही केले नाही आणि अशा नकारात्मक विचारात माणूस अडकत जातो. काही लोक तर असे असतात जे छोट्या छोट्या गोष्टीने नाराज होतात. जसे तुला बॅग मिळाली; मला नाही मिळाली. का बरे? गणपतीपुळ्यात मला असे खूप विचित्र अनुभव आले. काही लोक माझ्यापाशी आले आणि म्हणाले, आम्हाला या वस्तूचा डबा द्या किंवा मला हे मिळाले, पण त्याला ते मिळाले नाही. त्यालापण द्या. मी म्हणाले, 'ही काय पद्धत झाली?' हे काय आहे. तुम्ही गणपतीपुळ्याला पूजेला आलात. त्याची मजा लुटा, मौज करा. त्या मजेत, आनंदात या छोट्या छोट्या गोष्टींबद्दल विचार करायचा नाही. छोट्या छोट्या गोष्टीत ते खूप दुःखी होत. कधी कधी पती – पत्नीत भांडणे होतात. पत्नी नीट वागत नसेल तर पती रडत बसतो. पती रस्ता चुकला असेल तर पत्नी रडत बसते. अरे बाबा, मागच्या जन्मात तुमची किती लग्ने झाली? या जन्मात एकच लग्न केले आहे ते व्यवस्थित निभवा. त्याच्यामागे रात्रंदिवस दुःखी होऊ नका. रडू नका. माझ्या मुलाचे हे झाले, माझ्या मुलीला ते झाले. असे झाले अन् तसे झाले. याचा काही शेवट आहे? याचा अंत काय? जीवनात या इतक्या लहान गोष्टी आहेत, की चिमटीत धरताही येत नाहीत. इतक्या क्षुद्र गोष्टी माझ्या पकडीत येत नाहीत. कोणीही येते आणि अशा लहानसहान गोष्टी मला सांगते. मला तर खूप हसू येते. पण मी गुपचूप ऐकते. मी सांगते बघा, तुम्ही 'सहजयोगी' आहात. मी तुमचे हृदय सागराप्रमाणे विशाल केले आहे. हिमालयाप्रमाणे तुमचे मस्तक, मेंदू आहे. तुम्ही या काय लहानसहान गोष्टीत अडकता? त्यांना काही अर्थ नाही. याची गोष्ट, त्याची गोष्ट, दुनियाभरच्या फालतू गोष्टी करता, सांगता आणि जी 'सहज'संबंधी आहे त्यावर किती कमी बोलता. तेथे मौनीबाबा होता. सहजयोगात आम्ही लक्षच दिले नाही असे म्हणता किंवा सहजयोगात मौन साधता.

आता मी असे ऐकले, की पुण्यात 'सहज' केंद्रावर लोक कमी येतात कारण टी.व्ही.वर महाभारत सुरू झाले आहे. मी अजून महाभारत बघितले नाही. एक बघितले तेच खूप आहे. आता पुन्हा बघण्याची काय गरज आहे? आपल्याला दुसरे महाभारत करायचे आहे काय? ते महाभारत बघत बसले केव्हा? पूजा सोडून टी.व्ही. बघता. इतका शौक आहे तर व्हिडिओ फिल्म मागवा आणि घरी शांतपणे बघा, पण पूजा सोडून, आपले सेंटर सोडून तुम्ही महाभारत बघत बसले तर तुम्हाला ती शक्ती कुठून दिसणार? ती महाभारतात गेली. महाभारत होऊन हजारो वर्षे झाली आणि ती शक्तीही त्यात विलीन झाली. नष्ट झाली. मनोरंजनावरही लोकांचे खूप लक्ष असते. कशानेही आमचे मनोरंजन होते. अशा अनेक गोष्टींत माणूस गुंतत जातो. त्यामुळे कुठल्याही बाबतीत अतिरेक करणे हे सहजयोगाविरोधात जाते. जर संगीताचा शौक असेल तर फक्त संगीत आणि संगीतच. मग ध्यानधारणाही नको. बस, संगीतात मस्त राहायचे. मनोरंजन सुरू. मग कवितेत गेले तर कविताच कविता. त्यातच गुंतत जायचे. कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती करणे सहजयोगाविरुद्ध होय. ही गोष्ट गाठ बांधून लक्षात ठेवा. दुसरी गोष्ट, ज्या आमच्या शक्ती आहेत त्या सम्यक असायला हव्यात. तरच आपल्याला सम्यक ज्ञान मिळेल. सम्यक म्हणजे संघटित ज्ञान. एकाच गोष्टीच्या मागे लागलात आणि एकच गोष्ट बघितली, तर सम्यक ज्ञान मिळणार नाही. एकाच बाबीचे ज्ञान होईल; अनेकाचे नाही. मी बघितले आहे, काही स्त्रिया असतात. शिकलेल्या असतात, पण कधी वर्तमानपत्र वाचत नाहीत. जगात काय चालले आहे; याचा त्यांना पत्ताच नसतो. राहिले पुरुष, तर त्यांना हेच माहीत असते की कोणाकडे, कुठले पदार्थ चांगले बनतात. चविष्ट जेवण जेवण्यासाठी कोणाकडे जायला हवे. भोजनाच्या बाबतीत हिंदुस्थानी पुरुष खूप हुशार आहेत. स्त्रियाही पुरुषांना मूर्ख बनविण्यात खूप हुशार आहेत. वेगवेगळ्या प्रकारची पक्वान्ने, चवदार स्वयंपाक करून पुरुषांना खाऊ घालतात. खूश करून टाकतात. यात स्त्री – पुरुष दोघांच्या शक्ती अडकतात. दोघांच्याही रात्रंदिवस हे जेवणाबद्दल, स्वयंपाकाबद्दल विचार करतात. काय शिजवायचे, कधी शिजवायचे, कधी वाढायचे, याचा स्त्रिया सतत विचार करत असतात. तर हे खायचे, ते खायचे, कधी खायचे, कुठे किती खायचे, याचा विचार पुरुष करतात. यात स्त्री, पुरुष दोघांचीही शक्ती नष्ट होते. मी त्यावर हा उपाय शोधला, की सहजयोगींना स्वतःचा स्वयंपाक स्वतःच करता यायला हवा. कोणी म्हणाले, मला हे खायचे आहे, तर बनवा आणि खा. तुम्ही स्वतः स्वयंपाक कराल तेव्हा कळेल. स्वादिष्ट स्वयंपाक करणे किती अवघड काम आहे. समोर आयते ताट वाढून आल्यावर त्याला नावे ठेवणे सोपे असते; परंतु टीकाटिपण्णी करणे हाच मुळात मूर्खपणा आहे. कोणालाही बरे – वाईट म्हणायचा आम्हाला अधिकारच नाही. अशा छोट्या छोट्या तक्रारी घेऊन लोक माझ्याकडे येतात तेव्हा मला खूप आश्चर्य वाटते. तुम्ही आता साधू झाला आहात. तुमच्या आत एक मोठी शक्ती आली आहे. मी सांगते त्याची प्रचीती घ्या. आता तुम्ही जमिनीवर झोपू शकता, तुम्ही दहा दहा दिवस उपाशी राहू शकता. कसेही जेवण असले तरी तुम्ही खाल, जराही नावे ठेवणार नाहीत. आपल्या परदेशी सहजयोगींकडे बघा. कधी ते भारतात आले आणि व्यवस्था चांगली नसली तरी ते तक्रार करीत नाहीत. कशाही परिस्थितीत, कसेही राहतात. ब्रह्मपुरीला खूप अव्यवस्था होती. तिथे खाणे-पिणे, राहणे सर्वांची गैरव्यवस्था झाली. परदेशी सहजयोगींना नंतर मी विचारले, की तुम्हाला सगळ्यात जास्त मजा कुठे आली? ते म्हणाले, ब्रह्मपुरीत. मला काहीच समजले नाही. ब्रह्मपुरीबद्दल तर खूप तक्रारी आल्या होत्या. मग? मी त्यांना विचारले, की ब्रह्मपुरीत असे काय झाले? तर म्हणाले, तिथे कृष्णा वाहते. तिच्या किनारी बसलो तर वाटते माँ तुमचा प्रवाह

वाहतो आहे. ते सर्व याबद्दलच बोलत होते. ते लोक खाण्यापिण्याबद्दल विचार करीत नव्हते. त्यामुळे कधी कधी मला लोक सांगतात, की आपले समर्पण कमी पडते. त्याचे कारण हे आहे, की आम्ही लोक खूपसे संभ्रमित लोक आहोत. आमच्या खूप जुन्या परंपरा आहेत. इथे अनेक साधू – संत, मोठमोठी माणसे, मोठमोठे आदर्श झाले. त्या आदर्शांमुळे आम्हाला चांगले काय, योग्य काय, याचे ज्ञान झाले; परंतु त्याबरोबरच आमच्यात एक ढोंगीवृत्ती आली. आम्ही ढोंग करतो. कोणीही स्वतःला राम म्हणवतो, कोणीही माणूस स्वतःला भगवान, देव म्हणू शकतो, कोणीही स्वतःला सीताजी म्हणवून घेऊ शकते. या ढोंगीपणाची आमच्याकडे मोठी शक्ती आहे. एका साहेबांनी मला सांगितले, बघा तो देव आहे. मी म्हटले, असा कसा तो देव आहे? ते म्हणाले, तो स्वत: तसे म्हणतो. मी म्हणाले, त्याने म्हटले मी देव आहे आणि तो देव झाला. देवत्व असे येत नाही. देवत्वाचे काही निकष आहेत. जो माणूस फुलाचा सुगंध घेऊ शकत नाही. तो कसा देव असेल? मग ते असे का सांगतात? त्या व्यक्तीने मला विचारले. मी म्हणाले, कारण देव म्हणविणारा 'तुम्ही नाही आहात'. देव म्हणविणाऱ्यांना हेही समजत नाही, की इतके धडधडीत खोटे बोलणे, ठासून खोटे पटविणे, कशासाठी? तर पैसे कमावण्यासाठी. ठीक आहे. पैसे मिळवा; परंतु त्या बदल्यात जे अध्यात्म आम्हाला तो देतो ते काय आहे? पैसे द्या. अध्यात्म घ्या, असे हे आहे. अशा प्रकारच्या ढोंगीपणाची जी तयारी या भोंदू साधूंमध्ये झाली आहे तशी फसवेगिरीची तयारी आजपर्यंत आमच्यात झाली नाही. कारण आमच्यासमोर उच्च आदर्श आहेत. महाभारत आहे. राम आहे. हे आहे, ते आहे. आम्ही त्याच चिखलात बसलो आहोत. जर एखादा किडा म्हणू लागला, की मी कमळ आहे. तर तो कमळ होणार नाही आणि किड्याला कमळ केले तरी शेवटी किडा किड्याप्रमाणेच वागणार! त्यामुळे हे समजले पाहिजे, की आमच्या ज्या उच्च गोष्टी घटीत झाल्या आणि ज्यामुळे आम्ही चहूबाजूने आच्छादित आहोत, ज्यामुळे आम्ही खूप उच्चही आहोत, हे जे चित्र आम्ही बघितले पक्के लक्षात ठेवा, तुम्हाला असेच उच्च व्हायचे आहे, उच्च विचार करायचे आहेत. यासाठी वरवरची इच्छा चालणार नाही. खूप अंतरातून ती इच्छा यायला हवी. आतून तशी आस निर्माण व्हायला हवी, की मी ठरवले ते मिळविले? मी माझे ध्येय प्राप्त केले का? हवे तेच मी मिळविले का? हे सर्व इमानदारीने करायला हवे. जोपर्यंत तुम्ही इमानदारीने कार्य करणार नाही; शक्तीही इमानदारी दाखविणार नाही. ही तुमची अत्यंत वैयक्तिक बाब आहे. वेगवेगळ्या प्रकारे स्वतःला पडताळून बघा, की या शक्ती तुमच्यात का जागृत होत नाहीत? आम्ही त्या का मिळवू शकत नाही? कारण आम्ही आम्हालाच एकप्रकारे कापत आहोत. स्वतःला स्वतःपासून दूर करीत आहोत. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या ढोंगीपणाचे, ढोंगी माणसाचे सहजयोगात कुठलेही स्थान नाही. हृदयापासून स्वीकार केला पाहिजे. आपल्या अंतरात्म्याला जाणा. त्यासाठी कोणत्याही बाह्य अवडंबराची गरज नाही. कोणी हसून बसतील, कोणी गंभीर होऊन बसतील. हसणे, गंभीर होणे याची गरज नाही. जे तुमचे आतील भाव आहेत ते बाहेर येतात. त्यात नाटके करण्याचे कारण नाही. तुमच्याआतील खरेखुरे भावभावना बाहेर येतील, ते या शक्तीने बाहेर वाहतील. तेच आमच्यातून प्रकट होतात. **म्हणून लोकांनी हे चांगल्या प्रकारे समजून घ्यावे, की आम्हाला पूर्ण इमानदारीने सहजयोग करायचा आहे. हळूहळू त्यात आत जायला हवे. मी लोकांमध्ये आत्मसमर्पण बघते. त्या आत्मसमर्पणामागे मोठी कमालीची गोष्ट आहे. ती कमाल अशी आहे, की ते लोक विचार करतात की आमचे आत्मकल्याण व्हायला हवे. याव्यतिरिक्त ते दुसऱ्या गोष्टीचा विचार करीत नाहीत.**

सहजयोगाचे अनेक लाभ आहेत. तुम्हाला माहीत आहे, यामुळे आरोग्य उत्तम राहील, तुम्हाला चांगले पैसे मिळतील, तुमची नोकरी चांगली असेल, तुमचे डोके शांत होतील आणि संसारासाठी लागणाऱ्या खंडीभर वस्तू तुम्हाला प्राप्त होतील. त्याउपर तुमचे चांगले नाव होईल. मानसन्मान मिळेल. प्रसिद्धी मिळेल, ज्यांना कोणी ओळखत नव्हते. त्यांचेही नाव होईल. त्यांना लोक ओळखतील. सर्वकाही ठीक होईल. पण आम्हाला खरेच काय हवे? आम्हाला आमच्या आत्मिक उन्नतीशिवाय काही नको. मनुष्यात जेव्हा आत्मिक उन्नत्ती येते तेव्हा तो इतर गोष्टीचा विचारही करीत नाही. त्याला इतर सर्व गोष्टी व्यर्थ वाटतात. अशी कोणतीच वस्तू नसते, ज्यासाठी तो लालचीपणा करील किंवा तिच्या मागे धावेल. सर्व लक्ष्मी त्याचे पाय धुतील. तरी त्याला ते व्यर्थ वाटेल. अशी कोणतीच गोष्ट नाही, की त्याला त्याचा लोभ वाटेल. लालचीपणा करणार नाही. अशा प्रकारे तो सामर्थ्यवान बनतो. असेल तर ठीक. नसले तरी हरकत नाही. मिळाले तर चांगले नाही तर नाही अशी स्थिती आपल्यात आली पाहिजे. त्या गोष्टी मिळाल्या वाहवा! नाही मिळाल्या वाहवा! मनुष्याचे विचार जेव्हा या पातळीपर्यंत पोचतील, माणूस जेव्हा असा विचार करू लागेल, तेव्हा या स्थितीला तो प्राप्त होईल. तेव्हा म्हटले पाहिजे, की सहजयोगीने आयुष्यात काही मिळविले आहे. प्राप्त केले आहे. जोपर्यंत सहजयोगीच्या जीवनात अशी स्थिती येत नाही तोपर्यंत तुमची नाव हेलकावे खात राहील. कधी इकडे तर कधी तिकडे फिरत राहील.

तुम्हाला प्रस्थापित करण्याची जी पहिली शक्ती तुमच्यात आहे ती म्हणजे **श्रद्धा. श्रद्धेला हृदयापासून समजायला हवे आणि श्रद्धेच्या मस्तीत राहायला हवे. तिची मजा घ्यायला हवी. आनंद घ्यायला हवा. श्रद्धेची जी आल्हाददायक शक्ती आहे त्या आल्हादात (आनंदात) राहायला हवे. त्या खुमारीत जगायला हवे. त्या सुखात राहायला हवे. माणूस त्या आल्हादात पूर्णपणे मिसळून जात नाही तोपर्यंत त्याचे सारे प्रश्न, साऱ्या समस्या आहेत तशाच राहतील. कारण समस्या वगैरे सर्व माया आहे. हे सर्व चक्कर आहे.**

जर कोणाला विचारले, की तुम्हाला कोणत्या समस्या, अडचणी आहेत? तो म्हणेल, मला शंभर रुपये हवे होते, पण पन्नास मिळाले. शंभर रुपये मिळाले आणि विचारले तर म्हणेल, मला दोनशे रुपये हवे होते, पण शंभरच मिळाले. हे संपणारच नाही. बरं दुसरी अडचण काय आहे? तर माझी बायको अशी अशी आहे. मग दुसरं लग्न कर. दुसरी बायकोपण तशीच आहे. तिसरी केली तीपण तशीच निघाली. तुमची

समस्या संपत नाही कारण तुम्ही समस्या संपवू इच्छित नाही. हे सर्व संपविण्याचा मार्ग हा आहे की तुम्ही पूर्ण श्रद्धेने आपल्या आत्म्यात जो आनंद आहे त्याचा रसास्वाद घ्या आणि त्या रसाच्या आनंदात राहा. शेवटी सर्व वस्तू आमच्या आनंदासाठीच तर आहेत. पण जोपर्यंत तो रस घेणारी शक्ती प्राप्त करीत नाही तोपर्यंत काय फायदा? हे असे झाले, की एक माशी फुलावर जाऊन बसली आणि म्हणते की मला मध मिळाले नाही. मध हवे तर मधुकर व्हा. जोपर्यंत तुम्ही मधुकर होणार नाही तोपर्यंत मध कसे मिळेल? जर तुम्ही माशी होऊन राहाल तर इथे – तथे भणभणत राहाल. पण तुम्ही स्वतः मधुकर झालात तर **तुम्ही जिथे जायचे, योग्य तिथेच जाल. जो रस घ्यायचा आहे त्याचा रसास्वाद मजेने घ्याल. पोट भरून, मजेत आनंदाने रसपान कराल. हीच सर्वांत मोठी गोष्ट सहजयोगात शिकायची आहे. आमचे चित्त पूर्णपणे एकाच गोष्टीत बुडून गेले पाहिजे. ती गोष्ट म्हणजे आमची आत्मिक उन्नती होणे. पण याचा अर्थ असा नाही, की पूर्ण दिवस स्वतःला बंधने देत राहा किंवा डोळे बंद करून बसा किंवा शेंडी बांधून बसा. त्याची काही गरज नाही.**

सर्वसाधारण पद्धतीने, दैनंदिन जीवनात काही बदल न करता तुम्ही जसे आहात तसेच राहून तुमच्या हृदयात जो आत्मा आहे त्याचे रसाचे पान करा. तो रस प्राप्त करा. तो रस जोपर्यंत पाझरत नाही तोपर्यंत तुमच्यात कबीर बसलेले आहेत, तुमच्यात नानकजी विराजमान आहेत. तुमच्यातच सर्व मोठमोठे साधू – संत सामावले आहेत. संत तुकाराम, नामदेव, एकनाथ, संत ज्ञानेश्वर सर्व संत तुम्हा लोकांतच बसले आहेत. त्या बिचाऱ्यांना कोणी सांगणारे नव्हते, त्यांच्या संरक्षणासाठी कोणी नव्हते. हे सर्व तुम्हाला (माताजींमुळे) प्राप्त झाले आहे. तुम्ही चांगल्या छत्रछायेत बसलेले आहात. तुम्ही छत्र छायेखाली आहात आणि पुन्हा तुमची एक छत्री उघडता. त्याबाबतीत मग चर्चा सुरू होते. यामुळे तुमच्या शक्ती कमी होतील. आम्ही हे लक्षात घ्यायला हवे, की आमच्याकडे कोणकोणत्या शक्ती आहेत? आम्ही किती शक्ती बघितल्या आहेत? आणि त्या कशा कार्यरत आहेत?

तुम्हाला काय हवे ते करा. तुम्ही जशी इच्छा कराल ते तुम्हाला प्राप्त होईल. पण आता तुमच्या इच्छाच बदलतील. तुमचे वागणे बदलेल. आता तुम्ही महाभारत बघायला थांबणार नाही. काय विचार कराल? अरे बापरे, आज माँ, आई इतका चांगला दिवस आहे. आई स्वतः आली आहे. पूजा आहे. सर्व जगातून लोक धावून आलेत. बाहेरून, अमेरिकेतूनही लोक येतील. आता मी जाते. त्यांनी म्हटले, की एक दिवाळी पूजा नक्की करा. त्यासाठी मला वाटते, साऱ्या ब्रह्मांडातून लोक येतील. पण इथे कोलकत्त्यातही लोकांना यायला त्रास होतो आणि आम्ही तर साक्षात (मातांसमोर) बसलो आहोत. असेही काही लोक आहेत जे अगदी सहजपणे इथे येऊ शकतात. आपल्या कामासाठी सतरांदा धावाल. पण पूजा किती महत्त्वाची आहे, हे समजत नाही. कारण श्रद्धा कमी आहे. ते म्हणतात जेव्हा रिटायर्ड होऊ तेव्हा येऊ. सुविधेनुसार. रविवारी करा. सुटी असते. पण कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी सुटी हवी किंवा कार्यक्रमानंतरच्या दिवशी सुटी हवी. अशा रडक्या लोकांसाठी सहजयोग आहे काय? हे घोडे कुठंपर्यंत जाईल? ही तर खेचरेपण नाहीत. जे असा विचार करतात ते सहजयोगात कुठंवर जाणार? हे मला काही समजत नाही. सर्व सोयी हव्यात, शनिवार, रविवार हवा. त्यातही कार्यक्रम संपला की लगेच पळणार. कारण आम्हाला उद्या ऑफिसला जायचे आहे. तुम्ही जाल. उद्याही सर्व ठाकठीक होईल. पण अशी घाई कराल तर आम्ही तुम्हाला खंडाळा घाटात अडकवू. अशी बदमाशी, सैतानी आम्ही कितीही केली तरी तुमच्या डोक्यात ही गोष्ट जोपर्यंत शिरणार नाही. काय फायदा?

**इच्छा खूप आहे, की तुम्हाला योग्य मार्गावर आणावे. पण रस्त्यावर तुम्ही येता – जाता. घसरलात तर आम्हाला किती कष्ट घ्यावे लागतील आणि तुमच्या ज्या शक्ती जागृत होऊ शकतील, ज्या आपोआप वाढू शकतील, फोफावू शकतील त्या कुठल्या कुठे नष्ट होतील? तेव्हा प्रथम तुम्ही तुम्हालाच सांभाळायचे आहे. सावरायचे आहे.**

आपल्या शक्तींच्या मोठेपणाची कदर करायची आहे आणि हे जाणायचे आहे, की आमच्या आत किती शक्ती आहेत आणि आम्ही किती शक्ती प्राप्त करू शकतो? आम्ही किती वर जाऊ शकतो? इतरांना या शक्तींचा किती लाभ होऊ शकतो? तुम्ही तो किती देऊ शकता? इतके भांडार, खजिना आपल्या आत सामावले आहे. आता सर्व खजिना उघडला आहे. चाव्या मिळाल्या आहेत. आता खजिना उघडल्यावर फक्त त्यातून काढून लोकांना ते वाटायला हवे आणि मजा लुटायला हवी. आज इथे ही जी शक्तिपूजा होत आहे, मला वाटते, की तुमच्यातील शक्तींचीच पूजा व्हायला हवी. त्यामुळे तुम्ही खरे-खरे मोठे, श्रद्धाळू व्हाल. साधू-संतांना सांगावे लागत नाही. ते मार खातात. विषप्राशन करतात. समाज जे अत्याचार करील ते सर्व खरे साधू-संत सहन करतात, पण तल्लीनता संपत नाही. सुटत नाही. आता तुम्हाला कनेक्शन लावून दिले आहे, पण ते इतके सैल आहे की वारंवार निघून जाते आणि वारंवार लावावे लागते. वेगवेगळ्या कारणांनी कनेक्शन तुटते आणि जोडावे लागते. त्यामुळे आता हे ठरवायचे आहे, की आमच्या आतील सर्व शक्ती जागृत करावयाच्या आहेत. मग काहीच काळजी राहणार नाही. सर्व समस्या सुटतील. प्रश्नच उरणार नाहीत.

**या शक्तींना जागृत करणे अगदी सोपे आहे. एकच गोष्ट आहे तुमची इच्छा हवी. तल्लीनता हवी. ज्याच्यात तल्लीनता येईल, जो पूर्णपणे निमग्न होऊन सहजयोगात येईल आणि त्यांना सहजयोगाची ओढ लागून राहील, तिकडेच ध्यान देईल. त्याचे सर्व उत्तम होईल; परंतु प्रथम योग यायला हवा आणि अर्धवट योग बिनकामाचा आहे. ना इकडचे ना तिकडचे अशी अवस्था होईल. एका छोट्याशा बीजात हजारो वृक्ष निर्माण करण्याची शक्ती असते. तुम्ही तर अशा हजारो वृक्षांचे मालक 'मनुष्य' आहात. त्यातील हजारो लोकांना शक्तिमान बनविण्याची शक्ती तुमच्यात आहे. पण या बीजाला अंकुर फुटल्यावर त्याची काळजी न घेता त्याला रस्त्यावर फेकून दिले,**

**त्यातून वृक्ष निर्माण झाला नाही, तर त्या बीजातली शक्ती लुप्त होईल. पण आपण खरेतर कुठंपर्यंत जाणार?** यामुळे आपसांतली छोट्या छोट्या, क्षुद्र, गोष्टी, आपसांतली भांडणे, असभ्यता या सर्व गोष्टी तुमच्या जवळपासही येणार नाहीत. पण तुमचे जे सुंदर स्वरूप आहे ते उजळून येईल आणि लोक म्हणतील की एक शक्तिशाली माणूस उभा आहे. एका विशेष रूपातला माणूस उभा आहे. एक महान, निर्भय, बेडर माणूस समोर उभा आहे. जे सांगायचे, जेथे बोलायचे ते सांगतो, बोलतो. घाबरत नाही. नाहीला नाही म्हणतो, बाबांचे बाबा आले तरी घाबरत नाही. आजोबा आले तरी घाबरत नाही. जे नालायक आहेत त्यांच्याशी भांडण करायचे कारण काय? त्यांना सोडून द्या. माझे दुर्दैव म्हणून अशा नादान माणसाशी लग्न झाले, असा विचार करावा. तुमचं नशीब वाईट की तुमचे आई – बाप असे निघाले. अशा नादान, नालायक लोकांना कशाला सहजयोगात आणायचं? आणि माझ्या डोक्यावर लादायचं, की आई यांना ठीक कर. कारण ही माझी बायको आहे, कारण हा माझा बाप आहे, ही माझी आई आहे. माझा बाबा आहे, दादा आहे, माझे त्यांच्याशी कोणते नाते नाही. जर ते सहजयोगात नसतील (अशा नालायकांना) तर त्यांना तुम्ही बाहेरच ठेवा. जे लायक लोक आहेत त्यांच्याशी रोज दोस्ती करा. त्यांच्याबरोबर मजेत राहा. तुम्हाला काय गरज आहे? आम्ही हे समजू शकत नाही, की ही दुनियादारी, नातीगोती अशीच चालू राहतात. यात काही ठेवले नाही. पण तुमची ज्यांच्याबरोबर संगत – सोबत आहे, जे तुमच्याबरोबर उठतात, बसतात, तुमच्याबरोबर हिंडतात, फिरतात, त्यांच्याशी पटले तर ठीक. नाहीतर ठीक. अशा नालायक लोकांची सहजयोगात आणण्याची आवश्यकता नाही. त्यांना बाहेर राहू द्या. जे लायक लोक आहेत त्यांच्याशी मैत्री कायम ठेवा. मी बऱ्याचदा बघते, की नात्यांमुळे काही लोक आपल्या नातेवाइकांना सहजयोगात आणतात आणि माझी डोकेदुखी वाढवतात. तुमच्या योग्यतेमुळे तुम्ही सहजयोगात आलात. सहजयोगी झालात, तुम्हाला आशीर्वाद मिळाला. तुम्हाला बरेच काही मिळाले. आणखीही मिळेल. पण जे भिकारी आहेत आणि त्याच्या झोळीला छिद्र आहे, अशांना देण्यात काय अर्थ आहे? हे कडू कारले मीठ लावलेले आहे. अशा लोकांशी दोस्ती ठेवण्यात काय हाशील? अशा लोकांशी बोलायची, नाते ठेवायची तुम्हाला गरज नाही. त्यांना बोलू द्या. त्यांचे डोके ठिकाणावर आले तर सहजयोगात येतील. सहजयोग प्राप्त करतील आणि असे झाले नाही तर तुम्ही डोके दुखवू नका. त्याने काही फायदा होणार नाही. कारण अशा लोकांचे डोके दगडाचे असते. ते बघू शकत नाहीत.

म्हणून आजपासून आपण असा विचार करायचा, की आम्ही एक व्यक्ती आहोत. मागच्या जन्मी आम्ही खूप पुण्य केले होते. म्हणून आज आम्ही इथे (सहजयोग) बसलो आहोत आणि यापेक्षाही उच्च स्थानावर पोचू शकतो. स्वतःला दगडांनी बांधून समुद्रात उडी घेऊ नका. पोहता येते तर मुक्तपणे पोहा. त्याचा आनंद घ्या. असे केले तर आपल्या सर्व शक्तींनी पल्लवित व्हाल. बहरून याल. आज माझे तुम्हाला अनंत आशीर्वाद आहेत. तुमच्या सुप्त शक्ती जागृती होवोत. हळूहळू तुम्हाला याची जाणीव होऊ लागेल. त्यातून प्रवाहाची आनंदधारा वाहू लागेल. त्याचा खूप खूप आनंद तुम्ही लुटा.

तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद!

------------------------------

# सप्तमी – नवरात्र, १७–१०–१९८८

**ॐ सर्वे वै दैवा देवीमुपतस्थु : कासि त्वं महादेवीति ।। १ ।।**

**साब्रवीत् – अहं ब्रह्मस्वरुपिणी । मत्तः प्रकृतिपुरुषात्मकं जगत । शून्यं चाशून्यं च ।। २ ।।**

**अहमानन्दानानन्दौ । अहं विज्ञानाविज्ञाने अहंब्रह्माब्रह्मणी वेदितव्ये ।**

**अहं पच्चभूतान्यपच्चभूतानि । अहमखिलं जगत् ।। ३ ।।**

ॐ सर्व देवता देवीसमोर अतिशय नम्रतेने विचारले, हे महादेवी, तुम्ही कोण आहात? ।। १ ।।

तिने सांगितले, मी ब्रह्मरूप आहे. माझ्यातून प्रकृतिपुरुषात्मक सद्रूप (दृश्य) असद्रूप (अदृश्य) जग निर्माण झाले ।। २ ।।

मी आनंद आणि आनंदरुपा आहे. मी विज्ञान आणि अविज्ञान स्वरूपा आहे. समजण्यासाठी आवश्यक असे – ब्रह्म व अब्रह्म मीच आहे. पंचिकृत आणि अपंचिकृत महाभूतेही मी आहे. हे सर्व दृश्य जग मीच आहे ।। ३ ।।

**वेदोऽहमवेदोऽहम् । मविद्याहम् अजाहमनजाहम् । अधश्चोर्ध्व च तिर्यक्वाहम ।। ४ ।।**

**अहं रुद्रेभिर्वसुभिश्चरामि । अहमादित्यैरूत विश्वदेवैः ।**

**अहं मित्रावरुणावुभौ बिभर्मि । अहमिन्द्राग्नी अहमश्चिनावुभौ ।। ५ ।।**

**अहं सोम त्वष्टारं पूषणं भगं दधामि ।**

**अहं विष्णुमुरुक्रमं ब्रह्माणमुत प्रजापतिं दधामि ।। ६ ।।**

वेद आणि अवेद मीच आहे. विद्या आणि अविद्याही मीच. अजा आणि अनजा (सृष्टी आणि त्यापेक्षा भिन्न) मीच आहे. खाली, वर आजूबाजूला फक्त मी आहे ।। ४ ।।

मी रुद्र आणि वस्तूंच्या रूपात संचार करते. मी आदिल आणि विश्वेदेवांच्या रूपात फिरते. मी मित्र आणि वरुण या दोघांचे, इंद्र आणि अग्नीचे, आणि दोन्ही अश्विनीकुमारांचे भरणपोषण करते. ।। ५ ।।

मी सोम, त्वष्टा, पूषा आणि भग यांना धारण करते. त्रैलोक्या पादाक्रांत करण्यासाठी विस्तीर्ण (खूप मोठे) पावले टाकणाऱ्या (पादक्षेप) विष्णू, महादेव, ब्रह्मदेव आणि प्रजापतीला मीच धारण करते.

**अहं दधामि द्रविणं हविष्मते सुप्राव्ये यजमानाय सुन्वते ।**

**अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम् ।**

**अहं सुवे पितरमस्य मूर्धन्मम योनिरप्स्वन्तः समुद्रे ।**

**य एवं वेद। स दैवी सम्पदमाप्नोति ।। ७ ।।**

देवांना उत्तम हवी पोचविणाऱ्या आणि सोमरस काढणाऱ्या यजमानाला हविर्द्रव्यांनी युक्त धन धारण करते. मी संपूर्ण जगाची ईश्वरी, उपासकांना धन देणारी, ब्रह्मरूप यज्ञा हो मध्ये (यजय करण्यायोग्य देवांमध्ये) मुख्य आहे. मी आत्मस्वरूपावर आकाश इ. निर्माण करते. माझे स्थान आत्मस्वरूपाला धारण करणाऱ्या बुद्धिवृत्तीमध्ये आहे. जो याप्रकारे जाणतो त्याला दैवीसंपत्ती प्राप्त होते. ।। ७ ।।

**ते देवा अब्रुवन् – नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।**

**नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणता : स्म ताम् ।। ८ ।।**

तेव्हा ते देव म्हणाले, ''देवीला नमस्कार असो.'' मोठ-मोठ्यांना आपल्या कर्तव्याप्रति प्रवृत्त करणाऱ्या कल्याणकर्ती देवीला सदैव नमस्कार असो. गुणसाम्यावस्थारुपिणी मंगलमयी देवीला नमस्कार. नियमाप्रमाणे आम्ही देवीला प्रणाम करतो. ।। ८ ।।

**तामग्निवर्णा तपसा ज्वलन्तीं वैराचनीं कर्मफलेषु जुष्टाम् ।**

**दुर्गा देवीं शरणं प्रपद्यामहेऽसुरान्नाशयित्र्यै ते नमः ।। ९ ।।**

त्या अग्नीप्रमाणे वर्ण असणाऱ्या, ज्ञानाने झगमगणाऱ्या दीप्तीमती (दीप्तीमय) कर्मफल प्राप्त करण्यासाठी सेवन केल्या जाणाऱ्या दुर्गादेवीला आम्ही शरण आहोत. असुरांचा नाश करणाऱ्या देवी तुला नमस्कार आहे ।। ९ ।।

**देवी वाचमजनयन्त देवा स्तां विश्वरुपाः पशवो वदन्ति ।**

**सा नो मन्द्रेषमूर्ज दुहाना धेनुर्वागस्मानुप सुष्टुतैतु ।। १० ।।**

प्राणरूप देवांनी ज्या वैखरी वाणीला उत्पन्न केले, त्यांना अनेक प्राण्यांच्या नावाने बोलावतात. ती कामधेनुतुल्य आनंददायक आणि अन्न व ताकद (बल) देणाऱ्या वाग्रूपिणी भगवती, उत्तम स्तुतीने संतुष्ट होऊन आमच्यासमोर यावे. ।। १० ।।

**कालरात्रीं ब्रह्मस्तुतां वैष्णवीं स्कन्दमातरम् ।**

**सरस्वतीमदितिं दक्षदुहितरं नमामः पावनां शिवाम् ।। ११ ।।**

काळाचाही नाश करणारी, वेदांद्वारा स्तुत केलेली (स्तुती), विष्णुशक्ती, स्कंदमाता (शिवशक्ती), सरस्वती (ब्रह्मशक्ती), देवमाता अदिती आणि दशकन्या (सती), पापनाशिनी, कल्याणकारिणी भगवतीला आम्ही प्रणाम करतो. ।। ११ ।।

**महालक्ष्म्यै च विद्महे सर्वशक्त्यै च धीमहि ।**

**तन्नो देवी प्रचोदयात् ।। १२ ।।**

आम्ही महालक्ष्मीला जाणतो आणि त्या सर्व शक्ती रुपिणीचे ध्यान करतो. ती देवी आम्हाला त्या विषयात (ज्ञान – ध्यानात) प्रवृत्त कर. ।। १२ ।।

**अदितिर्ह्यजनिष्ट दक्ष या दुहिता तव ।**

**तां देवा अन्वजायन्त भद्रा अमृतबन्धवः ।। १३ ।।**

हे दक्ष! तुमची जी कन्या अदिती आहे ती प्रसूत झाली आणि तिला मूलरहित कल्याणमय देव झाले. (उत्पन्न झाले) ।। १३ ।।

**कामो योनिः कमला वज्रपाणिर्गुहा हसा मातारिश्वाभ्रमिन्द्रः ।**

**पुनर्गुहा सकला मायया च पुरुच्यैषा विश्वमातादिविद्योम् ।। १४ ।।**

काम (क), योनी (ए), कमला (ई), वज्रपाणी – इंद्र (ल), गुहा (ही) । ह, स– वर्ण. मातरिश्वा – वायु (क), अभ्र (ह), इंद्र (ल), पुन्हा गुहा (हो), । स, क, ल – वर्ण आणि मया (ही), ही सर्वात्मिका जगन्मातेची मूळ विद्या आहे आणि ही ब्रह्मरुपिणी आहे. ।। १४ ।।

**एषाऽऽत्मशक्तिः । एषाःविश्वमोहिनी ।**

**पाशांकुशा धनुर्बाण धरा । एषा श्रीमहाविद्या । य एवं वेद स शोकं तरति ।। १५ ।।**

ही परमात्म्याची शक्ती आहे. ही विश्वमोहिनी आहे. पाश, अंकुश, धनुष्य आणि बाण धारण करणारी ही देवी आहे. ती महाविद्या आहे. ज्याला हे समजते (जाणतो) तो दुःखाला (शोक) पार करून जातो ।। १५ ।।

**नमस्तेऽस्तु भगवति मातरस्मान् पाहि सर्वतः ।। १६ ।।**

भगवती तुला नमस्कार करतो. माते सर्व प्रकारे आमचे रक्षण कर. ।। १६ ।।

**सैषाष्टौ वसवः । सैषैकादश रुद्राः । सैषाद्वादशादित्याः ।**

**सैषा विश्वेदेवाः सोमपा असोमपाश्च । सैषा यातुधाना असुरा रक्षांसि पिशाचा यक्षाः सिद्धाः ।**

**सैषा सत्त्वरजस्तमांसि । सैषा ब्रह्माविष्णुरुद्ररुपिणी ।**

**सैषा प्रजापतीन्द्रमनवः सैषा ग्रहनक्षत्रज्योर्तीषि ।**

**कला काष्ठादिकालरुपिणी तामहं प्रणौमि नित्यम् ।।**

**पापापहारिणी देवीं भुक्तिमुक्तिप्रदायिनीम् ।।**

**अनन्तां विजयां शुद्धां शरण्यां शिवदां शिवाम् ।। १७ ।।**

(मंत्रद्रष्टा ऋषी सांगतात) हेच ते अष्ट वसू आहेत. हेच ते एकादशरुद्र आहेत. हेच ते द्वादश आदित्य आहेत. हेच ते सोमपान करणारे आणि न करणारे विश्वदेव आहेत. हेच ते यातुधान (एक प्रकारचे राक्षस) असुर, राक्षस, पिशाच्च, यक्ष आणि सिद्ध आहेत. हेच ते सत्त्व, रज, तम आहेत. हेच ते ब्रह्माविष्णू - रुद्ररुपिणी आहे. हेच ते प्रजापती - इंद्र, मनु आहे, हेच ते ग्रह, नक्षत्र आणि तारे आहेत. हीच कला, काष्ठादि, काल-रुपिणी आहे. पान नाश करणारी, भोग - मोक्ष देणारी, अंतरहित, विजयाधिष्ठात्री, निर्दोष, शरण जाण्यास योग्य, कल्याणदायी आणि मंगलरुपिणी त्या देवीला आम्ही सदा प्रणाम करतो. ।। १७ ।।

**वियदीकारसंयुक्तं वीतिहोत्र समन्वितम् ।**

**अर्धेन्दुलसितं देव्या बीजं सर्वार्थसाधकम् ।। १८ ।।**

**एवमेकाक्षरं ब्रह्म यतयः सुद्धचेतसः ।**

**ध्यायन्ति परमानन्दमया ज्ञानाम्बुराशयः ।। १९ ।।**

वियत - आकाश (ह) आणि 'ई' काराने युक्त वीतिहोत्र - अग्नि (र) सहित अर्धचंद्र (ˇ) ने अलंकृत जे देवीचे बीज आहे, ते सर्व मनोरथांना पूर्ण करणारे आहे. याप्रकारे या एकाक्षर ब्रह्मचे असे ध्यान करतात. ज्यांचे चित्त शुद्ध आहे, जो निरातिश्यानन्दपूर्ण आहे आणि ज्ञानाचा सागर आहे. (हा मंत्र देवी प्रणव मानला जातो) ॐ कार समान हा प्रणवही व्यापक अर्थाने परिपूर्ण (भरलेला) आहे. थोडक्यात याचा अर्थ -

इच्छा-ज्ञान-क्रिया-धार-अद्वैत, अखंड, सच्चिदानंद, समरसीभूत शिवशक्ती स्फुरण आहे. ।।१८ - १९ ।।

**वाङ्माया ब्रह्मसूस्तस्मात् षष्ठं वक्त्रसमन्वितम् ।**

**सूर्योऽवाम् श्रोत्रबिन्दु संयुक्तष्टात्तृतीयकः ।**

**नारायणेन संमिश्रो वायुश्चाधरयुक् ततः ।**

**विच्चे नवार्णकोऽर्णः स्यान्महदानन्ददायकः ।। २० ।।**

वाणी (ए) माया (हा), ब्रह्मसू - काम (क्ली) त्यानंतर सहावे व्यंजन अर्थात, तो वक्त्र म्हणजे आकाराने युक्त (चा) सूर्य (म) 'अवामश्रोत्र'- दक्षिण - कर्ण (ड) आणि बिंदू म्हणजे अनुस्वाराने युक्त (मुं) टकारपासून तिसरा ड तोच नारायण म्हणजे 'आ' पासून मिश्र (डा), वायू (य) हे अधर म्हणजे 'ऐ' पासून युक्त (यै) आणि ''विच्चे'' हे नवार्णमंत्र उपासकांना आनंद आणि ब्रह्मसायुज्य देणारी आहे. ।। २० ।।

या मंत्राचा अर्थ आहे - हे चित्स्वरुपिणी महासरस्वती !

हे सद्रूपिणी महालक्ष्मी! हे आनंद-रुपिणी महाकाली ! ब्रह्मविद्या प्राप्त करण्यासाठी आम्ही सतत तुमचे ध्यान करतो. हे महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती स्वरुपिणी चंडिके, तुला नमस्कार असो. अविद्यारूप रज्जूच्या दृढ ग्रंथी उकलून (खोलून) मला मुक्त कर ।। २० ।।

**हृत्पुण्डरीकमध्यस्थां प्रातः सूर्यसमप्रभाम् ।**

**पाशाङ्.कुशधरां सौम्यां वरदाभयहस्तकाम् ।**

**त्रिनेत्रां रक्तवसनां भक्तामदुघां भजे ।। २१ ।।**

हृत्कमलाच्या मध्यात राहणारी, प्रभातकालीन सूर्याच्या प्रभेसारखी, पाश आणि अंकुश धारण करणारी मनोहर रुपाची, वरद आणि अभयमुद्रा धारण केलेल्या हाताची, तीन नेत्रांनी युक्त, रक्तवस्त्र परिधान करणारी आणि कामधेनुसमान भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या हे देवी,

मी तुझे पूजन करतो. ।। २१ ।।

**नमामि त्वां महादेवी महाभयविनाशिनीम् ।**

**महादुर्गप्रशमनीं महाकारुण्यरुपिणीम् ।। २२ ।।**

महाभयाचा नाश करणारी, महासंकटांना शांत करणारी आणि महान करुणेची साक्षात मूर्ती असणाऱ्या महादेवीला मी नमस्कार करतो. ।। २२ ।।

**यस्याः स्वरूपं ब्रह्मादयो न जानन्ति तस्मादुच्यते अज्ञेया ।**

**यस्या अन्तो न लभ्यते तस्मादुच्यते अनन्ता ।**

**यस्या लक्ष्यं नोपलक्ष्यते तस्मादुच्यते अलक्ष्या ।**

**यस्या जननं नोपलभ्यते तस्मादुच्यते अजा ।**

**एकैव सर्वत्र वर्तते तस्मादुच्यते एका ।**

**एकैव विश्वरुपिणी तस्मादुच्यते नैका ।**

**अत एवोच्यते अज्ञेयानन्तालक्ष्याजैका नैकेति ।। २३ ।।**

जिचे स्वरूप ब्रह्मादिक जाणत नाहीत, त्यामुळे जिला आज्ञेया म्हणतात, जिचा अंत मिळत (सापडत) नाही म्हणून जिला अनंता म्हणतात, जिचे लक्ष्य दिसत नाही त्यामुळे जिला अलक्ष्या म्हटले जाते, जिचा जन्म समजत नाही म्हणून तिला अजा म्हणतात, जी एकटीच सर्वत्र आहे म्हणून जिला एका म्हणतात, जी एकटीच विश्वरूपात समजलेली आहे म्हणून तिला नैका म्हणतात, म्हणून तिला अज्ञेया, अनंदा, अलक्ष्या, अनंता, अलक्ष्या, अजा, एका आणि नैका म्हटले जाते. ।। २३ ।।

**मन्त्राणां मातृकादेवी शब्दानां ज्ञानरुपिणी ।**

**ज्ञानानां चिन्मयातीता शून्यानांशून्यसाक्षिणी**

**यस्याः परतरं नास्ति सैषा दुर्गा प्रकीर्तिता ।। २४ ।।**

सर्व मंत्रात मातृका – मुळाक्षर रूपात राहणारी, शब्दात ज्ञान (अर्थ) रूपात राहणारी, ज्ञानात चिन्मयातीता, शून्यात शून्यसाक्षिणी, तसेच जिच्यापेक्षा काहीच श्रेष्ठ नाही, ती दुर्गा नावाने प्रसिद्ध आहे. ।। २४ ।।

**तां दुर्गा दुर्गमां देवीं दुराचारविघातिनीम् ।**

**नमामि भवभीतोऽहं संसारार्णवतारिणीम् ।। २५ ।।**

जी दुविज्ञेय, दुराचारनाशक आणि संसारसागरातून तारणाऱ्या दुर्गादेवीला भवसागरामुळे घाबरलेला मी नमस्कार करतो ।। २५ ।।

**इदमथर्वशीर्ष योऽधीते सपश्चाथवशीर्षजपफलमाप्नोति ।**

**इदमथर्वशीर्षमज्ञात्वा योऽर्चा स्थापयति – शतलक्षं प्रजप्त्वापि सोऽर्चासिद्धिं न विन्दति ।**

**शतमष्टोत्तरं चास्य पुरश्चर्याविधिः स्मृतः ।**

या अथर्वशीर्षाचे जो अध्ययन करतो त्याला पाचही अथर्वशीर्षाच्या जपाचे फळ (पुण्य) प्राप्त होते. या अथर्वशीर्षाला न समजता जे प्रतिमा स्थापन करतात ते शेकडो लाख जप करूनही अर्चासिद्धी प्राप्त करू शकत नाहीत. अष्टोत्तरशत (१०८ वेळा) जप (इत्यादी) याचा पुनश्चणविधी आहे.

------------------------

# सप्तमीच्या दिवशी

देवी अथर्वशीर्षाचे श्लोक दुर्गासप्तशतीतून वाचले गेले. या श्लोकातून देवी आपल्याविषयी सांगते. मधे-मधे श्रीमातांनी श्लोकांचा अर्थ स्पष्ट केला आणि त्यांची व्याख्या केली. ती खालीलप्रमाणे :

- जेव्हा तुम्ही कोणाला आनंद देता तेव्हा आनंदाचा स्रोत आनंदातीत व्हायला हवा.
- मी ज्ञानदाता आहे.
- आत्म्याच्या प्रकाशाशिवाय कसे तुम्ही कोणत्याही गोष्टीचे ज्ञान प्राप्त करू शकता?
- तुम्ही बघा की स्रोत आजन्म आहे. तो जन्म घेऊ शकतो कारण तो अनादि आहे. म्हणून तो आजन्म आहे. अनादि तर आहेच. तो पूर्ण आहे. पूर्णही जन्म घेऊ शकतो.
- आपण आत्मसाक्षात्कार का न घ्यावा, त्याशिवाय देवीपूजा करण्याचा काय उपयोग? आत्म्याच्या ज्ञानाशिवाय तुम्ही जर कोणती पूजा करता तर त्याचा काय उपयोग? तुम्हाला परमेश्वराचा आशीर्वाद प्राप्त होणार नाही. ही गोष्ट हजारो वर्षांपूर्वी सांगितली गेली.
- 'वैखरी' अशी शक्ती आहे, जिच्या माध्यमातून आपण बोलतो.
- तुम्ही कोणत्याही देवीदेवतांचे नाव घ्या आणि मला विचारा, की श्रीमाताजी, तुम्ही ही देवी आहात काय?

**चैतन्य वाहू लागते. कारण त्या देवीदेवतांची शक्ती हेच त्याचे सारतत्त्व आहे. कारण मीच ती शक्ती आहे म्हणून चैतन्यलहरी येतात. कोणी ऋषीमुनींचे नाव घेऊन विचारा ते सर्व मीच आहे. श्लोकात हेच सांगण्याचा प्रयत्न केला आहे.**

- बीजमंत्राचा अर्थ आहे ''वैखरी.'' वैखरी म्हणजे 'वाक् शक्तिः. ज्या लोकांना आत्मसाक्षात्काराची शक्ती प्राप्त होते, ते वाक् शक्तीलाच मंत्र करतात. जेव्हा त्यांना आपल्या चक्रांना सुधारायचे असते किंवा आपल्या डाव्या, उजव्या बाजू दुरुस्त करावयाच्या असतात, तेव्हा त्यांना बीजमंत्र म्हणावे लागतात. जेव्हा ते बीजमंत्राचे पठण करतात तेव्हा त्या भागाला बीज प्राप्त होते. बीजाला अंकुरित होऊन वाढायचे असते म्हणून प्रथम स्थानावर त्यांनी बीजमंत्र म्हणावे लागतात. त्यानंतर त्यांना वेगवेगळ्या चक्रांचे वेगवेगळे मंत्र म्हणावे लागतात. प्रथम बीज आहे; नंतर वृक्ष. त्यामुळे प्रथम 'बीज' समजाल तर हा मंत्र म्हणता म्हणता आपल्या आत बीजारोपण करता. यानंतर तुम्ही सर्व मंत्र म्हणू लागता. याप्रकारे तुम्ही याला पुढे नेता. वाढवता.

'संस्कृत' शब्दाचा उद्गम कुंडलिनीच्या गतीने होतो. जेव्हा त्याच्यातून आवाज येतो. या सर्व बाबी ऋषींनी लिहून ठेवल्या होत्या. याचप्रकारे सर्व चक्रांच्या पाकळ्यांच्या संख्येनुसार स्वर आणि व्यंजन असतात. तुम्ही असे म्हणू शकता, की चक्रांच्या ज्या पाकळ्या असतात, त्यानुसार संस्कृत भाषेची वर्णमाला तयार होते. संस्कृत भाषेला पवित्र केले आहे.

संस्कृत भाषेला पवित्र भाषा म्हणतात. सगळ्यात आधी फक्त एकच भाषा होती. तिच्यातून दोन भाषांचा जन्म झाला. एक लॅटिन भाषा आणि दुसरी पवित्र केलेली संस्कृत भाषा. संस्कृत भाषा ऋषीमुनींची देणगी आहे. ऋषींनी आपल्या अंतरातील आवाज ऐकला आणि भाषा निर्माण केली. ही 'वैखरी'ची शक्ती आहे. आता तिची लिपी 'वैखरी' आहे. आता शक्तीही आहे आणि यंत्रेही आहेत, पण हिला दिव्यत्व देण्यासाठी तुम्हाला मंत्ररूप द्यावे लागेल. मंत्र बनविण्यासाठी प्रथम बीजमंत्र माहीत हवा, तरच हवा तो मंत्र तयार करता येतो. जर तुम्ही तुमची कुंडलिनी उठवू इच्छिता तर तिचा बीजमंत्र आहे 'ऱ्हीं ऱ्हींपासून तुम्ही पुढीलप्रमाणे मंत्र बनवू शकता.

''ॐ त्वमेव साक्षात श्री ऱ्हीं साक्षात....'' याप्रकारे तुम्ही देवीदेवतांचे मंत्र म्हणत जा.

तुम्ही सर्व आता विद्वान झालात. तुम्ही आता असा विचार करायला हवा, की हळूहळू ही विद्या तुमच्या आत कशाप्रकारे सामावते आहे. तुमच्यापुढे कोणी अध्यापक (शिक्षक) किंवा कोणी दुसरे छडी घेऊन बसले नाही. तुमच्या आतून - बाहेरून पूर्ण विद्या प्रकट होत आहे. मी जे काही सांगते ते तुम्ही आपल्या चैतन्यलहरींद्वारा पारखू शकता. तर ही विद्या तुमच्या हातात सामावली आहे. तुम्ही हे मी सांगते म्हणून करीत नाही. मात्र यासाठी स्वीकार करता कारण हेच सत्य आहे. समजा, मी म्हणाले, हे पाणी आहे. तुम्ही काय कराल? ते पिऊन बघाल. तहान भागली तर हेच पाणी आहे, हे स्वीकार कराल. अन्यथा तुम्ही विश्वास ठेवणार नाही. हे पण असेच आहे

- आपण ''स्वयंसिद्ध'' आहोत.
- 'रा' म्हणजे राधाशक्ती आहे. जी शक्तीला धारण करते ती राधा होय. ती महालक्ष्मी आहे म्हणून ती कुंडलिनीला सांभाळते.
- 'ई' आद्या माँ (आई) आहे आणि 'र' शक्ती कुंडलिनी आहे म्हणून 'ऱ्हीं'चा अर्थ आहे, की तुमच्या आतून महालक्ष्मी तत्त्वातून जाणारी शक्ती आहे ती 'रा' आहे.

तुम्ही बघा, ऊर्जा या मार्गाने जाताना आदिशक्तीकडे जाते. म्हणून 'री' योगी लोक केवळ एक-तार (योग) असण्यावर विश्वास करतात. ते त्याचा जप करतात. योगी योगावर विश्वास ठेवतात. त्याचप्रमाणे योगींना शक्ती आणि आदिशक्तीची देखभाल करावयाची असते. ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. कारण शक्ती अशीच असायला हवी. ती कुंडलिनी असो किंवा आद्य 'आई!'(माँ) चौदा हजार वर्षांपूर्वी ऋषींनी हे सर्व लिहिले होते व ते लिखित अक्षरशः सत्य आहे. तुम्ही ते जाणता, माहिती आहे. आता तुम्ही हे पुस्तक (देवी सप्तशक्ती) वाचाल तेव्हा तुमचे तुम्हीच समजाल.

चित्तस्वरुपिणी उजवीकडे महासरस्वती आहे. नंतर सत्त्वस्वरुपिणी महालक्ष्मी आहे. आनंदरुपिणी महाकाली आहे. तुम्ही सर्व या गोष्टी जाणता.

(ब्रह्मज्ञान प्राप्त करण्यासाठी आम्ही सदैव आपले ध्यान करतो) त्याशिवाय तुम्ही सर्वकाही प्राप्त केले आहे. ध्यानधारणा न करताच तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळविला आहे. प्राप्त केला आहे. आता तुम्ही अवश्य ध्यान करा. याबद्दल काय करायला हवे, हे मला माहीत नाही.

साक्षी अवस्थेत तुम्ही शून्य बनता. साक्षी अवस्थेत तुमचा अहं (अहंकार) शिल्लक राहत नाही. तुम्ही फक्त आत बघा आणि हे 'शून्य' होऊन जाते. मग तुम्ही शून्यावस्थेत असता तर शक्ती कोण आहे? ती तीच आहे. तुम्ही निर्विचार अवस्थेत आहात. हजारो जणांनी निर्विचार अवस्था प्राप्त केली आहे. त्यांनी हे प्राप्त केले आहे. मग कोणाला माहीत आहे? मला माहीत आहे तुमची कुंडलिनी जागृत झाली आहे की नाही? तुम्हाला कदाचित हे माहिती नसेल, पण मला हे माहीत आहे. म्हणून तीच तुमच्या सर्व अवस्थांना समजते.

तुम्ही सर्व विचार कॉम्प्युटरप्रमाणे समजू शकता. याला आधीच खूप उत्तम प्रकारे तयार केले आहे. त्यामुळे पुढे घडणाऱ्या सर्व गोष्टी आपल्या आत छायांकित (अंकित) करून घेतो. जसे मी आता तुमच्याशी बोलते आहे, अचानक कोणी बसले आहे त्याच्याशीही मी हा हूं करून बोलते. माझे चित्त त्याच्याकडे, तिकडेही आहे, मी तुमच्याशी बोलते, चित्त तेथे आहे. लगेच कुंडलिनी उठते. कामे याप्रकारे अशी होतात.

# अष्टमी – नवरात्र १८–१०–१९८८

## एकादशोऽध्याय : (देवीमाहात्म्य)

**महालक्ष्मी श्लोकाः**

**बालरविद्युतिमिन्दुकिरीटां तुंगकुचां नयनत्रयुक्ताम्।**
**स्मेरमुखीं वरदाङ्कुशपाशाभीतिकरां प्रभजे भुवनेशीम् ।।**

मी भुवनेश्वरीदेवीचे ध्यान करतो. तिच्या श्रीअंगाची आभा (प्रकाश) प्रभातकालीन सूर्याप्रमाणे आहे. मस्तकावर चंद्राचा मुकुट आहे. ती उभारलेल्या स्तनांनी आणि तीन नेत्रयुक्त आहे. तिच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर (छटा) पसरलेली असते. हातात वरद, अंकुश, पाश आहे. तिच्या मुखावर अभयमुद्रा शोभत आहे. (असते)

**ॐ ऋषिरूवाच ।। १ ।।**
**देव्या हते तत्र महासुरेन्द्रे, सेन्द्रा सुरा वहूनिपुरोगमास्ताम्।**
**कात्यायनीं तुष्टुवुरिष्ट लाभाद् विकाशिवक्त्राब्ज विकाशिताशाः ।। २ ।।**

ऋषी म्हणतात : ।। १ ।।

देवीद्वारा महादैत्यपती शुम्भाला मारल्यानंतर इंद्रादिदेवता अग्नीला पुढे करून त्या कात्यायनीदेवीची स्तुती करू लागले. त्या वेळी (अभीष्ट) चिंतनामुळे तिचे मुख तेजस्वी दिसत होते आणि त्या प्रकाशामुळे दिशा प्रकाशित झाल्या होत्या. ।। २ ।।

**देवि प्रपन्नार्तिहरे प्रसीद, प्रसीद मातर्जगतोऽखिलस्य।**
**प्रसीद विश्वेश्वरि पाहि विश्वं, त्वमीश्वरी देवि चराचरस्य ।। ३ ।।**

देव म्हणाले, हे शरणागताची दुःख दूर करणाऱ्या देवी! आमच्यावर प्रसन्न व्हा! संपूर्ण जगाच्या माते प्रसन्न हो! विश्वेश्वरी! विश्वाचे रक्षण कर. देवी तूच चराचर जगताची अधीश्वरी आहेस ।। ३ ।।

**आधार भूता जगतस्त्वमेका महीस्वरूपेण यतः स्थितासि।**
**अपां स्वरूपस्थितया त्वयैतदाप्यायते कृत्स्नमलंघ्यवीर्ये ।। ४ ।।**

तू या जगाची एकमात्र आधार आहेस कारण पृथ्वीरूपात तूच प्रस्थापित (स्थिती) आहेस. देवी, तुझा पराक्रम अलंघनीय आहे. तूच जलरूपात स्थापित होऊन (जलरूपाने येऊन) संपूर्ण जगाची तृप्ती करतेस (तृषा भागवतेस) ।। ४ ।।

**त्वं वैष्णवी शक्तिरनन्तवीर्या विश्वस्य बीजं परमासि माया।**

**सम्मोहितं देवि समस्तमेतत् त्वं वै प्रसन्ना भुवि मुक्ति हेतुः ।। ५।।**

तू अनंत बलसंपन्न वैष्णवी शक्ती आहेस. या विश्वाची कारणीभूत परामाया आहेस. देवी, तू या समस्त जगास मोहित केले आहेस. तू प्रसन्न झाल्यावर या पृथ्वीवर मोक्षप्राप्ती करून देतेस. ।। ५।।

**विद्याः समस्तास्तव देवि भेदाः स्त्रियः समस्ताः सकला जगत्सु ।**

**त्वयैकया पूरितम्बयैयत् का ते स्तुतिः स्तव्यपरा परोक्तिः ।। ६।।**

हे देवी, सर्व विद्या तुझीच वेगवेगळी रूपे आहेत. जगात जितक्या स्त्रिया आहेत त्या सर्व तुझीच रूपे आहेत. जगदंब! तू एकमात्र आहेस, जिने हे विश्व (ब्रह्मांड) व्यापले आहे. तू सर्व प्रकारच्या प्रशंसेपासून (स्तुती) दूर परावावी (वाणीचे सूक्ष्मतम रूप) आहेस. त्यामुळे तुझ्यासाठी वास्तविक कोणती स्तुती उपयुक्त आहे! ।। ६।।

**सर्वभूता यदा देवी स्वर्गमुक्तिप्रदायिनी,**

**त्वम् स्तुता स्तुतये का वा भवन्तु परमोक्तयः ।। ७।।**

जेव्हा सर्वस्वरूपादेवी स्वर्ग आणि मोक्ष प्रदान करणारी आहेस. या रूपात तुझी स्तुती केली तर तुझ्या स्तुतीसाठी यापेक्षा जास्त चांगली उपमा (उक्तियाँ) कोणती असेल?

**सर्वस्य बुद्धिरुपेण जनस्य हृदि संस्थिते।**

**स्वर्गापवर्गदे देवि नारायणि नमोऽस्तुते।। ८।।**

बुद्धिरूपाने सर्व लोकांच्या हृदयात विराजमान असणाऱ्या आणि स्वर्ग व मोक्ष प्रदान करणारी नारायणीदेवी! तुला नमस्कार ।। ८।।

**कलाकाष्ठादिरुपेण परिणामप्रदायिनि।**

**विश्वस्योपरतौ शक्ते नारायणि नमोऽस्तुते ।। ९।।**

कला, काष्ठा आदी (काळाचा छोटा घटक)च्या रूपात क्रमशः परिणामाकडे (अवस्था परिवर्तन) घेऊन जाणारी आणि विश्वाचा उपसंहार (संहार) करण्यास समर्थ नारायणी, आपणास नमस्कार ।। ९।।

**सर्वमंगलमांगल्यै शिवे सर्वार्थसाधिके।**

**शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तुते ।। १०।।**

तू सर्व प्रकारचे मंगल देणारी मंगलमयी आहेस, कल्याणदायिनी शिवा आहेस. सर्व पुरुषार्थ सिद्ध करणारी शरणागतवत्सला, तीन नेत्र असणारी व गौरी आहेस. तुला माझा नमस्कार ।। १०।।

**सृष्टिस्थिति विनाशानां शक्तिभूते सनातनि।**

**गुणाश्रये गुणमये नारायणि नमोऽस्तुते।। ११।।**

तू सृष्टीचे पालन करणारी आणि संहार करणारी शक्तिभूता सनातनीदेवी, गुणांचा आधार आणि सर्वगुणमयी आहेस. नारायणी, तुला नमस्कार असो. ।। ११।।

**शरणागतदीनार्तपरित्राणपरायणे**

**सर्वस्यार्त्तिहरे देवि नारायणि नमोऽस्तुते ।। १२।।**

शरण आलेल्या दीनपीडितांचे रक्षणात मग्न राहणाऱ्या, तसेच सर्वांची पिडा (दुःख) दूर करणाऱ्या नारायणीदेवी तुला नमस्कार (आहे) असो. ।। १२।।

**हँसयुक्तविमानस्थे ब्रह्माणीरूपधारिणि।**

**कौशाम्भःक्षरिके देवि नारायणि नमोऽस्तुते ।। १३।।**

नारायणी, तू ब्रह्माणीचे (ब्रह्माची शक्ती) रूप धारण करून हंस जोडलेल्या विमानात बसतेस आणि कुश दर्भाने (गवताने) जल शिंपडत असतेस. तुला नमस्कार असो. ।। १३।।

**त्रिशूलचन्द्राहिधरे महावृषभवाहिनि।**

**माहेश्वरीस्वरुपेण नारायणि नमोऽस्तुते ।। १४।।**

माहेश्वरी रूपात त्रिशूळ, चंद्र आणि सर्प धारण करणारी, तसेच मोठ्या (महान) वृषभा(नंदी)च्या पाठीवर बसणाऱ्या नारायणीदेवी, तुला नमस्कार असो. ।। १४।।

**मयूरकुक्कुटवृते महाशक्तिधरेऽनघे।**

**कौमारीरूपसंस्थाने नारायणि नमोऽस्तुते ।। १५।।**

मोर आणि हरणांनी (मृग) घेरलेल्या, तसेच महाशक्ती धारण करणाऱ्या कौमारी रूप धारण करणाऱ्या निष्पाप नारायणी, आपल्याला नमस्कार! ।। १५ ।।

**शंखचक्रगदाशार्ङ्गगृहीतपरमायुधे**

**प्रसीद वैष्णवीरूपे नारायणि नमोऽस्तुते ।। १६।।**

शंख, चक्र, गदा, शार्गंधनुषरूपी उत्तम आयुधे धारण करणाऱ्या वैष्णवीशक्ती रूपा नारायणी, तू प्रसन्न हो! तुला नमस्कार ।। १६।।

**गृहीतोग्रमहाचक्रे दंष्ट्रोद्धृत वसुंधरे**

**वराहरुपिणी शिवे नारायणि नमोऽस्तुते ।। १७।।**

हातात भयानक महाचक्र घेतलेली आणि दातांवर धरती उचलणारी,

बारा रूपे धारण करणाऱ्या कल्याणमयी नारायणी, तुला नमस्कार असो. ।। १७।।

**नृसिंहरुपेणोग्रेण हन्तुं दैत्यान् कृतोद्यमे।**

**त्रैलोक्यत्राणसहिते नारायणि नमोऽस्तुते ।। १८।।**

भयंकर नृसिंहरूपी दैत्याच्या वधासाठी कार्य (उद्योग) करणाऱ्या, तसेच त्रिभुवनाच्या रक्षणात संलग्न राहणाऱ्या नारायणी,

तुला नमस्कार असो. ।। १८।।

**किरीटिनि महावज्रे सहस्रनयनोज्जवले।**

**वृत्रप्राणहरे चैन्द्रि नारायणि नमोऽस्तुते ।। १९।।**

मस्तकावर किरीट आणि हातात वज्र धारण करणारी, सहस्त्र नेत्रांमुळे उद्दिपित आणि वृत्रासुराचे प्राण हरण करणारी इंद्रशक्तिरूपा नारायणीदेवी, तुला नमस्कार असो. ।। १९।।

**शिवदूतीस्वरूपेण हतदैत्यमहाबले ।**

**घोररूपे महारावे नारायणि नमोऽस्तुते ।। २०।।**

शिवदूती रूपाने दैत्यांच्या महती (महान) सेनेचा संहार करणारी, भयंकर रूप धारण करून बिकट (भयंकर) गर्जना करणाऱ्या नारायणी, तुला नमस्कार. ।। २०।।

**दंष्ट्राकरालवदने शिरोमालाविभूषणे।**

**चामुण्डे मुण्डमथने नारायणि नमोऽस्तुते ।। २१।।**

दाढांमुळे विक्राळ मुख असणारी, मुंडमालांनी विभूषित असणारी, मुंडमर्दिनी. चामुंडारूपा नारायणी तुला प्रणाम. ।। २१।।

**लक्ष्मि लज्जे महाविद्ये श्रद्धे पुष्टिस्वधे ध्रुवे ।**

**महारात्रि महाऽविद्ये नारायणि नमोऽस्तुते ।। २२।।**

लक्ष्मी, लज्जा, महाविद्या, श्रद्धा, पुष्टी, स्वधा, ध्रुवा, महारात्री आणि विद्यारुपा नारायणी तुला नमसकार. ।। २२।।

**मेधे सरस्वति वरे भूति बाभ्रवि तामसि ।**

**नियते त्वं प्रसीदेशे नारायणि नमोऽस्तुते ।। २३।।**

मेघा, सरस्वती, वरा (श्रेष्ठा), भूति (ऐश्वर्युरुपा), बाभ्रषी (पिंगट रंगाची किंवा पार्वती), तामसी (महाकाली), नियता (संयमी), तसेच ईशा (सर्वांची अधीश्वरी) रुपिणी नारायणी तुला नमस्कार असो. ।। २३।।

**सर्वस्वरूपे सर्वेशे सर्व शक्तिसमन्विते ।**

**भयेभ्यस्त्राहि नो देवि दुर्गे देवि नमोऽस्तुते ।। २४।।**

सर्वस्वरूपा, सर्वेश्वरी, तसेच सर्व प्रकारच्या शक्तींनी संपन्न दिव्यरुपा दुर्गे! सर्व भयांपासून आमचे रक्षण कर. तुला नमस्कार.।। २४।।

**एतत्ते वदनं सौम्यं लोचनत्रयभूषितम् ।**

**पातु नः सर्वभीतिभ्यः कात्यायनि नमोऽस्तुते ।। २५।।**

कात्यायनी, हे तीन लोचनांनी (नेत्रांनी) विभूषित तुझे सौम्य मुख सर्व प्रकारच्या भयापासून आमचे रक्षण करो. तुला नमस्कार असो.।। २५।।

**ज्वालाकरालमत्युग्रमशेषासुरसूदनम् ।**

**त्रिशूलं पातु नो भीतेर्भद्रकालि नमोऽस्तुते ।। २६ ।।**

भद्रकाली, ज्वालांमुळे विक्राळ दिसणारा, अत्यंत भयंकर आणि समस्त आसुरांचा संहार करणारे आपले त्रिशूळ. त्यापासून आम्हाला वाचव. तुला नमस्कार असो. ।। २६ ।।

**हिनस्ति दैत्यतेजांसि स्वनेनापूर्य या जगत् ।**

**सा घण्टापातु नो देवि पापेभ्योऽनः सुतानिव ।। २७ ।।**

देवी, ती तुमची घंटा जी आपल्या ध्वनीने संपूर्ण जग व्यापते. (जगात घंटेचा आवाज घुमतो) त्यामुळे दैत्यांचे तेज नष्ट होते. अशी तुमची घंटा आम्हा लोकांच्या पापाची त्याचप्रकारे रक्षा करो. जसे माता आपल्या पुत्रांचे वाईट कृत्यांपासून रक्षण करते. ।। २७ ।।

**असुरासृग्वसापंक चर्चितस्ते करोज्वलः ।**

**शुभाय खड्गो भवतु चण्डिके त्वां नता वयम् ।। २८ ।।**

चंडिके, तुझ्या हातात सुशोभित खड्ग जे असुरांचे रक्त आणि चरबीने चर्चित आहे. आमचे मंगल कर. आम्ही तुला नमस्कार करतो. ।। २८ ।।

**रोगानशेषानपहंसि तुष्टा रुष्टा तु कामान् सकलान भीष्टान् ।**

**त्वामाश्रितानां न विपन्नराणां त्वामाश्रिता ह्याश्रयतां प्रयान्ति ।। २९ ।।**

देवी, तू प्रसन्न झाल्यावर सर्व रोग नष्ट करतेस आणि रागावलीस (कुपित) की मनोवांच्छित सर्व कामनां (इच्छा)चा नाश करतेस. जे लोक तुला शरण आले आहेत त्यांच्यावर विपत्ती येतच नाही. तुला शरण आलेली माणसे इतरांना शरण देणारी होतात. (त्यांचे रक्षण करणारी होतात.) ।। २९ ।।

**एतत्कृतं यत्कदनं त्वयाद्य, धणद्विषां देवि महासुराणाम् ।**

**रुपैरनेकैर्बहुधाऽऽत्ममूर्ति कृत्वाम्बिके तत्प्रकरोति कान्या ।। ३० ।।**

देवी अंबिके, तू आपल्या स्वरूपाला अनेक भागात विभक्त करून नाना प्रकारच्या रूपाने या वेळी या धम्रद्रोही महादैत्यांचा संहार केला आहेस. हे सर्व दुसरे कोणाला शक्य होते? (कोणी केले असते?) ।। ३० ।।

**विद्यासु शास्त्रेषु विवेकदीपैष्वाद्येषु वाक्येषु च का त्वदन्या ।**

**ममत्वगर्तेऽति महान्धकारे विभ्रामयत्येतदतीय विश्वम् ।। ३१ ।।**

विद्यांमध्ये, ज्ञानाला प्रकाशित करणाऱ्या शास्त्रांमध्ये, तसेच आदिवाक्यांमध्ये (वदांतमध्ये) तुझ्याशिवाय कोणाचे वर्णन आहे? तूच अशी शक्ती आहेस, जी या विश्वाला अज्ञान आणि ममत्वाच्या घोर अंधःकाराने परिपूर्ण खड्ड्यात निरंतर भटकवते आहेस. ।। ३१ ।।

**रक्षांसि यत्रोग्रविषाश्च नागा यत्रारयोदस्युबलानि यत्र ।**

**दावानलो यत्र तथाब्धिमध्ये, तत्र स्थिता त्वं परिपासि विश्वम् ।। ३२ ।।**

जेथे राक्षस, जिथे भयंकर विषारी सर्प, जिथे शत्रू, लुटारूंची सेना आणि जेथे दानावल (समुद्रातील अग्नी) असेल तिथे आणि समुद्राच्या मध्य भागातही आपल्याबरोबर राहून तू विश्वाचे रक्षण करतेस. ।। ३२ ।।

**विश्वेश्वरि त्वं परिपासि विश्वं विश्वात्मिका धारयसीति विश्वम्**

**विश्वेशवन्द्या भवती भवन्ति विश्वाश्रया ये त्वयि भक्तिनम्राः ।। ३३ ।।**

विश्वेश्वरी, तू विश्वाचे पालन करतेस. विश्वरुपा आहेस. त्यामुळे सर्व विश्वाला धारण करतेस. तू भगवान विश्वनाथाची ही (शंकर) वंदनीय आहेस. जे लोक भक्तिपूर्वक तुझ्यासमोर मस्तक टेकवतात, ते संपूर्ण विश्वाला आश्रय देणारे आहेत. ।। ३३ ।।

**देवि प्रसीद परिपालय नोऽरिभीतेर्नित्यं यथासुरधादधुनैव सद्यः ।**

**पापानि सर्वजगतां प्रशमं नयाशु, उत्पातपाकजनितांश्च महोपसर्गान ।। ३४ ।।**

देवी प्रसन्न हो! जसे या वेळेस आसुरांचा वध करून तू आमचे शीघ्र रक्षण केलेस. याप्रमाणेच तू आम्हाला शत्रूच्या भयापासून वाचव. संपूर्ण जगाचे पाप नष्ट कर. उत्पात आणि पाप यामुळे उत्पन्न होणाऱ्या महामारी (प्लेग, कॉलरा) इ. मोठमोठ्या आपत्तींना त्वरित दूर कर. ।। ३४ ।।

**प्रणतानां प्रसीद त्वं देवि विश्वार्तिहारिणी ।**

**त्रैलोक्यवासिनामीड्ये लोकानां वरदा भव ।। ३५ ।।**

विश्वाची पीडा (दुःख) दूर करणाऱ्या देवी, आम्ही तुझ्या चरणावर पडलो आहोत. आमच्यावर प्रसन्न हो. त्रिलोकनिवासीयांची पूजनीय परमेश्वरी, सर्व लोकांना वरदान दे ।। ३५ ।।

---------------------------

# अष्टमी– नवरात्र १८–१०–१९८८

महालक्ष्मी स्तोत्रात या सर्व बाबी का हव्यात? कारण ती कुंडलिनी आहे. महा–लक्ष्मी कुंडलिनीची वाहक आहे. म्हणून आठ लक्ष्मी अष्टलक्ष्मी आहेत त्यानंतर महालक्ष्मी येते. त्यानंतर दक्षलक्ष्मी येते. आमच्या आत एकानंतर एक या शक्ती आहेत. ज्यांची अभिव्यक्ती महालक्ष्मी नाडीवर होते. महालक्ष्मी नाडीवरच गौरीबद्दल विचार करावा लागतो. कारण गौरीच कुंडलिनी आहे. हेच कारण आहे, की लोक उदे गं अंबे उदे म्हणतात. हे भजन महालक्ष्मीच्या मंदिरात म्हटले जाते. का? कारण केवळ महालक्ष्मीच्या मंदिरातच म्हणावे लागते की हे कुंडलिनी माते आम्ही आता तयार आहोत. आमच्या आत महालक्ष्मी तत्त्व आहे. कृपा करून आता तू जागृत हो. यामुळेच आवाहन करावे लागते. पालन म्हणजे पोषण करणे किंवा मुलाची देखभाल करणे. ती पूर्ण विश्वाची, मातेसमान देखभाल करते.

हे देवी, तू पूर्ण जगाची आधार आहेस. कारण तू पृथ्वीमातेच्या रूपात विद्यमान आहेस आणि पूर्ण ब्रह्मांडास धारण करतेस (तू चराचर व्यापून राहिली आहेस.) पृथ्वीमातेमुळेच हे ब्रह्मांड चालत आहे. कारण पृथ्वीमातेची निर्मिती ब्रह्मांडापासून केली गेली होती आणि पूर्ण ब्रह्मांडाला पृथ्वीमाता सांभाळते. जसे तुम्ही एखादे घर बनवता. घर तर आहे. पण ते घर कोण सांभाळते? त्या घरात राहणारी व्यक्ती. जे घरात राहतात तेच घराचा सांभाळ करतात. घरात राहणाऱ्या माणसांशिवाय 'घर' अर्थहीन असते. जसे लग्नात नवरदेवच नसेल, तर लग्नाला काय अर्थ? पृथ्वीमातेचे केवळ अस्तित्वच पूर्ण ब्रह्मांडाला अर्थ प्राप्त करून देते.

महालक्ष्मी आमच्या मस्तकाची (मेंदू) देखभाल करते. त्यामुळे कोणतेही ज्ञान मेंदूच्या माध्यमातून येते ते महालक्ष्मी तत्त्वाद्वारा सिद्ध केले जाते. त्याची देखभाल केली जाते किंवा असे म्हणता येते, की त्यांचे पोषण केले जाते. 'परावाणी'ची सुरुवात येथूनच होते. (श्रीमाताजी आपल्या नाभीवर हात ठेवून याची व्याख्या करीत. ते स्पष्ट करतात) हा नाद (Sound) आहे, जो मौन आहे.

हा नाद जेव्हा हृदयावर येतो आणि अनाहत होतो, त्याला 'पश्यंती' म्हणतात. कारण ते फक्त साक्षीरूप असते. 'वाणी' ही वाणीची शक्ती, नादाची शक्ती, साक्षी मात्र आहे आणि अनाहत अवस्था आहे. तेव्हा ती विशुद्धी स्तरावर येते आणि तिला 'मध्यमा' म्हणतात. आताही ती मध्यमा अवस्थेत गळा (घसा) आणि नाकापर्यंत आहे. पण जेव्हा ती मुखापर्यंत येते तेव्हा ती 'वैखरी' होते. म्हणजेच ती बोलते. (शब्द ध्वनीरूप होतात.) त्यामुळे परावणीचा अर्थ हा आहे किंवा जेव्हा परमेश्वराला आपल्याला काही सांगायचे असेल, तर परमेश्वर परावाणीत सांगतो. त्याचे बोल तुम्ही ऐकू शकत नाही. तुम्हाला हेही कळत नाही, की परमेश्वर काय सांगतो. ते ऐकू येत नाही. अगदी याचप्रकारे तुमच्या आतही अनेक परावाणी आहेत. निःसंशय त्या परमेश्वरी परावाणीची प्रतिबिंबे आहेत जे तुम्ही ऐकू शकत नाही. तुमच्या पोटात तुम्ही परावाणी ऐकू शकत नाही, पण पोटात काही कष्ट होऊ शकतात. (पोट दुखते) विशेषतः कॅन्सर किंवा असाच कोणता तरी त्रास होऊ शकतो. तेव्हा काही तरी समस्या आहे हे लक्षात येते. याने 'स्पंदन' होते.

ज्या चैतन्यलहरी तुम्ही प्राप्त करता त्या 'परावाणी'च्या प्रभावामुळे प्राप्त होतात. त्या दर्शवतात की इथे काहीतरी कष्टप्रद आहे. ते कष्ट तुम्ही पाहू शकता. कारण तेथे धडधड सुरू होते. कुंडलिनी जेव्हा वर चढू लागते तेव्हा काही आवाज करीत नाही, पण येथे सहस्रावर येते आणि काही अडचण असेल तर वर जाताना त्या स्थानावर धडकते. जोपर्यंत त्या स्थानावर अडथळे असतील कुंडलिनी तिकडे धडधडत राहते. हे स्वच्छ आणि वाहत्या पाण्यासाखे आहे. ते वाहते तोपर्यंत आवाज करीत नाही, पण अडथळा आला, की बाधा आली. ते पाणी आवाज करू लागते. यात अंतर्जात आवाज आहे. पाण्याच्या टकरीमुळे आवाज येतो आणि अंतर्जात रूपाने हा आवाज 'वाणी'चे रूप घेतो. म्हणजे हा मौन आवाज (नाद) या चारही अवस्थांमधून ऊर्ध्वगामी होतो आणि जेव्हा मुखाजवळ (ओठांजवळ) पोचतो तेव्हाच 'वैखरी' होतो. परमात्म्याचेच उदाहरण घेऊ. जेव्हा ते बोलतात तेव्हा 'परावाणी'ची अवस्था प्राप्त केल्याशिवाय त्यांची वाणी कोणी ऐकू शकत नाही. 'परावाणी'चा अनुभव आल्याशिवाय तुम्ही परमेश्वराला ऐकू शकत नाही. तेव्हा काय होते की परमेश्वराला स्वयं पृथ्वीवर अवतरित व्हावे लागते. आणि तुमच्यासमोर रहस्ये स्पष्ट करण्यासाठी आपल्या 'वैखरी'चा उपयोग करावा लागतो. त्यामुळे तुम्ही खालच्या बाजूस चालू लागता. जेव्हा तुम्ही 'मध्यमा' अवस्थेत येता जिथे तुम्ही शांती अनुभवता. 'पश्चंती' अवस्थेवर आल्यावर 'साक्षी' अवस्थेचा आनंद घेता. जेव्हा परावाणीपर्यंत येता तिथे तुम्हाला आवाज ऐकू येतो किंवा तुम्ही म्हणू शकता, की तुम्हाला सूचना मिळते. फक्त सूचना. इथे काही आवाज नसतो, गोंगाट नसतो. काहीही नसते. फक्त विचारांसारखी सूचना. विचारांना कोणताही आवाज नसतो. पण तुम्ही परावाणीपासून प्रेरणा घेऊ शकता. विचारांना आवाज नसतो. याचप्रमाणे ही आवाजविहित बाब आहे, जी येत असते.

**एका सहजयोगीचा प्रश्न :** काय ते भवसागरात आहे, नाभीत आहे किंवा कोणत्या विशेष स्थानी आहे?

**श्रीमाताजी :** नाभीमध्ये! हे लक्ष्मीतत्त्व आहे. जेव्हा महालक्ष्मी चालते तेव्हा सर्वकाही कार्यान्वित होते. पण जेव्हा तुम्ही 'आज्ञा'च्या वर जाऊ लागता तेव्हा ही 'वाणी'च्या रूपात येते. आनाहद म्हणजे चैतन्यलहरींचा आवाज. मी तो ऐकू शकते. माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे, की कोणी व्यक्ती माझ्यावर हात ठेवील (मला स्पर्श करील) तोही हा आवाज ऐकू शकतो. तुम्ही सर्व प्रकारचे आवाज ऐकता. तेव्हा ते तुमच्या डोक्यात आवाज येतात.

जेव्हा ती सहस्रारात पोचते तेव्हा ती धडधड सुरू करते. (धडकन) तेव्हा ब्रह्मरंध्र उघडते. वाणी आवाज बनते आणि परमात्म्याशी एकरूप होते. पण ही अवस्था मानवात सहसा येथूनच येते. (परमेश्वराकडून) परमात्म्यापासून आहे आणि जर आवाज दिला गेला तर आज्ञाचक्र उघडते. आणि सहस्राराला जेव्हा हे पार करते तेव्हा ही वाणी, चैतन्यलहरींचा हा आवाज निघतो. मुख्य गोष्ट ही आहे, की व्यक्तीने हे समजले पाहिजे की जेव्हा तुम्ही 'निर्विकल्प' अवस्थेत पोचता ते 'वाणी'च्या माध्यमातून तुमच्या मेंदूत प्रेरणा देते आणि प्रेरणेमुळे तुम्ही समजू शकता. जसे मी म्हणते, की तुम्ही बारकाईने गोष्टी समजून घ्या. ते यासाठी सांगते, की तुम्ही आता संवदेनशील, सूक्ष्म व्यक्ती झाला आहात. तुम्हीही सूक्ष्माला समजू शकता आणि सूक्ष्म गोष्टी बोलू लागता. उदाहरणस्वरूप काही सहजयोगी कवी बनले आहेत.

**एका सहजयोगीच्या प्रश्नाच्या उत्तरात श्रीमाताजी म्हणतात (सांगतात) :**

सुरुवातीला जेव्हा सदाशिव आणि आदिशक्ती एकमेकांपासून अलग झाले त्या वेळेस जो 'टणत्कार' होतो' तेव्हाच मुख्य गोष्ट सुरू झाली. त्या वेळी आदिशक्तीने तीन रुपे धारण केली. एका रूपातून तिने पंचमहाभूते तयार केली. तो टणत्कार (ॐकार) मांगल्य आणि पावित्र्य आहे. तो टणत्कार पूर्ण वातावरणात पसरला तो मांगल्य आणि पावित्र्य आहे. सर्व निर्मित वस्तूंमध्ये त्याचा प्रवेश झाला; परंतु याचे सृजन उजवी (राजसतत्त्व) कडून केले गेले. अजूनही ती याने घेरलेली आहे. जसे हे घर बनवले आहे; परंतु त्याच्याभोवतालचे वातावरण (Surrounding) भिन्न आहे. वातावरणाची हवा (वायू) ॐकार आहे. पण ॐकाराने हे घर बनवले नाही, पण घराच्या आजूबाजूला ॐकाराचे वातावरण आहे. म्हणून ॐकारच त्याला तयार करतो. चालवतो. कारण चैतन्यरूपी ॐकार सतत पथप्रदर्शन करतो. मार्ग दाखवतो. आयोजन करतो आणि प्रत्येक गोष्टीच्या आत प्रवेश करून त्याला सुधारतात.

**सहजयोगी : श्रीमाताजी हे कार्य तर केवळ देवीच करते ना?**

**श्रीमाताजी** : देवी सर्व कामे करते, यात कोणतीच शंका नाही. ती कर्ता आहे म्हणून सर्वकाही करू शकते. सर्वप्रथम ती श्रीगणेशाचे सृजन करते. ज्यांच्या माध्यमातून मंगलता आणि पावनता (पावित्र्य) यांचे नियंत्रण करते. जिच्या माध्यमातून ती (देवी) पूर्ण ब्रह्मांडातील वातावरणात सामावते. त्यानंतर ती सर्व वस्तूत प्रवेश करते. तिने एखाद्या वस्तूला स्पर्श केला तर ती वस्तू पवित्र होऊन जाते. कारण चैतन्य त्या वस्तूत प्रवेश करते आणि ती वस्तू पावन व मंगलमय होते. थोडक्यात, देवी कोणत्याही वस्तूत प्रवेश करू शकते. मात्र, वस्तू जर मृत असतील तर त्यांच्यात ॐकार असत नाही. ॐकारात विद्युत चुंबकीय शक्ती (Electromagnetic Force) आहे. ही विद्युत चुंबकीय शक्ती देवीच्या स्पर्षाने उच्चतम अवस्थेत जाते. जेव्हा त्यात नायट्रोजन (Nitrogen) प्रवेश करतो तेव्हा हा प्राण (Prana) होतो.

म्हणजे भिन्न अवस्थांमधून गेल्यानंतर मनुष्य बनतो. **मानव बनल्यानंतरही व्यक्ती जर आत्मसाक्षात्कारी झाली नाही तोपर्यंत व्यक्ती निम्नस्तराचा मानवच राहते.**

आत्मसाक्षात्कार प्राप्त केल्यानंतर गोष्ट वेगळी होते. विकासावस्थेच्या सर्व अवस्थांमध्ये ॐकार-ज्याला आपण चैतन्य म्हणतो ते प्रत्येक वस्तूत प्रवाहित होते. तिन्ही शक्तीही चैतन्याचा उपयोग करतात. हेच कारण आहे, की हा ॐ-ए- यू (अ उम) म्हटला जातो. देवी वेगवेगळी कार्ये करण्यासाठी या चैतन्याच्या भिन्न, भिन्न शक्तींचा उपयोग करीत असते. तरीही पूर्ण 'ॐ'चा उपयोग केला जात नाही. हा एक क्लिष्ट (किचकट) मामला आहे.

या सूक्ष्म गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न न करणे, हे उत्तम. जितका जास्त प्रयास तुम्ही कराल तितके त्यात अडकत जाल. तितकी जास्त तुमची आज्ञा पकडेल. सगळ्यात चांगले हे, की आपल्या आज्ञाचक्रास शांत राहू द्या. मी हे म्हणेन, की आज्ञाचक्रापेक्षा भक्तीकडे जास्त लक्ष द्या. भक्ती तुम्हाला त्वरित प्राप्त होईल.

प्रत्येक वेळी हे काय? ते काय? इ. इ. असे म्हणत राहणे यामुळे सतत तुमच्या आज्ञेचे घुसळण (मंथन) होत राहते. हे एक मोठ्ठे चक्र चालावे तसे आहे. त्याला थांबवणेच चागले. बस भक्तीत या, भक्ती करा. शंकराचार्यांनी काय केले होते? सर्वांत आधी त्यांनी 'विवेकचुडामणि' लिहिले. पण लवकरच ते या वादविवादाने कंटाळून गेले. तेव्हा त्यांनी सांगितले, की हे सर्व अर्थहीन आहे. त्यानंतर श्री शंकराचार्यांनी हे सर्व लिहिले. म्हणून सर्वप्रथम तुम्ही भक्ती करा. भक्तीत लीन व्हा. कारण या प्रकारच्या जिज्ञासाचा अंत नाही. माझे पुस्तक छापून येत आहे. तुम्ही वाचू शकता.

ग्रेगोरच्या पुस्तकाप्रमाणे त्यांनी एक पुस्तक लिहिले आहे. त्याचे पहिले प्रकरण खूप चांगले होते. त्यात त्यांनी लिहिले होते, की ते मला कुठे भेटले वगैरे. ते सर्व खूप मधुर होते आणि त्यानंतर अचानक जिब्राल्टची चढण पुढे आली. त्याला ज्या गोष्टी माहीत होत्या त्या सर्व त्याने लिहिल्या होत्या.

मी म्हटले समाप्त! तुझे हे पुस्तक कोणीही वाचणार नाही. त्यानंतर त्याच्याबरोबर एक वर्षापर्यंत या पुस्तकाचे संशोधन केले. हे खूप कठीण काम होते. त्यात 'आज्ञा' खूप जास्त होती. अवघड काम होते. शेवटी मी म्हटले आता सर्व गोष्टी व्यवस्थित झाल्या आहेत. फक्त इतकेच करायचे, की ही दोन प्रकरणे पुस्तकाच्या शेवटी घ्यायची. हे ऐकून तर तो बेशुद्ध झाला. मी म्हटले, की ही दोन प्रकरणे जिब्राल्टच्या चढणीसारखी आहेत. केवळ बुद्धिजीवी लोकच हे वाचू इच्छितील. त्यामुळे ही प्रकरणे मागे टाकणेच इष्ट होईल. तो म्हणू लागला, तुम्ही असे कसे म्हणता? मला सर्व पुस्तकच बदलावे लागेल. मी म्हणाले, 'नाही, मी हे पुस्तक सुरुवातीपासून वाचले आहे. त्यामुळे तू ही प्रकरणे इथून काढून मागे जोड, हा माझा आदेश आहे.

आता कोणी ती प्रकरणे वाचत नाहीत. जे 'आज्ञा'बाधित आहेत तेच ती प्रकरणे वाचतात आज्ञेच्या पकडीत येतात.

**...तर माझ्या सांगण्याचा उद्देश हा आहे, की आपल्या 'आज्ञे'स नियंत्रित करा आणि भक्तीत रममाण व्हा. (भक्ति में उतर जाये)**

पूर्ण वस्तूंतून किती गोष्टी तुमच्यापुढे स्पष्ट (व्याख्या) करू शकते? खूपच थोड्या. तुम्ही जर मला विचारले, की माताजी, जिथे कोणीही नसते तिथेही तुम्हाला सर्व कामे करणारे कसे मिळतात? कसे भेटतात? तिथे तुम्हाला प्रकाश कसा मिळतो? तुम्हा लोकात ती 'चित्ती' नाही. तुमच्या आत तो कॉम्प्युटर नाही, हे मी तुम्हाला समजावू शकते. पण ते खूप गहन, कठीण होईल. तुम्ही फक्त भक्तीत उतरा. खोलवर जा.

खूप प्रश्न विचारणे भक्तीची हत्या करण्यासारखे आहे. स्वतः बघा. समजा, तुम्ही पाण्यात आहात मग तुम्ही पाण्याला विचाराल, का की हे पाण्या तू कुठून येतोस? तुझ्यात कोणते तत्त्व आहे? किंवा एखादा पदार्थ तुम्हाला खायचा असेल तर तुम्ही विचारता का, की हा पदार्थ कसा करायचा? त्याची उत्पत्ती कुठे झाली? हे कुठून आले? हे काय आहे? ते काय आहे? त्याचे रासायनिक विश्लेषण करीत नाहीत. बस ते खाल्ले जाते. जर तुम्हाला भूक लागली आहे तर पदार्थाचा आनंद घ्या. बौद्धिक चर्चा कशाला? ती अर्थहीन असते. हे मी तुम्हाला सांगते.

**पूजा करताना कधी प्रश्न विचारू नयेत. त्यामुळे पूजा खंडित होते. प्रश्न माझ्यासाठी मोठी डोकेदुखी आहे. मला हे जाणवते, की प्रश्न विचारणाऱ्यांमध्ये भक्तीची गहनता नसते. परमेश्वर भक्तीत जेव्हा तुम्ही मस्त होता, बेहोश होता तेव्हा तुम्ही कोणतेही प्रश्न विचारत नाही. (भक्तिरसात न्हाऊन निघता) (जब मस्त हुए फिर क्या बोले)** एखाद्या ब्राह्मणाला जर तुम्ही प्रश्न विचाराल तर तो सोपान उचलून तुम्हाला मारील किंवा चर्चमध्ये जेव्हा बायबलचा उपदेश (सर्मन) वाचून दाखवत असताना तुम्ही उभे राहून विचारले, की श्रीमान तुमच्या या म्हणण्याचा अर्थ काय? तर जे काही त्यांच्या हाती लागेल ते उचलून तुम्हाला मारतील.

हृदयात बुद्धीच्या रूपात – या विषयात तुम्हाला काय सांगायचे आहे? हृदयात बुद्धीच्या रूपात देवी निवास करते.

जसे विहिरीत घडा टाकला तर त्याच्या आत पाणी असते आणि बाहेरही पाणी असते. माणसाने हे समजायला हवे, की माणूस गतिमूलक (Kinetic) आहे. मला असे सांगायचे आहे, की पुरुष अवतार गतिमूलक आहे. संभाव्यशक्ती (Potential Energy) स्त्रीशक्ती आहे. त्यामुळे कृष्णाला जेव्हा कंसाचा वध करायचा होता तेव्हा त्याला राधेची मदत मागावी लागली. शक्ती अशी असते. शक्तीशिवाय अवतारांचे अस्तित्व नाही. प्रकाशाशिवाय लॅम्पचे (दिव्याचे) अस्तित्व नसते. तसाच हा प्रकार आहे. हे मुख्य रूप आहे; परंतु याच्याही मागे अनेक शक्ती आहेत, ज्यांनी ही सर्व कार्ये पार पाडली आहेत. शिवानेही अशाच प्रकारे क्रोधीत होऊन राक्षसांचा नाश केला. कारण त्यांच्या आत त्यांची शक्ती वाहत होती. ती शक्ती नररूप धारण करून आली नाही किंवा तिने असेही सांगितले नाही की, आपण जर विजय प्रात कराल किंवा काही उत्तम कार्य कराल, एखादे पदक मिळाले, तर तुम्हाला हार भेट म्हणून दिला जाईल. म्हणून देवीने ज्या राक्षसांचा वध केला होता, त्यांच्या मुंडक्यांची माळ, मुंडमाला इतर राक्षसांना भयभीत करण्यासाठी स्वतःच्या गळ्यात धारण केली. तिने सांगितले, की तुमचाही वध करून हे राक्षसांनो, तुमच्या शिराची माळ मुंडमाला मी घालीन. हे सर्व त्या राक्षसांना घाबरविण्यासाठी केले होते. पूजेसाठी तुमचा दृष्टिकोन असा हवा, की देवीने तुम्हाला मंत्रमुग्ध केले आहे. याप्रकारे तुम्ही देवीची स्तुतिगीते गाता. ही काही बौद्धिक समजदारी नाही. स्तुतिगायन तुम्ही देवीला प्रसन्न करण्यासाठी करता आहात. तुमचा दृष्टिकोनही तसाच हवा. हा बौद्धिक संशोधन प्रबंध नव्हे (शोधप्रबंध), ही तर तुम्ही देवीप्रति आपली श्रद्धा व्यक्त करीत असता. तुम्ही एखाद्या व्यक्तीवर प्रेम करता आणि त्याला खूश करण्यासाठी रिझविण्यासाठी प्रत्येक शब्द वापरता. हे तसेच आहे. ज्या संतांनी हे ग्रंथ लिहिले त्यांनी हे सर्व देवीप्रति आपला भक्तिभाव व्यक्त करण्यासाठी सांगितले आहे, की तू देवी आहेस, तू अशी आहेस, तू तशी आहेस, तू अतिमहान आहेस इ. अशीच काही पत्रे मला प्राप्त होतात. त्यात सहजयोगींच्या भावना व्यक्त झालेल्या असतात; परंतु हे काही प्रवचन नाही. ही तर हृदयाभिव्यक्ती आहे. म्हणून ती पूर्णभक्तिभावाने करायला हवी.

जे सांगितले आहे ते हृदयाने समजून घेण्याचा प्रयत्न करा. तुम्ही माझ्यासमोर बसले आहात. तुम्ही तुमच्या हृदयापासून म्हणा, की ही गोष्ट आम्ही पूर्ण नम्रतेने सांगतो, याची प्रार्थनेसारखी अभिव्यक्ती आहे. ही प्रार्थना आहे आणि ती प्रार्थनाच असायला हवी. कोणत्याही प्रकारचा बौद्धिक वादविवाद नाही. ही देवीचरणी प्रार्थना आहे. जोपर्यंत तुमच्यात हा दृष्टिकोन विकसित होत नाही तोपर्यंत तुम्ही पुढे जाऊ शकत नाही.

**खुल्या हृदयाने या सर्व गोष्टींचा उच्चार करा. हृदय उघडे करा.**

**पण बौद्धिक स्वरूपात यांना तुम्ही शब्दाच्या रूपात घेतले. त्याचे विश्लेषण केले, तर सर्व व्यर्थ होईल. हे शब्द तर फुलांप्रमाणे आहेत. तुम्ही स्वतःही पुष्पासमान आहात, कारण तुमच्या 'वैखरी'च्या माध्यमातून तुम्ही हे शब्द मला सांगू (ऐकवू) शकता. तुम्ही हे सांगू इच्छिता आहात. अन्यथा तुम्ही जर हे शब्द उच्चाराल तर तो केवळ शाब्दिक जमा-खर्च असेल. जे काही तुम्ही सांगाल तो तोंडी जमा खर्च होऊन जाईल. फक्त असे वाटेल की काही होत आहे.**

आपल्या हृदयाला प्रज्वलित (ज्योतिर्मय) करण्यासाठी तुम्हाला स्तुती करावी लागेल. व्यक्त व्हावे लागेल. तुमच्या मनातील भावना अशा हव्यात, की तुम्हाला या सर्व गोष्टी मला सांगायच्या आहेत. माझ्या प्रत्यक्ष उपस्थितीत तुम्ही हे सर्व सांगू शकत नाही. त्यासाठी तुम्हाला यात एकरूप व्हायला हवे. समन्वित व्हायला हवे. तुम्हीच ही सर्व स्तुती करता आहात, असे व्हायला हवे.

ही कृतज्ञतेची अभिव्यक्ती आहे. तुम्ही हे व्यक्त करीत आहात. ही कृतज्ञताभिव्यक्ती म्हणजे हृदयाभिव्यक्ती आहे.

विश्वेश्वरही विनम्र होतात. विश्वेश्वर म्हणजे पूर्ण ब्रह्मांडाचे ईश्वर, जे सदाशिव किंवा शिव आहेत. ते विनम्र होतात.

**पूजा करताना निर्विचारितेत राहा. विचार करू नका. हे बरोबर आहे की मीच ज्ञान आहे आणि मीच तुम्हाला ज्ञान देते; परंतु तुमचे लक्ष्य ज्ञान प्राप्त करणे, हे नाही. तुमचे लक्ष्य आहे भक्ती प्राप्त करणे, हे हवे.**

ते लक्ष्य तुम्हाला इच्छित आनंद मिळवून देते. असे लोक (ज्ञानामागे धावणारे) मी बघितले आहे. सहजयोगाबाहेर गेले. मी तुम्हाला चेतावनी (जागृत करते) देत आहे. ज्यांचे लक्ष्य बौद्धिक ज्ञानपाप्ती होते ते सर्व एक-एक करून सहजयोगाबाहेर गेले. तुम्ही मला प्रश्न विचारू नका. याला मी विशुद्ध बुद्धी म्हणते. हे सर्व समजण्याचा फायदा काय? जर तुम्ही तहानलेले आहात तर भक्तिरसाचे अमृतपान करा. समजा, तुम्हाला तहान लागली आहे आणि मी तुम्हाला भाषण देऊ लागले तर तुम्ही म्हणाल, ''अरे बाबा, आम्हाला पाणी द्या.'' आपल्या बुद्धिचातुर्याने तुम्ही लोकांना 'सहज'मध्ये आणू शकत नाही. कधीच नाही. केवळ आत्म-साक्षात्काराद्वारा आणि चैतन्यलहरीद्वाराच तुम्ही त्यांना आणू शकता. जर कोणी वाद घालू लागले, अहंच्या माध्यमातून बोलू लागले तर तुम्ही त्याच्याशी कसे बोलू शकाल? तुम्ही तर आत्म्याच्या माध्यमातून बोलू लागलात. ते अहंकाराच्या माध्यमातून बोलतात. एकतर तुम्ही त्या दुसऱ्याला आत्म्याच्या स्तरापर्यंत वर आणा किंवा त्याच्याशी बोलणे बंद करा. हे तर बहिऱ्या व्यक्तीशी बोलल्यासारखे झाले. तुम्ही काही करता आणि ते वेगळेच सांगतात. हवा तेवढा वाद घाला; त्याला समजावू शकत नाही, हा असा अनुभव आहे. जो शेवटी परिवर्तनाच्या माध्यमातून शक्य आहे.

------------------------------

# नवमी- नवरात्र १९-१०-१९८८

**आज नवरात्रीचा शेवटचा दिवस आहे. जसे तुम्ही तुमच्या आत डोकावून बघता. आम्हा सर्वांसाठी हा परमोत्कर्ष बिंदू असायला हवा. आमच्या शरीरात उत्थानासाठी सात चक्र आहेत आणि दोन चक्रे त्याच्यावर आहेत. या सर्व नऊ चक्रांना याच जीवनात पार करणे आवश्यक आहे. हेच तुमचे लक्ष्य असायला हवे, पण तुम्ही लोक जर फक्त 'आज्ञा'तच चालाल तर अधिक वर जाऊ शकणार नाही. याच (आज्ञा) चक्रावर खूप जण हरवले; परंतु हे अत्यंत महत्त्वपूर्ण चक्र आहे.** दुर्गेच्या षष्ठीला खूप महत्त्वपूर्ण समजले जाते. असे म्हणतात, की देवी नावेवर स्वार होऊन येते. कोलकत्त्याच्या लोकांचा या गोष्टीवर विश्वास आहे, की षष्ठीचा दिवस पार करण्यासाठी फार मोठा दिवस आहे. आम्हा सर्वांची हीच समस्या आहे, की हा षष्ठीचा दिवस (आज्ञा) आताही आमच्या डोक्यात पक्का बसला आहे. (सरपे सवार है) आम्ही त्यातून निघू शकत नाही. त्यामुळे नवव्या अवस्थेपर्यंत येण्यासाठी आम्ही पूजा करो किंवा दुसरपे काही. पण आतापर्यंत आम्ही सहाव्या अवस्थेपर्यंतच आहोत. आम्ही बाह्यरूपाने पूजा करीत आहोत. सप्तमीचा दिवस असा असतो जिथे मी विद्यमान असते. हजर असते; परंतु सातवी, आठवी आणि नववी अवस्था अशी आहे, जिथे जाण्यासाठी सहावी अवस्था पार करावीच लागते. आज मी तुम्हाला सहाव्या अवस्थेबद्दल सांगणार आहे. कारण त्या अवस्थेबद्दल माहिती असणे आम्हा सर्वांसाठी महत्त्वपूर्ण आहे. सहाव्या दिवशी देवीने काय केले, हे आम्हा सर्वांना माहिती हवे.

महालक्ष्मी माझ्या रूपात अवतरली आणि आपल्या पुत्राला जन्म दिला. ते येशूख्रिस्त होते. मदर मेरीची इच्छा होती, की येशूख्रिस्ताने इतर लोकांसाठी 'आज्ञाचक्र' पार करावे. त्यामुळे येशूला चैतन्याचे सूक्ष्मरूप व्हावे लागले. ते चैतन्याचे सूक्ष्मरूप होते. जसे- पाण्यावरून चालणे किंवा त्यांनी इतर चमत्कार केले. तशी कार्ये केली. त्यातून त्यांनी सांगितले, की ते 'चैतन्य' होते म्हणून ते चैतन्य झाले आणि आपल्या सूक्ष्म शरीराचा त्याग केला आणि शेवटी सहावी अवस्था पार केली.

ही धारणा आता वास्तविकता आहे; परंतु ज्या व्यक्तीने आतापर्यंत आत्मसाक्षात्कार प्राप्त केला नाही, ज्याने चैतन्यलहरी अनुभवल्या नाहीत, ती व्यक्ती हे सत्य स्वीकारणार नाही. त्यामुळे ते येशूख्रिस्ताच्या विरुद्ध जाते आणि आपल्या 'आज्ञे'च्या माध्यमातून येशूविरोधी गोष्टी रचून सांगत राहतो. तो अशा गोष्टी बोलतो जसे येशूख्रिस्त जणूकाही सामान्य माणूस होते. कारण याच्यापुढे तो विचार करूच शकत नाही. आतापर्यंत तो 'आज्ञा'च्या अवस्थेत आहे आणि या सर्व बाबी करताना तो येशूच्या चक्राला (आज्ञा) पार करू शकत नाही.

आज्ञाचक्राच्या दोन्ही डाव्या उजव्या बाजूस मानव कार्यरत आहे. डावी आज्ञा तुमच्या भूतकाळाकडे जाते आणि तुम्ही तुमच्या देशाबद्दल विचार करता, की हा एक महान देश होता किंवा इंग्लंडप्रमाणे ते विचार करतात, की ते महान शासक होते. यानंतर ते असाही विचार करू शकतात, की त्यांचा

जन्म खूप उच्च परिवारात झाला होता वगैरे वगैरे.

**या सर्व गोष्टींचा ते विचार करू शकतात. या प्रकारचे विचार त्यांना डाव्या आज्ञेची बाधा देऊ शकते. या सर्व गोष्टी जेव्हा तुम्हाला जाणवतील. त्यात तुमचा भूतकाळ असतो. याशिवाय इतरांचा भूतकाळ जाणणे (जाणे) डाव्या आज्ञेच्या पकडीमुळे होते. जर कोणी तुम्हाला स्वतःच्या भूतकाळाबद्दल सांगत असेल असे झाले, तसे झाले किंवा कोणी आपल्या भूतकालीन घटनांविषयी विचार करीत असेल, की माझ्या आयुष्यात अशा दुःखद घटना घडल्या असे व्हायला नको होते. त्याबद्दल रडला. या सर्व गोष्टी डाव्या आज्ञेच्या भयंकर पकडीमुळे घडतात. जर तुमची आज्ञा पकडली तर ती दूर करणे फार कठीण असते. कारण तुम्ही स्वतः समस्या निर्माण केली आहे.**

**तिसरी गोष्ट ही आहे, की कोणत्याही नकारात्मक शक्तीचे आक्रमण तुमच्यावर झाले, तर तुम्ही हे बिलकुल विसरून जाता की तुम्ही कोण आहात.**

तुम्हाला माहीत नाही की तुम्ही कोण आहात? इतर लोक जे काही सांगतात त्यावर तुम्ही विश्वास ठेवता. लोक जसे सांगतील तुम्ही तसेच वागता. लोक तुमच्याकडून धन मागतात; तुम्ही त्यांना ते देता. लोक म्हणतात, समुद्रात उडी मारा, तुम्ही उडी मारता. हे लोक सामुदायिक आत्महत्या करवू शकतात. या डाव्या आज्ञेच्या माध्यमातून संमोहन करतात. एकदा संमोहन केले, की पुढे तुमच्याकडून काहीही घेऊ शकते. संमोहनाच्या माध्यमातून लोकांचे इलाजही करतात. जेव्हा एखादी व्यक्ती संमोहित होते तेव्हा ऊर्जा तिच्या शारीरिक भागाकडे वाहू लागते. ती व्यक्तीच्या शारीरिक व्याधींना प्रभावित करते आणि त्यांची शारीरिक व्याधी हळूहळू दुरुस्त होऊ लागते. बऱ्याच लोकांवर या प्रकारची हातचलाखी करून त्यांच्या शरीरात मृत आत्मे घालतात. तात्पुरत्या स्वरूपात त्यांच्यात हे घडते आणि वाटते, की आता ती व्यक्ती सर्वसामान्य आहे; परंतु खरेतर त्या माणसात कोणीतरी अन्य व्यक्ती बसलेली असते. ते खूप लवकर थकतात आणि एकटेच पडून राहावे असे त्यांना वाटते. ते कोणाचा सामना करू शकत नाहीत. डावीकडील नकारात्मक शक्तींमुळे अशा बऱ्याचशा गोष्टी होतात. त्यांचे वर्णन केले जाऊ शकत नाही. यामुळे कॅन्सर, स्नायूंचे आजार, पार्किसन इ. मनोशारीरिक आजार होतात. त्या दिवशी मी एका महिलेला भेटले. तिचा रंग अचानक काळा पडला. शरीर सुजले व त्यावर गाठी होत्या. तिला कोणी नीट करू शकत नव्हते. फक्त तीन दिवस सहजयोगाचे उपचार केल्यावर ती खूपशी बरी झाली. या सर्व समस्या व्यक्तीला डाव्या आज्ञेमुळे होतात आणि काही चुकीचे लोक त्याचा दुरुपयोग करतात. अशी दृष्कृत्ये मुसलमानांमध्ये घडतात.

मला हे समजत नाही, की अशा लोकांमध्ये रडणे, ओरडणे हे सर्व केले जाते. आपल्या कष्टाचे गाणे गातात. विशेषतः विरहगीते गातात. मूर्खासारख्या गोष्टी करतात. म्हणून डाव्या आज्ञाचक्रावर पकड येते. डाव्या आज्ञाचक्राची पक्कड पक्की असेल तरी ती उजव्या आज्ञाचक्राला खेचते. डावी आणि उजवी आज्ञा परस्परपूरक आहेत. जेव्हा डावी आज्ञा उजव्या आज्ञेत प्रवेश करते व्यक्ती या प्रकारच्या भयानक तत्त्वाशी खेळू लागते. तो खेळणे बनतो. जेव्हा तो शक्तीचा विरोध करतो तेव्हा त्या दुःख, शारीरिक कष्ट होतात; परंतु या बाबींचा स्वीकार केला तर नकारात्मक तत्त्व त्याच्या माध्यमातून कार्य करते. अनेक प्रकारचे ते चमत्कार दाखवतात. जसे कुंकू काढणे. ही माणसे अतिशय प्रभावशाली असतात. त्यांच्या बोलण्याकडे आपण आकृष्ट होतो. हे लोक असे बोलतात जणूकाही डेल्फीच्या महान पुरुषांप्रमाणे ते बोलत आहेत. हे सर्व प्रदर्शन राक्षसीवृत्तीचे असते. जेव्हा डावी आज्ञा उजवीकडे जाते तेव्हा हे लोक मोठे गुरू, महागुरू होतात. आजकाल तुम्ही ज्या गोष्टी (महाराज) बघता ते याप्रकारेच होतात. ते महागुरू होऊ शकतात. कारण डावीकडचे कृत्य करतात. नियंत्रण करतात आणि उजव्या बाजूचा उपयोग करून ती स्थिती प्राप्त करतात. ही फार भयंकर स्थिती आहे. जेव्हा डावी आज्ञा अधिक वाढते तेव्हा व्यक्तीचा स्वभाव अहंकारी होतो. तुम्ही त्याचा उपयोग करून फुशारकी गाजवता. अशा प्रकारे वागणारे लोक सहजयोगातही आहेत. ज्या लोकांची उजवी आज्ञा डाव्या आज्ञेमुळे पकडली गेली, त्यामुळे ते दुर्व्यवहार करू लागले.

अशा स्थितीत असणाऱ्या लोकांना सहजयोगात घेता येत नाही. ते सर्व प्रकारची कामे करतात. अतिशय चलाखीने इतरांशी वागून इतरांना प्रभावित करतात. देखावा करतात. त्यांच्या माध्यमातून भूत बोलते. ही अवस्था असते म्हणून ते सहजयोगाच्या बाहेर असतात. आपण त्यांना सहजयोगात घेऊ शकत नाही. ही एक गोष्ट झाली. आपण यापासून वाचलो पाहिजे.

**जर कोणाला डाव्या आज्ञेची पकड असेल तर कृपा करून ती ठीक करा आणि प्रत्येक वेळी स्वतःवर नाराज व्हा, की मला राग का येतो? माझ्यात राग का आहे? अशा अहंकारामुळे एखादा त्रास होऊ शकतो. अशी व्यक्ती अत्यंत विचित्र असते. मार खाल्लेला अहंकार फुग्यासारखा फुगतो. अहंकाराला आतून त्रास द्या किंवा बाहेरून तो वाढणारच, अशी व्यक्ती विचित्र असते. तो खोटे वागणे, विनम्रता, आनंद यांचा देखावा करतो. कधी कधी असे व्यक्तित्वपण विकसित होते.**

**उजव्या बाजूची आज्ञा अनेक कारणांमुळे पकडली जाते. ज्याप्रमाणे आपला जन्म, आपले आई- वडील, त्यांचे अनावश्यक प्रेम आणि आपल्या मनात अशी भावना निर्माण केली असेल, की याचा शेवट नाही. तुमचे शिक्षण, आई- वडिलांचे उच्च पद या कारणांमुळे तुमची उजवी आज्ञा वाढते.** अवस्था बिकट होते. कोणतीही गोष्ट स्पष्टपणे पाहू शकत नाही. ती मूर्खतापूर्ण स्थिती असते. त्यामुळे मूर्खासारखे काम केले जाते. जोपर्यंत तुम्ही बरबाद होत नाही तोपर्यंत तुमची मूर्खता तुम्ही पाहू शकत नाही. तेव्हा तुम्हाला कळते हे सत्य आहे. वास्तविकता ही आहे की मानव समजूतदारपणात शूद्र ठरतो. कमी पडतो. मी असे बघितले की, एखादा चेक फाडून दिल्यानेही व्यक्तीचा अहं वाढतो. बँकेचे पासबुक मिळाले

तरी त्याचा अहं वाढतो. एक व्यक्ती लंडनमध्ये माझी गाडी चालवत होती. जेव्हा तो गाडीत बसायचा तेव्हा त्याची आज्ञा फुग्याप्रमाणे फुगायची. मी विचारायची काय झाले? त्याची आज्ञा का वाढत असेल? त्याने सांगितले की मी मर्सिडीज चालवतो म्हणून आज्ञेवर पकड येते. मी म्हटले– गाडी माझी आहे. तू तर फक्त चालवतोस! एक दुसरे उदाहरण– एक स्त्री मला भेटली. तिची आज्ञा वाढली होती. मी आश्यर्चचकित झाले की त्या स्त्रीला काय समस्या असतील? मी तिला विचारले, तुम्ही काय करता? मी बाहुल्या बनवते. ती म्हणाली. बाहुल्या बनवू शकते म्हणून तिला अहंकार होता.

**परमेश्वराने जर आपल्याला काही प्रतिभा, काही गुण दिले असतील, तर परमेश्वरासाठी चांगले कार्य करून आपले प्रेम व्यक्त केले पाहिजे. हे दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, की हे परमेश्वरा, तू मला प्रतिभा दिलीस, तू मला चांगले काम करण्याची संधी दे. पण लोक असा विचार करतात, की हे 'माझेच कार्य आहे.'(माझ्यामुळे हे कार्यान्वित होते आहे.) त्यांना खूप गर्व वाटतो. त्यांना हे दाखवायचे असते, की ते महान प्रतिभावंत आहेत किंवा उच्चशिक्षण प्राप्त केले आहे. इ. इ. परमेश्वरासाठी हे सर्व काय आहे? ज्ञान म्हणजे काय? सारी 'अविद्या' आहे. या अहंकारापासून मुक्ती मिळविण्यासाठी आपल्याजवळ एक साधा उपाय आहे. हा उपाय मोहम्मदसाहेबांनी सांगितला आहे. तो खूप चांगले कार्य करतो. उपाय हा आहे, की अहंपासून मुक्ती मिळविण्यासाठी रोज आपल्या अहंकाराला चप्पल मारा. (पादत्राणाने ठोका)**

पण आपण तर नेहमी इतर लोकांच्या अहंलाच बघतो. (नावे ठेवतो) स्वतःच्या अहंकाराकडे लक्ष देत नाही. कधी हा विचार करीत नाही, की माझ्यातच काही कमतरता आहे. बस असेच म्हणत राहतो की इतरांचेच चुकते. त्यांच्यातच कमतरता आहेत. अहंकाराचे हे पहिले लक्षण आहे. ज्यात माणूस स्वतःचे दोष, स्वतःचा अहंकार दृष्टिआड करतो. तो हे बघतच नाही की माझ्यात काय कमी आहे? माझे वागणे कसे आहे? आणि मी इतरांशी कसे वागतो? लोक तुमच्याबद्दल काय विचार करतात? काय म्हणतात?

मी माझ्या पिताजींचे उदाहरण देते. त्यांना अजिबात अहंकार नव्हता. ते अतिशय प्रतिभावंत आणि ज्ञानी व्यक्ती होते. आजपर्यंत मला त्यांच्यासारखा एकही माणूस भेटला नाही. ते अत्यंत गहन होते. समजा ते आणि आम्ही टेबलावर जेवत असलो आणि स्वयंपाकात मीठ नसेल तर 'मीठ नाही' असे म्हणण्याची कोणाची टाप नव्हती. जे आणि जसे असेल तेच खावे लागेल. बिनामिठाचे, आळणी असले तरी अजिबात तक्रार न करता खावे लागे. त्याबद्दल काहीही वाच्यता न करता नेहमीप्रमाणे आम्ही जेवत असू. आईच्या लक्षात आल्यावर ती विचारायची की जेवणात मीठ नव्हते, तर मला सांगायचे ना! चुलत, मामेभावंडांमुळे आमचे कुटुंब खूप मोठे होते. झोपायला आमच्या इथे मोठमोठ्या खोल्या होत्या. मुलांसाठी, मुलींसाठी. काही ब्लँकेट आम्ही मिळून पांघरायचो. सारी रात्र मौजमजा, दंगामस्ती करीत असायचो. कधी कधी आम्हाला जमिनीवर झोपावे लागे. त्यामुळे एक दिवस माझ्या बहिणीने तक्रार केली, की ती जमिनीवर झोपली तर तिचे अंग दुखते. त्यावर वडील म्हणाले, ''तू बाहेर झोप.'' (घराबाहेर जमिनीवर) दहा दिवस बाहेर झोपशील, तर चांगली होशील. तुमच्या शरीराला तुमचा दास (नोकर) बनवा. ते स्वतःपण असेच करीत असत. ते म्हणायचे, 'तुम्ही कोणत्याही गोष्टीची मागणी करू नका.' जर कोणी कधी कशाची मागणी केली उदा. एखाद्याने म्हटले, की मी या या वेळेला जेवतो. मला तेव्हा जेवण हवे, तर वडील म्हणत, ''या ठराविक वेळेस जेवण्यापेक्षा तू उपवास कर. काहीही खाऊ नकोस. म्हणजे वेळेचा प्रश्नच राहत नाही.'' खाणे, पिणे, कपडे, धनसंपत्ती यात कोणत्याही प्रकारची रुची घेण्यासाठी, स्वारस्य दाखविण्याची आम्हाला मनाई होती. ते म्हणत, 'या सर्वसुखसुविधांमध्ये तुम्ही रुची घेऊ नका.'

**कारण या वस्तू तुमच्याजवळ असल्या तर तुम्हाला अहंची बाधा होईल. सुख–सुविधाप्रति स्वारस्य म्हणजे तर भौतिक पदार्थांचे दास्यत्व. भौतिक पदार्थ तुम्हाला सातत्याने गुलाम बनविण्याचा प्रयत्न करीत असतात. जेव्हा तुम्ही आराम करण्याची इच्छा व्यक्त करता तेव्हाही तुम्ही भौतिकतेच्या गुलामगिरीची इच्छा, कामना करता. जेव्हा भौतिकता तुमच्या डोक्यात चढते तेव्हा तुमचा अहंकार वाढतो. कारण पुन्हा एकदा तुम्ही गुलाम होता. जी व्यक्ती गुलाम होते तिच्यात अहंकार खूप असतो. तुम्ही म्हणू लागता ''माझ्याजवळ हे आहे, माझ्याजवळ ते आहे.'' या वस्तू तुम्ही (मरणोपरांत) बरोबर घेऊन जाऊ शकत नाही. सहजयोगीसाठी हे महत्त्वाचे आहे, की तो अत्यंत सरळ आणि साधं जीवन व्यतित करील. वेगवेगळ्या, हरतऱ्हेच्या परिस्थितीत, काळामध्ये राहण्याची शक्ती त्याच्यात हवी. योग्याचे हेच लक्षण आहे. योग्याला जर आरामशीर बिछाना हवा असेल, छान जेवण हवे असेल, खाण्याची तो सतत चिंता करीत असेल, आपले पैसे आणि पैशाच्या पाकिटाकडे येता–जाता लक्ष जात असेल, तर तो योगी नव्हे. या सर्व वस्तूंशी त्याचा संबंध नसावा.**

मी सांगते, की सहजयोगीच्या रूपात तुम्ही स्वतःला असे विकसित करायला हवे, की तुम्ही सहजयोगात परिपक्व व्हाल. त्यामुळे सर्व प्रकारची प्रलोभने, सर्व प्रकारच्या सवयी, सर्व प्रकारच्या मागण्यांपासून तुम्ही पूर्णपणे मुक्त व्हाल. अशा व्यक्तीला योगी म्हटले जाते. ज्यांच्याबद्दल तुम्ही वाचले आहे. त्यांना मी हे सर्व सांगितले नव्हते. याचे ज्ञान त्यांनी स्वतः प्राप्त केले होते. हे ज्ञान त्यांनी कसे मिळविले? ते स्वतःशी आणि परमात्म्याशी पूर्णपणे शुद्ध, शुद्ध, शुद्ध झाले आणि त्यांना ज्ञान प्राप्त झाले आणि त्यांच्यात पावित्र्य आले. उदाहरणार्थ मार्कंडेय स्वामी एका ठिकाणी राहत होते. स्वतःला परमेश्वराप्रति समर्पित करायचे. आपल्या वडिलांबरोबर अत्यंत साधेपणाने, अत्यंत प्रसन्नपणे तिथे राहायचे. ते सर्वाधिक वैभवशाली (श्रीमंत) होते. कारण देवीमातेच्या कृपेचा आनंद ते घेत होते. भविष्याच्या सर्व घटना त्यांनी आधीच बघितल्या होत्या. त्यांना अल्पायुषी असण्याचा शाप होता.

त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितले की तुला मरावेच लागेल, कारण भगवान शिवाने मला जेव्हा पुत्र होईल असा वर दिला तेव्हाच हे सांगितले, की मी तुला पुत्र होईल असा वर देतो, पण तो अल्पायुषी असेल. मार्कंडेय म्हणाले, ''ठीक आहे. मी याचे उत्तर शोधून काढीन.'' म्हणून त्यांनी देवीची तपस्या केली. तप केले. देवीने त्यांना वर दिला. साक्षात दर्शन दिले आणि याप्रकारे हे स्थान 'सप्तशृंगी' म्हणून प्रसिद्ध झाले. सप्तशृंगी म्हणजे सात चक्रे. हे आदिशक्तिचे स्थान आहे. आज जेव्हा तुम्ही हे सर्व वाचता तेव्हा तुम्हाला आश्चर्य वाटत असेल, की चौदा हजार वर्षांपूर्वीचे हे सर्व कसे समजू शकेल? किती लोक याविषयी जाणतात. जी आपल्या सहजयोगाशी मिळतीजुळती आहेत. जे दाखवतात की तुम्ही कोण आहात? कशा प्रकारे संक्षिप्तरूपात त्यांनी हे सर्व लिहिले? कारण ते स्वयंपूर्ण प्रतिबिंब (Reflector) बनले होते. पूर्ण प्रतिबिंबकाने विश्वाला दाखविले की देवी काय आहे? याचे मोठे श्रेय त्यांनाच (श्री मार्कंडेय) जाते. कोणत्याही अहंशिवाय त्यांनी हे केले. व्यक्तीमध्ये जर प्रतिअहं शिल्लक असेल तर तो प्रतिबिंबित करू शकत नाही. अहं एक भ्रमाची अवस्था आहे. त्यात व्यक्ती म्हणते, की मला हे आवडत नाही. मला असे नको आहे. हे माझे नाही.'' जोपर्यंत तुम्ही असे करीत राहता तोपर्यंत हे लक्षात ठेवा, की तुम्ही अहंच्या अवस्थेत आहात. तुम्ही योगी नाही तर अहंग्रस्त व्यक्ती आहात.

म्हणून ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे, की तुम्ही स्वतःला असे बनवा ज्यामुळे अहं आणि प्रतिअहंचे ढग तुमच्यात विरून जातील. देवीच्या पूजेमुळे तुमचे भले होते. कारण तुम्ही जेव्हा देवीची पूजा करता, जी शक्ती आहे, ती कुंडलिनी आहे. ती तुमच्या चक्रांचा विस्तार करते. सुषुम्ना नाडी सुधारते. तुमची ही नाडी विस्तृत होऊन अधिक रुंद होते. पण तरीही धारणक्षमता तुमच्यात नसते.

हे असे झाले, की एका घड्याला छेद असावे आणि तुम्ही त्यात जितके पाणी घालाल ते वाहून जाईल. इथेपण स्थिती तीच आहे.

सुरुवातीला आम्ही म्हणतो, की घडा पूर्ण भरलेला आहे. कारण तो भरलेला असतो. पण हळूहळू छिद्रातून पाणी वाहायला लागते. घडा रिकामा होईल. कुंडलिनीबाबतही अगदी असेच आहे.

जे छिद्र आमच्यात आहे तो अहं असू शकतो आणि प्रतिअहंही असू शकतो. या दोन समस्या आहेत. तुम्ही वाचू शकलात तर करा बचाव. हे करा. सर्वोत्तम तर हे असेल की स्वतःला बघा, स्वतःला रागवा आणि एका स्तरावर स्वतःचे कौतुक करा. उदा. जेव्हा तुम्ही एखादे सत्कृत्य कराल, चांगले काम कराल तेव्हा कोणाप्रति उदारता दाखवाल, याचीच कमतरता आहे.

बऱ्याचदा सहजयोगी असे समजतात, की आता आम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात पोचलो आहोत. पण ते तुमचे लक्ष्य नाही. समजा, एक व्यक्ती सचिवालयात सफाई कर्मचारी म्हणून काम करते आणि तो विचार करतो की, ''मी पंतप्रधान आहे?'' तर काय म्हणावे? इथेपण असेच आहे. तुम्ही परमात्म्याच्या साम्राज्यात पोचले, पण तुम्ही आपले लक्ष्य प्राप्त केले का? यासाठी तुम्हाला कोणते शिक्षण, कोणते ज्ञान, कोणत्या विशेष महान गोष्टीची आवश्यकता नाही. ना तुम्हाला कोणते नाव, प्रसिद्धी, कुटुंब, जात किंवा वंशाची आवश्यक आहे. काहीही नाही.

**विनम्र भक्ती, ध्यानधारणा, तसेच उत्थानाची शुद्ध इच्छा आवश्यक आहे. ती इतक्या सुंदर तऱ्हेने कार्य करील की तुम्ही आश्चर्यचकित होऊन जाल.**

**तुम्ही आपले लक्ष्य समजून घ्यायला हवे. आम्हाला काय मिळवायचे आहे? दुसरे हे, की आम्हाला हे समजून घ्यायला हवे, की लक्ष्य प्राप्त करण्यासाठी सफलता मिळवून देणारा गुण कोणता आहे? आम्हाला समर्पण करावे लागेल. हे खूप सोपे आहे. बस समर्पण करायचे. लोक ध्यान करतात. फोटोग्राफ बघतात. फोटो बघून असे वाटायला हवे, की जणू हा माझ्या आईचा फोटो आहे. तिला आपल्या हृदयात बसवा. फोटो अवश्य ठेवा आणि म्हणा, ''श्रीमाताजी, मी तुमच्यावर प्रेम करतो. कृपा करून माझ्या हृदयात या.'' अशा प्रकारे माताजींना हृदयात बसवा. हृदयात अपेक्षित विवेक आहे, पूर्ण योग्यता आहे आणि हृदयातूनच प्रत्येक गोष्टीचा जन्म होतो. पण जर तुम्ही हृदय बंद करून घेतले तर मस्तक निरंकुश होऊन बाहेरच्या बाजूस जाते. हृदयात आत्म्याचे निवासस्थान आहे. तो सर्वकाही नियंत्रित करतो. पराअनुकंपी, अनुकंपी नाडीतंत्र, तुमची पूर्ण विकास प्रणाली, तुमचे ज्ञान, सर्वकाही. फक्त हेच नव्हे तर, स्वतःला केवळ सामूहिक अस्तित्व समजतात. आत्मा आपल्याला प्रकाश देतो, ज्याच्या माध्यमातून तुम्हाला खरे ज्ञान प्राप्त होते. म्हणून आपल्याला कार्यरत करायला हवे. त्यामुळे हृदयाला विकसित करणे ही पहिली आवश्यकता आहे. तुम्ही स्वतः बघा, की तुमचे हृदय किती विशाल आहे. ठीक आहे. किती जणांना तुम्ही क्षमा केली? त्यांच्याशी तुम्ही कसे बोलता? कसे वागता? इतर लोकांच्या बाबतीत काय विचार करता? तुम्हाला त्यांची चिंता आहे की नाही? उदाहरणार्थ मी जर निर्धन व्यक्तीला बघितलं तर माझ्या संपूर्ण अस्तित्वाचे मंथन होते. मला वाटू लागते, की याच्यासाठी काहीतरी करायला हवे. त्याची निर्धनता मला सहन होत नाही. जसे येथे काम करणाऱ्या मजुरांना जायला सांगितले कारण त्यांच्याबद्दल काही लोकांनी हरकत घेतली होती. म्हणून आम्ही त्यांना बाहेर काढले. पण त्यांना झोपड्याही नव्हत्या. सारी रात्र त्यांनी बाहेर कुडकुडत काढली. दुसऱ्या दिवशी मी काही खाऊ शकले नाही. मला खूप वाईट वाटत होते. मग मी त्यांना बोलावून सर्वकाही दिले. सांगितले इथे बसा. इतरांनाही सांगितले, की यांच्या सर्व गरजा (हवे असेल ते) पूर्ण करा. यांच्या तब्येतीची काळजी घ्या. पण तरीही काही लोक आजारी पडले. मी त्यांच्यावर इलाज केला. कारण पूर्ण करुणा हृदयात तुफान माजवते. एक खूप मोठे वादळ जे माणसाने बघायला हवे. गरिबीबद्दल तुम्हाला काय वाटते? तुम्ही**

**सध्याच्या गरिबीविषयी विचार करता का? कष्टकऱ्यांबाबत तुम्हाला काय वाटते? ज्यांना मार दिला आहे, धोका केला आहे, ज्यांना त्रास दिला आहे, त्यांच्याबद्दल तुम्ही काय विचार करता?**

**सहजयोग कोणा एका व्यक्तीसाठी नाही. तो केवळ तुमच्यासाठी नाही. तो सहजयोगींच्या एका समूहाचा नाही. हा पूर्ण विश्वासाठी आहे. परमात्म्याचे प्रेम आणि करुणेचा प्रकाश सर्वत्र पसरला आहे. म्हणून याच्यापुढची अवस्था आज्ञेच्या वर जाणे, हे आहे. जेव्हा व्यक्ती विचार करते, की मी खूप प्रसन्न, आनंदी आहे आणि ही गोष्ट मला मिळायला हवी, तेव्हा त्याने त्यांना काहीच मिळत नाही. अशांकडे बघायला हवे. जेव्हा तुम्ही समजता की मी खूप महान आहे, श्रेष्ठ आहे तेव्हा तुम्ही त्यापेक्षाही श्रेष्ठ व्यक्तीकडे बघायला हवे. या सर्व गोष्टींकडे तुम्ही चित्त द्याल तेव्हा तुम्हाला कळेल, की हे परमात्मा!, किती मोठा आशीर्वाद आहे तुझा! परमात्म्याने मला खूप काही दिले. त्याचे खूप आशीर्वाद मला लाभले.**

सर्वप्रथम मला आत्मसाक्षात्कार दिला. आत्मसाक्षात्कार देण्यासाठी कोटी कोटी, शतकोटी धन्यवाद! कृतज्ञ असणे सगळ्यात उत्तम असते. जेव्हा तुम्हाला वाटेल की तुमच्यात कृतज्ञताभाव आहे; मग विचार करा, की इतरांना मी (स्वतः) आत्मसाक्षात्कार का देत नाही? पण आपण तर दुसऱ्यांसाठी अत्यंत क्रूर, कधी अत्यंत अकडू किंवा इतरांप्रति द्वेषभावना असणारे असतो. पण आता (सहजयोगात) हे सर्व संपून जाईल. जे काही तुम्हाला म्हणायचे आहे ते इमानदारीपूर्वक म्हणा.

**तुमचे दोन शत्रू आहेत. पहिला, तुम्ही स्वतः तुमचे शत्रू आहात आणि दुसरा, अज्ञान. या दोन शत्रूंवर तुम्हाला विजय प्राप्त करावयाचा आहे. या शत्रूंवर तुम्ही विजय मिळविला तर तुम्हाला कोणी कष्ट (त्रास) देऊ शकत नाही. समजा, एखादी व्यक्ती त्रासदायक आहे किंवा तुम्हाला सतावत असेल, तर तुम्ही त्याला त्रास देणाराच राहू द्या. तो स्वतः नरकात जातो आहे; तुम्ही नाही. जर त्रास देतो आहे तर त्याला त्याचे काम करू द्या. कोणाच्या मनात दुर्भावना आहे? या गोष्टीची चिंता तुम्ही करू नका. तुम्ही काहीच करीत नाही. खरेतर तुम्हाला आनंद व्हायला हवा. याच्या विपरीत जर कोणी त्रास देत असेल तर त्याला बघा. ''ही व्यक्ती कष्ट देत आहे. याच्याजवळ धन आहे. याच्याजवळ सर्वकाही आहे, पण मला त्रास देत आहे. माझ्याजवळ तर हे काही नाही.'' तुमच्याजवळ आत्मसाक्षात्कार आहे. त्याच्याजवळ हे काही नाही.**

**आमच्याजवळही संतोष, समाधान आणि उत्साह प्राप्त करण्याचा फार मोठा स्रोत आहे, की आपण आत्मसाक्षात्कारी आहोत. चला, आपण यात पूर्णत्वाने स्थापित होऊ. समर्पित होऊ. आम्हाला अलंकृत व्हायचे आहे. आम्हाला सिंहासनावर आरूढ व्हायचे आहे आणि आम्हाला सम्राट व्हायचे आहे. माझी तीच इच्छा आहे. त्यामुळे भिकाऱ्यांना घेता येणार नाही. एखाद्या भिकाऱ्याला राजा केले, तरी तो भिकाऱ्यासारखेच वागेल. त्यामुळे तुमच्यात एक महान व्यक्तिमत्त्व निर्माण व्हायला हवे. एक प्रकारचे मोठेपण, शांती, एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व जे हे दाखवील, की तुम्ही सहजयोगी आहात.**

मी जसे सांगितले तसे फक्त दोन शत्रू आहेत. ज्यांच्याशी तुम्हाला युद्ध करायचे आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार प्राप्त झाला आहे आणि त्यामुळे तुम्हाला पूजा प्राप्त झाल्या आहेत, याचे ज्ञान असायला हवे. पूजेच्या वेळेस तुम्ही स्वतःला माझ्याप्रति समर्पित करून टाका. कारण तुम्ही समर्पण केले नाही तर तुमचे मन इथे तिथे भटकत राहील. हे तर असेच झाले, की चालणाऱ्या पंख्यावर तुम्ही काही टाकले तर पंखा त्याचा स्वीकार करीत नाही. ती वस्तू दूर फेकून देतो. एकप्रकारे तुम्हीपण तसेच आहात.

दुसरी गोष्ट आहे, की पूजा समर्पण आहे. ही भक्ती, हृदयाची भावना आहे. हृदय उघडा. त्या वेळेस हृदय उघडून हा विचार करा की मी पूजा करीत आहे, पण समस्या ही आहे, की कोणा अहंकारी व्यक्तीला जर हे सर्व सांगितले तर त्याला आघात पोचेल. ही सगळ्यात वाईट गोष्ट आहे. त्यांना हे समजत नाही, की ही त्यांच्या हिताची गोष्ट आहे की त्यांनी आपले हृदय उघडावे. त्यांना खूप काही मिळवायचे आहे. तुमचे हृदय संकीर्ण असेल तर त्यात तुम्ही कितीसे प्रेम भरू शकाल? जसे आत्ता प्रेम प्रसारित होत आहे, प्रेम वाहत आहे, पण अशा वेळी तुम्ही भलत्याच गोष्टींचे विचार डोक्यात घेऊन बसलात तर...? समर्पणाची खरी गोष्ट ही आहे, की तुमचे चित्त पूर्णपणे माझ्याकडे हवे. मी लोकांना पूजेत झोपताना, पेंगताना बघितले आहे. बरेच जण असे पूजेत झोपतात. हे काय दर्शविते? ते डावीकडे झुकलेले आहेत आणि त्यांच्याकडे भूत, प्रेत आदी असतात. म्हणून ते झोपतात. मी त्यांच्याशी बोलत असते आणि ते झोपत असतात. हे सर्व तुम्ही समजावून घ्याला हवे, की तुम्ही असे का करता आहात? त्यापासून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करा आणि स्वतःला सुधारा. सावधानपूर्वक चैतन्य प्राप्त करा. अधिकाधिक प्रमाणात चैतन्य प्राप्त करा. पूजेचा तोच उद्देश असतो. इथे तुम्ही नऊ दिवस नऊ पूजा केल्या. या पूजांदरम्यान आमच्यात काही सुधारणा झाली का? आम्हाला काही प्राप्त झाले का? आमचे प्रेम, आनंद, समज-उमज आणि संतोष, समाधानात वाढ झाली, वृद्धी झाली का?

आज अंतिम, शेवटचा दिवस आहे म्हणून तुम्ही या सर्वांचा विचार करायला हवा. उद्या दसरा, आनंदोत्सवाचा दिवस. कारण जे आम्ही प्राप्त केले आहे, मिळविले आहे, त्याचा आनंद साजरा करण्याचा दिवस. तर आता घरी जाऊन पूर्ण विचार करा या नऊ दिवसांत मला काय प्राप्त झाले? मला काय मिळाले? या आणि बघा की हे मला सर्व मिळाले का? आपल्या अंतरात डोकावून बघा आणि शोधा, की मला हे सर्व नऊ दिवसांचे संचित

मिळाले आहे. त्याचा आनंद घ्या कारण तुम्ही ते सर्व मिळविले आहे. हाच विजय आहे. उद्या विजय दिवस, विजयादशमी आहे. आपल्या स्वतः वर आणि आपल्या अज्ञानावर विजय प्राप्त केला आहे. तुम्ही स्वतःला जिंकले आहे. ज्ञान, अंधःकाराला जिंकले आहे. उद्यासाठी हाच संदेश आहे.

परमात्मा तुम्हाला धन्य करो!

-------------------